# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०७/२००६.** **दिनांक १६.०७.२००६**

**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक ६.०७.२००६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस-वशी-४-८४४१-२००६ दिनांक २७.०६.२००६ चे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आलेले होते. परंतू काही अपरिहार्य कारणास्तव सदरहू सभा रद्द करण्यात आली असून या सभेची पुढील तारीख नंतर कळविण्यात येईल असे जा.नं.एसएसएस-वशी-४-८६८२-२००६ दिनांक ०४.०७.२००६ चे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे मा.व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १६.०७.२००६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-८९८५-२००६, दिनांक ८ जुलै, २००६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक १६.०७.२००६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे, उपाध्यक्ष |
| ०३. | मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील | ०४. | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे. | ०६. | मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव |
| ०७. | मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे | ०८ | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर |
| ०९. | मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक | १०. | मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा |
| ११. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर | १२. | मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय |
| १३. | मा.डॉ.पी.एल.तिवारी | १४. | मा.श्री.कैलास गोविंद कोते |

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.प्रकाश रामदास काळे, मा.श्रीमती रिम्पल लोहिया यांनी दूरध्वनीव्दारे व मा.श्री.समि खतिब फॅक्स पत्राने कळविले आहे. त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

सभेचे सुरुवातीस मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे दु:खवटयाचा ठराव मांडला व तो सर्वानुमते संमत करण्यात आला.

**निर्णय क्र.४१६.** दिनांक ११ जुलै,२००६ रोजी मुंबई येथे खार, माहिम,माटूंगा, मीरारोड, जोगेश्वरी,बोरीवली, बांद्रा इत्यादी आठ ठिकाणी रेल्वेमध्ये सायंकाळी ६.२५ ते ६.३६ या अवघ्या ११ मिनीटाच्या कालावधीत बॉम्ब स्फोट झाले. बॉम्ब स्फोटामध्ये अंदाजे २०० लोक ठार झाले व ७०० पेक्षा अधिक लोक गंभीर जखमी झाले.

तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जेष्ठ नेते, राज्याचे माजी मंत्री आणि राज्य सभा खासदार वसंत चव्हाण यांचे हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने वयाच्या ६४ व्या वर्षी दु:खद निधन झाले.

रेल्वे बॉम्ब स्फोट दुर्घटनेत मरण पावलेल्या लोकांच्या तसेच कै.चव्हाण यांचे कुटूंबियांचे दु:खात सर्व विश्वस्त व संस्थानचे कर्मचारी सहभागी आहोत.

यानंतर या सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रद्धांजली अर्पण केली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं. ०१. व्यवस्थापन समितीचे दि.०३.०६.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४१७.** व्यवस्थापन समितीचे दि.१५.०५.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात घेंत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**(०१) निर्णय क्र.३२८ (०२)** मध्ये

"शिर्डी, कोपरगाव, नाशिक इ. ठिकाणी केबल टी.व्ही. वर श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये हृदयरोग उपचाराबाबत डॉ.सोनवणे, नाशिक व डॉ.साबळे, श्रीसाईनाथ रुग्णालय यांची जाहिरात येत आहे. त्यांनी याबाबत संस्थानची परवानगी घेतलेली नाही. तरी सदर जाहीराती तातडीने बंद कराव्यात. संबंधितांकडून याबाबत लेखी खुलासा मागवावा." असे ठरले होते.

त्यानुसार डॉ.साबळे यांना याबाबत आजचे सभेपुढे समक्ष बोलविण्यात येऊन केबल टी.व्ही.वरील जाहीरातीबाबत विचारणा केली असता, सदरचे जाहीरातीशी माझा काही एक संबंध नाही व ती मी दिलेली नसून त्याबाबत मला कोणत्याही प्रकारची माहिती नाही.डॉ.टिंगरे, वैद्यकीय संचालक यांनी मला याबाबत विचारणा केली असता मी यापूर्वीच तसे सांगितले असून जाहिरात बंद करण्यात आलेली आहे, असे सांगितले. प्रशासनाची परवानगी न घेता अशा प्रकारे जाहिरात देण्यात येऊ नये असे त्यांना सांगणेत आले. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**(०२) निर्णय क्र.३२८ (१३)** मध्ये

१००० नग सायकली खरेदीकामी दिनांक ०५.०७.२००६ चे उपसमितीमध्ये संबंधितांशी चर्चा/वाटाघाटी करण्यात येऊन निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतू सदरील निर्णय रद्द करुन हिरो, ॲटलास,फिलीप्स,हरक्युलस इत्यादी नामांकित उत्पादक कंपन्यांकडून फेरनिवीदा मागविण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी/प्रशासन शाखा वशी-०३)

**(०३) निर्णय क्र.३२८ (१४)** मध्ये-

संस्थानचे कायम कर्मचारी गणवेशासाठी रेमंड कंपनीचे कापड खरेदीकामी, मा.विश्वस्त शैलेश श्रीहरी कुटे, प्रशासकीय अधिकारी व अधिक्षक, खरेदी विभाग यांनी जाऊन खरेदी करावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**(०४) निर्णय क्र.३२८ (१५)** मध्ये-

लोखंडी बॅरिकेटस् करिता जी.आय.पाईप व एम.एस.अँगल शीट व पेंट खरेदीबाबत निर्णय होऊन, संबंधितांना न्यूनतम दराने पुरवठा आदेश देण्यात आला होता. मात्र मे.एशियन सेल्स, नाशिक यांनी साहित्य पुरवठा करणेस असमर्थता दर्शविल्याने फेर निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. या मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये मे.एशियन सेल्स, नाशिक यांनी आपली निविदा सादर केलेली आहे. मे.एशियन सेल्स,नाशिक यांनी साहित्य पुरविण्यास असमर्थता दर्शविली असल्याने फेर निविदा मागवाव्या लागल्या याकरिता मे.एशियन सेल्स,नाशिक यांची अनामत रक्कम जप्त करुन त्यांचे नाव काळ्या यादीत टाकण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**(०५) निर्णय क्र.३२८ (१७)** मध्ये-

उत्सवात जे कीर्तनकार नारदीय पद्धतीने पूर्वपार कीर्तन कार्यक्रम करीत आलेले आहेत त्यांनाच कीर्तनाचा कार्यक्रम देण्यात यावा. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**(०६) निर्णय क्र.३३१** मध्ये-

युनियन बँक ऑफ इंडिया शाखा, राहाता यांनी खास संस्थानचे सुविधेच्या दृष्टीने शिर्डी येथे संस्थानचे साईनाथ छाया इमारतीमध्ये संपूर्ण संगणकीय कक्ष सुरु करणेसाठी या इमारतीतील तळमजल्यावरील ३६४.४६ स्केअर मीटर जागा एका वर्षासाठी रुपये ७,५००/- प्रती माह भाड्याने देण्याचा करार दिनांक १ एप्रिल,२००५ ते दिनांक ३१ मार्च,२००६ या कालावधीसाठी करण्यात आलेला आहे. मात्र या कालावधीत बँकेचा कारभार सुरु झालेला नाही. याबाबत लवकरात लवकर बँकेस व्यवहार सुरु करणेस सांगण्यात यावे. अन्यथा जागा खाली करुन घेण्यात येईल, असे बँकेस कळवावे. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/विधी अधिकारी)

**(०७) निर्णय क्र.३६९ मध्ये -**

श्रीतुळजा भवानी संस्थान,तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना रक्कम रुपये १ कोटी देण्यापूर्वी त्यांचा प्रकल्प अहवाल मागविण्यात यावा. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/वशी-०३)

**(८)** वेळेअभावी निर्णय क्र.४०५ पासून पुढे चर्चा होऊ न शकल्याने याबाबत पुढील सभेत इतिवृत्त वाचून कायम करण्यात यावे असे ठरले.

निर्णय क्र.३२७ ते ४०४ चे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं. ०२.** **व्यवस्थापन समितीचे दि.२४.०६.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.४१८.** व्यवस्थापन समितीचे दि.२४.०६.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१)** **<u>ब्लड गॅस ॲनालायझरचे केमीकल्स खरेदीबाबत</u>**

श्री साईबाबा रुग्णालयात प्रयोगशाळा विभागात रक्त लघवीच्या विविध तपासण्या करणेसाठी मे. रोश डायग्नोस्टीक लि. या कंपनीकडून रु. ६,७५,०००/- इतक्या किंमतीत ब्लड गॅस ॲनालायझर मशिन खरेदी करण्यात आलेले आहे. सदरचे मशिनवर तपासण्या करणेकामी त्यांचेच कंपनीचे केमीकल्स वापरावी लागतात. यासाठी प्रयोगशाळा विभागाने त्यांचे डि.पी. क्र. २७१२ दि. ०५/०६/२००६ अन्वये सदरचे केमीकल्सची मागणी केलेली आहे. याकामी कंपनीस दुरध्वनी करुन त्याचे केमीकल्सचे दर

मागविण्यात आले होते. सदर कंपनीने त्यांचे अधिकृत विक्रेते मे. टू व्हिजन डायग्नोस्टीक प्रा. लि., मुंबई यांना कोटेशन पाठविण्यास सांगितले होते. त्यांचे दर खालीलप्रमाणे -

| अ.नं. | वर्णन | मागणी | दर प्रती नग | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | Calibration Solution C1 | 2 | 10415.00 | 20830.00 |
| 2 | Calibration Solution C2 | 2 | 10415.00 | 20830.00 |
| 3 | Fluid Pack C3 | 2 | 13405.00 | 26810.00 |
| | | | एकुण - | 68470.00 |
| | | | VAT - | 8558.75 |
| | | | एकुण रु. - | 77028.75 |

वरीलप्रमाणे केमीकल्स हि साधारणतः दोन महिने पुरु शकतील. तरी सध्या वरीलप्रमाणे केमीकल्स मे.टू व्हिजन डायग्नोस्टीक प्रा. लि., मुंबई यांचेकडून खरेदी करण्यास व येणारा खर्च रु. ७७,०२८.७५ चे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली होती ती मान्य करण्यात आली.

तसेच यापुढे रुग्णालय प्रयोगशाळेसाठी आवश्यक असणारे ब्लड गॅस ॲनालाझरचे केमिकल्स, तसेच रुग्णालयासाठी आवश्यक असणारी कोणतीही खरेदी थेट खरेदी करुन कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव उपसमिती/ व्यवस्थापन समितीपुढे ठेवण्यात येऊ नये. रुग्णालयासाठी आवश्यक असणारे साहित्य/हत्यारे खरेदीकामी अधिकृत विक्रेत्यांची यादी तयार करुन ती व्यवस्थापन समितीचे सभेत मान्य करुन घेण्यात यावी.तसेच विविध मशिनरी, हत्यारे इ. खरेदीसाठी संस्थानमधील तज्ञ डॉक्टर्स, बायोमेडिकल इंजिनिअर इत्यादींचे सल्ल्याने कोणत्या कंपनीचे/ब्रॅण्डचे सदर साहित्य खरेदी करावे याबाबत प्रस्ताव तयार करुन नंतरच व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करावा अशी केलेली शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**०२) श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन टेबल बायबॅक करणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयाचे आर्थोपेडीक ऑपरेशनसाठी आर्थोपेडीक टेबल सन १९८४ साली खरेदी केलेला आहे. सदर टेबल वारंवार दुरुस्त करून देखील काम देत नाही. त्यामुळे मे. एम. शहा ॲन्ड कंपनीचे इंजिनीअर हे नियमीत दुरुस्ती व देखभालीसाठी आले असता त्यांनी सदरचा टेबल हा दुरुस्त होत नाही. तेंव्हा तो आपण बायबॅक करावा असे दि. ३०/०१/२००६ चे पत्राने सुचविले आहे व त्यासाठी नविन टेबलचे कोटेशन पाठविले असून त्याची किंमत रु. १,७४,०००/- इतकी कळविली आहे व जुना टेबल आम्ही रु. १५,०००/- परत घेऊ असा प्रस्ताव दिलेला आहे.सदर टेबल १९८४ मध्ये रु.२३,०००/- किमंतीस खरेदीबाबत डेडस्टॉक रजिष्टरला नोंद आहे.

तरी जुना टेबल बायबॅक पध्दतीने देऊन नविन टेबल खरेदीसाठी कोटेशन मागणी करुन खरेदीस मान्यता असावी. नविन टेबल खरेदीस सुमारे रु. १.५० लाख ते २ लाख खर्च येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थोपेडिक ऑपरेशन थिएटरसाठी आवश्यक असणारे टेबल्सचे स्पेशिफीकेशन संबंधित डॉक्टरांकडून घेण्यात यावे व त्यानुसार जुना टेबल बायबॅक पध्दतीने देऊन नविन टेबल खरेदीसाठी कोटेशन मागणी करुन खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २ लाख पर्यंतचे खर्चास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली होती, ती मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**०३) ॲन्जीओग्राफी व ॲन्जीओप्लॅस्टीसाठी कार्डीओलॉजीकल मटेरीयल खरेदीबाबत...**

श्रीसाईबाबा रुग्णालयात ॲन्जीओग्राफी व ॲन्जीओप्लॅस्टीचे तपासणी / शस्त्रक्रिया कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहे. सदरच्या तपासण्या / शस्त्रक्रिया करणारे मानद डॉ. धर्माधिकारी यांनी एकुण १७ प्रकारच्या कॅथेटर, गाईडींग वायर व इतर साहित्याची मागणी केली होती.

सदरचे साहित्य हे मे. रेणुका सर्जिकल, औरंगाबाद यांचेकडून तातडीने खरेदी केलेले आहे. त्यांनी दि. २०/०५/२००६ रोजी पुरवठा केला असून त्यासाठी रु. १,१८,७३०/- इतका खर्च आलेला आहे.

तरी सदरचे साहित्य खरेदीस व याकामी आलेला खर्च रु. १,१८,७३०/- खर्चास कार्योत्तर मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली.

याचवेळेस ॲन्जीओग्राफी व ॲन्जीओप्लॅस्टीसाठी कार्डीओलॉजीकल मटेरीयल विहित पद्धतीने कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांकडून किमान ३ कोटेशन मागवूनच खरेदी करण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली. तसेच कोटेशन मागविणेपूर्वी त्या त्या क्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा व ब्रॅण्ड ठरवून घेऊनच खरेदी करावी असे ठरले, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**०४) ॲटोलॉग सिस्टीम खरेदीबाबत**

श्री साईबाबा रुग्णालयात नव्याने बायपास सर्जरी सुरु करण्यात आलेल्या आहेत. सदरचे शस्त्रक्रिया करतेवेळी किंवा त्यानंतर रक्त दयावे लागते. त्याऐवजी जर आपण वरील मशिन खरेदी केले तर सदरचे मशिन शस्त्रक्रियेतील रक्त जमा करुन त्याचेवर आपोआप प्रक्रिया करते व त्यातील RBC च्या सेल (पेशी) धुऊन दुसऱ्या बाजूस साठा करुन ठेवते व ते साठवून ठेवलेले रक्त पुन्हा ऑपरेशनच्या वेळेस किंवा त्यांनतर त्याचा रुग्णास वापर करता येतो.

यामुळे रुग्णास रक्त संक्रमण करण्याची गरज पडत नाही. नविन रक्त पुरवठयामुळे होणारे इतर दुष्परीणाम टाळता येतात. इत्यादी फायदा होतो.

मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांनी त्यांचे दि. २०/०५/२००६ चे पत्रान्वये सदर मशिनची किंमत रु.११,८१,२५०/- (सर्व करांसहित) अशी कळविली आहे. तर त्यासाठी लागणारे किरकोळ कन्झुमेबल साहित्याची किंमत रु. १०,१२५/- इतकी कळविली असून एकुण खरेदीकामी रु. ११,९१,३७५/- इतका खर्च येणार आहे.

सदरचे कोटेशनवर रुग्णालयाचे मानद कार्डीयाक सर्जन डॉ. अभय वालीया यांनी खरेदीबाबत शिफारस केलेली असून मा. विश्वस्त डॉ. पी.एल. तिवारी साहेब यांची स्वाक्षरी आहे. सदरचे खरेदीकामी सुमारे रु.११,९१,३७५/- खर्च येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईबाबा हॉस्पिटलसाठी आवश्यक असणारे ॲटोलॉग सिस्टम खरेदीकामी निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**०५) कार्डीयाक सर्जरीसाठी तातडीचे हत्यारे खरेदीबाबत**

श्रीसाईबाबा रुग्णालयात बायपास सर्जरीसाठी कार्डीयाक ओ.टी. विभागाने शस्त्रक्रियेसाठी ७ प्रकारचे हत्यांराची तातडीने खरेदीची दि. २३/०५/२००६ चे पत्रान्वये मागणी केलेली आहे. सदरची हत्यारे तातडीचे असल्याने याकामी चार उत्पादक कंपन्याकडून फॅक्सवर कोटेशन मागविण्यात आले होते.

त्यांचे तुलनात्मक दरांचा तक्ता खालीलप्रमाणे असून त्यामध्ये मालाचा दर्जा पाहून डॉ. मारपाकवार, कार्डीयाक सर्जन यांचे शिफारसीनुसार खरेदीची शिफारस केलेली आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी एकुण रु. ५१,७८३.७५ इतका खर्च येणार आहे.

| Sr.No | Item Name | Qty. | Zenith Surgical Mumbai | Kalelkar Surgical Mumbai | B.L. Lifescience Mumbai | Bombay Surgical Mumbai | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01. | Retrograde fine Vascular Forcep 8" | 2 | **5866.87** | | | 956.25 | 11733.75 |
| 02. | Bulldog Plastic | 3 | | | **5062.50** | | 15187.50 |
| 03. | Silling Coronary | 1 | | | | | |
| 04. | Cooley Retractor Medium | 1 | 1406.25 | | | **1350.00** | 1350.00 |
| 05. | Cooley Retractor Small | 1 | 1406.25 | | | **1350.00** | 1350.00 |
| 06. | Surgi Loop Big, Medium Small Each 01 | 3 | | 5220.00 | **3825.00** | | 11475.00 |
| 07. | Tubb Dialators | 1 | **10687.50** | | | 13500.00 | 10687.50 |
| | | | | | | **Total Amt.Rs.** | **51783.75** |

तरी उपरोक्त तक्त्यात शिफारस केल्याप्रमाणे सदरची हत्यारे तातडीने खरेदी करण्यास व याकामी येणारा खर्च रु. ५१,७८३.७५ चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,कोटेशनसादरकर्त्यांनी देऊ केलेले दर, हत्यारांचा दर्जा या सर्व बाबीचा विचार करुन निम्नतम दर स्वीकारणेची शिफारस करण्यात आली होती, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**०६) पेसमेकर खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये ऑपरेशनचे वेळेस व ऑपरेशन नंतर पेसमेकर वापरावे लागते. सदरचे पेसमेकर खरेदीकामी श्री साईबाबा रुग्णालयाचे इतर मशिनरी / उपकरणे / सर्जिकल हत्यारे इत्यादी खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१२/२००५ चे सभेत निर्णय क्रमांक ८२० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार याकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन विहित पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदांचा दि. ११/०२/२००६ चे सभेत झालेल्या वाटाघाटीनंतरचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०४/०३/२००६ रोजीचे सभेपुढे ठेवण्यात आला होता. याच वेळी चर्चा/वाटाघाटीसाठी संस्थानने तज्ञ सल्लागार म्हणून बोलविलेले ०५ बायोमेडीकल इंजिनीअर, विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी, रुग्णालयाचे प्रोजेक्ट रिपोर्ट करणारे डॉ. विनय कोठारी हे उपस्थित होते. त्यांचे उपस्थितीत मशिनरी / उपकरणे / हत्यारे खरेदीबाबतचा निर्णय

घेण्यात आला होता. परंतु वरील पेसमेकर खरेदीबाबत निर्णय घेण्यात आला नव्हता. आपण मागणीमध्ये दोन प्रकारचे पेसमेकरची मागणी केलेली होती.

पेसमेकर सिंगल - ०१ नग व डबल - ०१ नग याकामी निविदेस अनुसरून खालीलप्रमाणे दर आलेले होते.

| Name of Machine | Qty. | Make / Model | Original Rate | Rate after Negotiation | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| ➢ **Pace Maker - SINGLE** | **1** | | | | |
| 01. Vaibhav Agency,Pune | 1 | Single (Medical Inc.Make) | 87500.00 | 83125.00 | 83125.00 |
| 02. Kanchan Drugs,Pune | 1 | Single (Medtronic Co) | 99249.00 | 96271.53 | 96271.53 |
| 03. Emergent Meditech,Mumbai | 1 | Single | 105187.00 | 100000.00 | 100000.00 |
| | | | | | |
| ➢ **Pace Maker - DUAL** | **1** | | | | |
| 01. Kanchan Drugs,Pune | 1 | Dual (Medtronic Co) | 206250.00 | 200062.50 | 200062.50 |
| 02. Emergent Meditech,Mumbai | 1 | Dual | 210037.00 | 200000.00 | 200000.00 |
| 03. Vaibhav Agency,Pune | 1 | Dual (Medical Inc.Make) | 234000.00 | 222300.00 | 222300.00 |

वरील तुलनात्मक तक्त्यात मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांनी मेडट्रॉनीक कंपनीच्या पेसमेकरचे दर दिलेले आहेत. मेडट्रॉनीक कंपनीचे पेसमेकर हे नामांकित कंपनीचे असून ते आपणास खरेदी करावयाचे होते.

मे. मेडट्रॉनीक इंडीया प्रा. लि. मुंबई यांनी त्यांचे दि. २०/०४/२००६ चे पत्रान्वये मे. कांचन ड्रग्ज, पुणे हे आमचे आता अधिकृत विक्रेते नसून त्यांचेऐवजी मे. मेडीको इक्वीपमेंट (इं) प्रा.लि.,मुंबई हे अधिकृत विक्रेते असलेबाबत कळविले आहे.

मे. मेडीको इक्वीपमेंट (इं) प्रा.लि.,मुंबई यांनी त्यांचे दि. २१/०४/२००६ चे पत्रान्वये कोटेशन फॅक्सवर पाठविलेले आहे. त्यांचे दर खालीलप्रमाणे -

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | दर सर्व करांसह | |
|---|---|---|---|
| | | सिंगल पेसमेकर | डबल पेसमेकर |
| ०१. | मे. मेडीको इक्वीपमेंट (इं) प्रा.लि.,मुंब | १,१२,५००.०० | २,२५,०००.०० |

वरीलप्रमाणे मे. मेडीको इ.क्वीपमेंट (इं) प्रा.लि.,मुंबई यांचे पत्र मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी साहेब यांचे मान्यतेसाठी पाठविले होते. त्यांनी प्रत्येकी दोन नग खरेदीस मान्यता दिली आहे. त्यासाठी दोन्ही प्रकारच्या पेसमेकरसाठी रु. ६,७५,०००/- इतका खर्च येईल.

दि. २६/०४/२००६ च्या टिपणीन्वये पेसमेकर खरेदीबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. प्रशासकीय अधिकारी यांचेशी झालेल्या समक्ष चर्चेनुसार मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांना दुरध्वनीवरुन विचारणा करुन तुम्ही मेडट्रॉनीक कंपनीचे पेसमेकर निविदेतील दरास अनुसरुन पुरवठा करु शकता किंवा कसे ? याबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यानुसार मे. कांचन ड्रग्ज, पुणे चे मालक श्री. घाटे यांचेशी दि. ०२/०५/२००६ रोजी दुरध्वनीवरुन चर्चा केली असता त्यांनी आपण ऑर्डर दिल्यास आम्ही निविदेतील मंजुर दराने चार दिवसाच्या आत पुरवठा करण्यास तयार आहोत असे सांगितले होते. परंतु मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांनी पुन्हा दि. ०३/०५/२००६ चे पत्रान्वये आम्ही मेडट्रॉनीक कंपनीचे पेसमेकर पुरवठा करु शकणार नाही असे पत्र दिलेले आहे.

दि. ०३/०५/२००६ रोजी मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी साहेब यांनी दुरध्वनीवरून असे सांगितले की मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांचेकडे एजन्सी नसल्यामुळे पुरवठा करु शकणार नाही. पुरवठा केल्यास जुने मटेरीयल पुरवठा करु शकतील तेंव्हा सदर पेसमेकरची ऑर्डर मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांना न देता मे. मेडीको इक्वीपमेंटस, मुंबई यांना देण्यात यावी असे सांगितले. त्यानुसार आपणाकडे तातडीचे बायपास सर्जरी असल्यामुळे मे. मेडीको इक्वीपमेंटस, मुंबई यांना दुरध्वनीवरुन पुरवठा करण्यास सांगितले होते व त्यांनी मालाचा पुरवठा केलेला आहे.

तरी वरीलप्रमाणे मे. मेडीको इक्वपीमेंटस, मुंबई यांचेकडून खरेदी केलेल्या पेसमेकर खरेदीस व त्याकामी रु. ६,७५,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली होती, त्यास मान्यता देण्यात आली.

येथुनपुढे खरेदीपूर्वी मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी, यांचेकडून स्पेसीफीक ब्रॅण्ड ठरवुन घेऊन, मा.उपसमिती/व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन अधिकृत विक्रेत्यांकडून कोटेशन मागविण्यात येऊन खरेदी करावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**०७) ऑक्सीजन सिलेंडर्स खरेदीबाबत.**

नविन श्री साईबाबा रुग्णालयात तातडीचे सेवेच्या वेळेस लागणाऱ्या रिकामे पोर्टेबल ऑक्सीजन, नायट्रस इत्यादी सिलेंडर्स खरेदीसाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०२.१०.२००५ निर्णय क्र.६१४ अन्वये येणाऱ्या अंदाजे खर्चास व खरेदीस मंजुरी मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात आल्या होत्या. परंतू सदरचे सिलेंडर्स खरेदीसाठी कोणाचेही निविदा न प्राप्त झाल्याने सदर विषयावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५.११.२००५ चे सभेत चर्चा होऊन या कामी उत्पादक कंपन्या/ अधिकृत विक्रते यांचेशी थेट संपर्क साधुन त्यांचेकडून दरपत्रक मागवुन त्यानुसार विश्वस्तांसोबत मालाची पाहणी करुन खरेदी करावे असे ठरले.

सदरचे सिलेंडर्ससाठी बाजारात मे. बालाजी ट्रेडींग, संगमनेर व मे. सागर एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांना दुरध्वनी वरुन चौकशी करुन कोटेशन पाठविण्यास सांगितले. मे. सागर एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांनी सदरच्या ऑक्सीजन व नायट्रस सिलेडर्सची एकमेव नामांकित उत्पादक कंपनी मे. एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स लि., मुंबई ही आहे. त्यांच्या शिवाय तुम्हाला बाजारात कोठेही सिलेडर्स मिळणार नाही असे दुरध्वनीवरुन सांगून कोटेशन देण्यास नकार दिला. त्यापैकी मे. बालाजी ट्रेडींग, संगमनेर यांनी आपले कोटेशन पाठविले आहे.

मे. एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स लि., मुंबई यांना दुरध्वनीवरुन कळवुन आपणास पाहिजे असलेल्या सिलेंडर्सचे कोटेशन पाठविण्यास सांगितले होते. मे. एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स लि., मुंबई यांनी त्यांचे दि.०५.११.२००५ चे पत्रान्वये दरपत्रक पाठवले आहे. मे. एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स लि., मुंबई व मे. बालाजी ट्रेडींग, संगमनेर यांचे तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहेत-

| अ.नं. | नाव | मागणी | मे. एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स , मुंबई | मे. बालाजी, संगमनेर | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑक्सीजन सिलेंडर्स १.५ क्युबीक | २५ | **४५०६.२३** | ४७२५.०० | **११२६५५.७५** |
| २ | ऑक्सीजन सिलेंडर्स १ क्युबीक | २५ | **३६२९.१८** | ४३८७.५० | **९०७२९.५०** |
| ३ | नायट्रस सिलेंडर्स १ क्युबीक | २५ | **३६२९.१८** | ४३८७.५० | **९०७२९.५०** |
| | | | | | **२,९४,११४.७५** |

वरील तुलनात्मक दरांचा विचार करता मे. एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स, मुंबई यांचे निम्नतम दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. २,९४,११४.७५ इतका खर्च येणार आहे. सदर कंपनीचे सिलेंडर्स ३-४ महिन्यापुर्वी साईनाथ रुग्णालयात १० नग देणगी म्हणून एका साईभक्ताने दिलेले आहेत व त्यांचा अनुभव चांगला आहे.

सदरचे सिलेंडर खरेदीबाबत मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचेशी मे. एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स, मुंबई यांना दरामध्ये सुट देणेबाबत चर्चा करण्यास सांगण्यात आले होते. आपले संस्थानसाठी खालीलप्रमाणे प्रती सिलेंडर्स सुट देऊ इच्छितो असे दि. २८/१२/२००५ चे पत्रान्वये कळविले आहे.

1. Liter w.c Cylinder (1.5 Cubic) Rs. 300/- प्रती सिलेंडर सुट
2. 5 Liter w.c Cylinder (1 Cubic) Rs. 200/- प्रती सिलेंडर सुट

त्यानुसार सुट देऊ केल्यानंतर सदरचे खरेदीकामी रु. २,७६,६१४.७५ इतका खर्च येईल. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नाव | मागणी | मे. एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स, मुंबई यांचे मुळ दर | मे. एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स , मुंबई यांचे सुटी नंतरचे दर | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑक्सीजन सिलेंडर्स १.५ क्युबीक | २५ | ४५०६.२३ | **४२०६.२३** | **१०५१५५.७५** |
| २ | ऑक्सीजन सिलेंडर्स १ क्युबीक | २५ | ३६२९.१८ | **३४२९.१८** | **८५७२९.५०** |
| ३ | नायट्रस सिलेंडर्स १ क्युबीक | २५ | ३६२९.१८ | **३४२९.१८** | **८५७२९.५०** |
| | | | | **एकुण रक्कम रु.** | **२७६६१४.७५** |

त्यानुसार सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५/११/२००५ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र. ६९८(ड) अन्वये व दि. १८/०१/२००६ चे मंजुर टिपणी अन्वये इकडील जा.क्र.एसएसएस /एसएसएच /स्टोअर/१२०३ दि. २८/०१/२००६ अन्वये ३ प्रकारच्या ७५ सिलेंडर्सचा रु. २,७६,६१४.७५ इतक्या रुपयाचा पुरवठा आदेश देण्यात आला होता.

मे. एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स, मुंबई यांनी आदेश मिळाल्यानंतर पुरवठा आदेशात खालीलप्रमाणे बदल करुन मागितला होता.

| अ.नं. | पुरवठा आदेशातील अटी | अ.नं. | पुरवठा धारकाने सुचविलेला बदल |
|---|---|---|---|
| 1 | F.O.R. Shirdi | 1 | F.O.R. Aurangabad |
| 2 | Price inclusive of all taxes | 2 | Taxes extra |
| 3 | 5% Security Deposit | 3 | Not ready to deposit 5% Security Deposit |
| 4 | Payment 100% after receipt of material | 4 | 100% Advance Payment OR At least 30% Advance |

मे.एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स, मुंबई यांना पत्र क्र. ६५४१ दि. २२/०५/२००६ अन्वये आपणास ५ टक्के सुरक्षा रक्कम न भरणेबाबत विशेषबाब सुट देण्यात येत आहे. तसेच आपण सिलेंडर्स औरंगाबाद येथे पाठवावे व तेथुन संस्थानचे खर्चाने सिलेंडर आणण्यात येतील. तसेच औरंगाबाद येथे सिलेंडर्स ताब्यात घेतेवेळीस डी.डी. सुपुर्त करण्यात येईल असे कळविण्यात आले होते. परंतु मे. एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स, मुंबई यांनी दि. ३०/०५/२००६ चे पत्रान्वये आपणास १०० % आगाऊ रक्कम दयावी लागेल, असे कळविले आहे. त्यांचेकडून खरेदी करावयाचे ७५ सिलेंडर्सची एकुण रक्कम त्यांचे दि. ०५/११/२००५ चे कोटेशननुसार व दि. २८/१२/२००५ चे पत्रातील दिलेल्या सुटीनुसार रु.२,७६,६१४.७५ इतकी होते.

मे. एव्हरेस्ट केंटो सिलेंडर्स, मुंबई यांनी दि. ३०/०५/२००६ चे पत्रासोबत दिलेल्या प्रोफार्मा इनव्हाईस नं. ३१६९ दि. ३०/०५/२००६ अन्वये एकुण रु. २,७२,९४५/- इतका खर्च कळविला आहे. मा. विश्वस्त समितीचे मान्यतेस अधिन राहून डि.डि. काढणेस लेखाशाखेकडे पाठविण्यात आलेला आहे. त्याची नोंद घेण्यात येऊन करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली होती, ती मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**०८) तातडीचे औषधे, सर्जिकल साहित्य खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत-**

श्री साईबाबा रुग्णालय हे दि. १५/०५/२००६ पासून कार्यान्वित झालेले आहे. सदरचे रुग्णालयात एकुण ०५ शस्त्रक्रियागृह व विविध वॉर्ड आहेत. रुग्णालयातील सर्वच विभाग हे नविनच आहे. बरेचसे विभाग हे नव्यानेच चालु करण्यात आले आहे. त्यामुळे आपण रुग्णालयात या पुर्वीची खरेदीतील औषधे, साहित्य हि कमी पडतात. त्यामुळे नविन विभाग चालु करण्यासाठी लागणारी काही किरकोळ साहित्य, औषधे, सर्जिकल मटेरीयल खरेदी करावी लागतील.

सन २००५-०६ या वर्षामध्ये फक्त श्री साईनाथ रूग्णालयास औषधे खरेदी करण्यात आलेली होती व सन २००६-०७ या वर्षात औषधे खरेदीचे नियोजन करताना त्यात दोन्ही रुग्णालयाचे औषधे खरेदीचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे सध्या साईनाथ रुग्णालयाकरीता उपलब्ध असलेली औषधे दोन्ही ठिकाणी वापरण्यात येत आहे. त्यामुळे औषधांचा तुटवडा भासत आहे. नविन औषधे उपलब्ध होण्यास २ महिन्याचा कालावधी लागेल. त्यामुळे तातडीने औषधे खरेदी करावी लागलेली आहे. ती नगर, नाशिक, मुंबई, कोपरगांव, श्रीरामपुर, पुणे, दिल्ली येथील अशा १२ अधिकृत विक्रेते यांचेकडून खरेदी केलेली आहेत. त्यासाठी एकुण रु.१,४०,२५३.१९ इतका खर्च आलेला आहे. दैनंदिन कामकाजासाठी सदरची खरेदी करणे गरजेचे असल्यामुळे खरेदी केलेली असुन सदरचे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देणेची शिफारस करण्यात आली.

याचवेळेस रुग्णालयामध्ये रुग्णांकरिता वापरण्यात येणारे औषधांची यादी सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना पुरविण्यात यावी व त्यांचे मागणीनुसार औषधांचे कोटेशन मागविण्यात यावे. मागविण्यात आलेल्या औषेधांचीच वैद्यकीय अधिकारी यांनी रुग्णांना देण्याची शिफारस करावी बाहेरुन औषधे लिहून देण्याचे टाळावे. अशा सुचना संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका यांनी द्याव्यात.

**०९) कार्डीयाक कन्झुमेबल साहित्य खरेदीस व खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयात नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये अॅन्जीओग्राफी व अॅन्जीओप्लॅस्टी तपासण्या / उपचार हि दि. १८/०२/२००६ पासून कार्यान्वित झालेले आहे. सदरचे तपासण्या / शस्त्रक्रिया करण्यासाठी लागणारे डायग्नोस्टीक कॅथेटर, गाईडींग काथेटर, स्टेन्ट, बलून इत्यादी सर्जिकल साहित्य हे साधारणत: ३० रुग्णांना पुरु शकेल इतके साहित्य खरेदीकामी रु. ११,०१,७५८.५० चा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०४/०३/२००६ च्या सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरच्या प्रस्तावास निर्णय क्र. १३१ अन्वये सदरची खरेदी ही वार्षिक औषधे खरेदीमध्ये समाविष्ट करण्यात यावी तत्पुर्वी काही शस्त्रक्रिया/तपासण्या करावयाचे नियोजन झाल्यास तितकेच साहित्य मंजुर दराने आवश्यकतेनुसार खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार मे. रेणुका सर्जिकल, औरंगाबाद यांचेकडून वरील साहित्य कोटेशनमधील मंजुर दराने खरेदी करण्यात आली होती. सदर साहित्याची वार्षिक औषधे खरेदीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे.

अ) रु. ११,०१,७५८.५० पैकी मे. रेणुका सर्जिकल, औरंगाबाद यांना मंजुर दरानुसार रु. ७,३४,०९०/- इतक्या रक्कमेची सर्जिकल साहित्य होते व ते आतापर्यंत खरेदी केलेले आहे. परंतु आजपर्यंत रुग्णालयामध्ये १८४ ॲन्जीओग्राफीच्या तपासण्या व २६ ॲन्जीओप्लॅस्टीच्या शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्यामुळे सदरचे साहित्य हे अपुरे पडल्यामुळे ते मे. रेणुका सर्जिकल, औरंगाबाद यांचेकडून वेळोवेळी तातडीने खरेदी केलेली आहेत. त्यासाठी रु. १,८२,८९३.७६ इतका खर्च आलेला आहे. मे. रेणुका सर्जिकल, औरंगाबाद यांनी कोटेशनमधील मागणी केलेली संख्या पुर्ण केलेली असल्यामुळे त्या व्यतिरीक्त पुरवठा केलेल्या साहित्याचे नविन दराप्रमाणे दर आकारलेले आहेत.

ब) याशिवाय ॲन्जीओग्राफीची तपासणी करण्यासाठी लागणारे इंजेक्शन (dye) आपलेकडे उपलब्ध नसल्यामुळे ती मे. मीना एजन्सी, नाशिक यांचेकडून होलसेल दरात खरेदी करावे लागले. त्यासाठी रु. ५७,७२२.९३ इतका खर्च आलेला आहे. सदरची खरेदी हि माहे एप्रिल - मे या दोन महिन्यात आवश्यकतेनुसार केलेली असून त्यासाठी एकुण रू. २,४०,६१६.६९ इतका खर्च आलेला आहे. तरी सदरचे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेबाबतची शिफारस करण्यात आली होती, ती मान्य करण्यात आली.

याचवेळी श्री साईबाबा रुग्णालयासाठी आवश्यक असणारे कार्डीयाक कन्झुमेबल साहित्य औषधे इत्यादी एक वर्षासाठी पुरु शकतील अशी मागणी सध्याच्या झालेल्या शस्त्रक्रिया, तपासण्या यांचा आढावा घेऊन मागणीत सुधारणा करुन ती वार्षिक औषधे खरेदीमध्ये खरेदी करण्यात यावे असे ठरले, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**१०) <u>सर्जिकल हत्यारे खरेदीबाबत...</u>**

श्री साईबाबा रुग्णालय हे दि. १५/०५/२००६ पासून कार्यान्वीत झालेले आहे. सदरचे रुग्णालयात विविध वॉर्ड व शस्त्रक्रिया विभागात दैनंदिन कामकाजासाठी विविध प्रकारची हत्यारे लागतात. त्यासाठी सर्व वॉर्डची मागणी एकत्र करुन अंतिम मागणी तयार करण्यात आलेली आहे. त्यासाठी मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई व बॉम्बे सर्जिकल, मुंबई यांचेकडून फॅक्सवर कोटेशन मागविण्यात आली होती.

मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई व बॉम्बे सर्जिकल, मुंबई यांचे हत्यारे चांगल्या प्रकारची असल्याने दोनच पुरवठा धारकांकडून कोटेशन मागविण्यात आले होते. त्याचा तुलनात्मक दरांचा तक्ता सोबत सादर केला आहे. त्यातील निम्नत्तम ज्या ठिकाणी दोघांचे दर प्राप्त झालेले आहेत तेथे निम्नत्तम दरांची शिफारस करण्यात आलेली आहे. तर ज्या ठिकाणी एकाचेच दर प्राप्त झालेले आहे. तेथे त्याची शिफारस करण्यात आलेली आहे. शिफारसीनुसार सदरचे खरेदीकामी एकुण रु. ३,८२,९७८.१३ इतका खर्च येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सर्जिकल हत्यारांच्या नामांकित कंपन्या व स्पेसिफिकेशन्स निश्चीत करुन कोटेशन्स मागविण्यात यावेत असे ठरले, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**११) <u>बायपास शस्त्रक्रिया शुभारंभ-व्हीडीओ कॉन्फरसींग खर्चाबाबत-</u>**

दिनांक ७.०५.२००६ रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषद व पहिले बायपास सर्जरीचे शुभारंभाचे ऑपरेशन ऑपरेशन थिएटरमधून पत्रकार परिषदेसमोर थेट प्रक्षेपण करणेकामी मे.व्हिजन टेक्नीक, मुंबई यांना मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी सांगितले होते.

मे.व्हिजन टेक्नीक, मुंबई यांनी उपरोक्तकामी त्यांचे दिनांक ११.०५.२००६ चे बीलाने सर्व्हिस टॅक्ससह रुपये ४५,४५७.०० चे बील सादर केले आहे.त्यानुसार मे.व्हिजन टेक्नीक, मुंबई यांना बिलाची रक्कम रुपये ४५,४५७.०० आदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**१२) <u>साईबाबा रुग्णालया सुधारित चार्जेसबाबत-</u>**

दिनांक २५.०५.२००६ रोजी शिरडी येथे झालेल्या उपसमितीचे सभेत साईबाबा हॉस्पिटलचे सुधारित चार्जेसबाबत चर्चा होऊन दर निश्चीत करण्यात आले होते. सदरचे इतिवृत्त व्यवस्थापन समितीचे दिनांक ३.६.२००६ चे सभेत कायम होत असतांना चर्चेचेवेळी मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी वरीलप्रमाणे प्रस्तावित दर पुन्हा तपासून त्यामध्ये काही सुधारणा कराव्या लागतील असे सुचविले त्यास मान्यता देण्यात आली. अंतिम दर निश्चित होईपर्यन्त वरीलप्रमाणे दर आकारणी करावी असे ठरले.

त्यानुसार आजचे सभेत सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील दरांबाबत डॉ.के.एन.टिंगरे, वैद्यकीय संचालक, वैद्यकीय प्रशासक डॉ.पटवर्धन, व डॉ.सौ.ए.एस.पेंडसे यांनी एकत्रित विचार विनिमय करुन सुधारित दर अंतिम करावे असे ठरले, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

## १३) श्री.सुधांशु परशुराम लोकेगांवकर, यांचे वैद्यकीय बीलाबाबत-

श्री. सुधांशू परशुराम लोकेगावकर, संगित व कला मार्गदर्शक (कन्या विद्यामंदिर विभाग) यांनी एकुण रु. १७१४२९/- चे जसलोक व बालाजी हॉस्पिटलची उपचाराची बीले परतावा मिळणेकामी सादर केली होती. वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ प्रमाणे रु.१,३७,१४३/- मात्र मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०४/०२/२००६ च्या निर्णय क्र. २६ नुसार अदा करण्यात आलेली आहे.

श्री.सुधांशु परशुराम लोकेगांवकर यांनी दि. १५/०४/२००६ च्या पत्रान्वये उर्वरीत रक्कम रु. ३४,२८६/- मिळणेकामी अर्ज सादर केलेला आहे.

मा. विश्वस्त डॉ. ए. भा. गोंदकर व डॉ. पी. एल. तिवारी साहेब यांनी श्री. सुधांशु परशुराम लोकेगांवकर यांना विशेष बाब म्हणून रक्कम रु. ३४,२८६/- अदा करणेबाबत शिफारस केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

## १४) लॅप्रोस्कोपीक इन्स्ट्रुमेंट खरेदीबाबत...

श्रीसाईबाबा रुग्णालयाचे जनरल सर्जरीचे ऑपरेशन थिएटरमध्ये लॅप्रोस्कोपी सर्जरी करण्यासाठी डॉ. रेड्डी यांनी खालीलप्रमाणे इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली आहे.

| Sr. | Particular |
|---|---|
| 01 | $30^0$ Telescope 10mm |
| 02 | 10mm Trocar with cannula |
| 03 | 5mm Trocar with cannula |
| 04 | port closer needle spring loaded |
| 05 | Blunt Trocar 10mm |
| 06 | Duck Bill 5mm |
| 07 | Clip Applicator 5mm |

सदर लॅप्रोस्कोपीक इन्स्ट्रुमेंट दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी तातडीने आवश्यक असल्यामुळे याकामी ०५ अधिकृत विक्रेते यांचेकडून फॅक्सवर कोटेशन मागविण्यात आले आहेत ते खालीलप्रमाणे-

१) मे. बॉम्बे सर्जिकल, मुंबई
२) मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई
३) मे. पुनम सर्जिकल, मुंबई
४) मे. अमेय सर्जिकल, मुंबई
५) मे. अर्चना सर्जिकल, मुंबई

सदर कोटेशनचा तुलनात्मक दरांचा तक्ता तयार करुन तो आजचे सभेत सादर करण्यात आला होता. तो खालीलप्रमाणे

| Sr. | Particular | Qty | Bombay, Mumbai | Kalelkar Mumbai | Poonam Mumbai | Ameya, Mumbai | Archan, Mumbai | Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | $30^0$Telescope 10mm | 1 | | **140625.00** | | | | 140625.00 |
| 02 | 10mm Trocar with cannula | 1 | 8212.50 | **4500.00** (10.5mm) | 7875.00 | 8100.00 | 7650.00 | 4500.00 |
| 03 | 5mm Trocar with cannula | 3 | 8043.75 | **4500.00** (5.5mm) | 7875.00 | 8100.00 | 7650.00 | 13500.00 |
| 04 | port closer needle spring loaded | 1 | 3375.00 | **1237.50** | 3937.50 | 4162.00 | 3825.00 | 1237.50 |
| 05 | Blunt Trocar 10mm | 1 | 8212.50 | **1192.50** (10.5mm) | 7875.00 | 8100.00 | 7850.00 | 1192.50 |
| 06 | Duck Bill 5mm | 1 | **4162.50** | 6187.50 | 4275.00 | 4500.00 | **4162.50** | 4162.50 |
| 07 | Clip Applicator 5mm | 1 | 8100.00 | 8437.50 | 7875.00 | 8100.00 | **7650.00** | 7650.00 |
| | **Total Rs.** | | | | | | | 1742867.50 |

सदर तक्त्यातील अ.नं. ०१ करीता मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचे एकमेव दर प्राप्त झालेले असून त्यांनी रु. १,४०,६२५/- इतकी किंमत नमुद केलेली आहे. सदरचे दर योग्य असल्याने ते स्विकारावे असे मत आहे. उर्वरीत अ.नं. २ ते ५ करीता निम्नत्तम दरांची शिफारस करण्यात आलेली आहे.

वरील शिफारसीनुसार सदरचे लॅप्रोस्कोपीक इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी रु. १,७२,८६७.५० इतका खर्च येणार आहे. तरी वरील तक्त्यात शिफारस केल्याप्रमाणे लॅप्रोस्कोपीक इन्स्ट्रुमेंट खरेदीस व याकामी येणारा खर्च रु. १,७२,८६७.५० च्या खर्चास मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

## १५) सुचर्स मटेरीयल खरेदीबाबत

श्री साईबाबा रुग्णालयाच्या आर्थोपेडीक विभागाने त्यांचे डि.पी. क्र. ८१२० दि. १६/०५/२००६ अन्वये दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी एकुण ३३ प्रकारच्या सुचर्स मटेरीयलची मागणी केलेली आहे. सदरचे सुचर्स शस्त्रक्रियेसाठी तातडीने आवश्यक असल्यामुळे फॅक्सवर जॉन्सन ॲन्ड जॉन्सन कंपनीकडून व त्यांचे

मुंबई येथील अधिकृत विक्रेते रॉकी डिस्ट्रीब्युटर्स, मुंबई व ओम साई सर्जिकल, मुंबई यांचेकडून देखील कोटेशन मागविण्यात आले होते. सदरचे कोटेशनचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो आजचे सभेत सादर करण्यात आला होता.

सदरच्या तक्त्यात अ.नं. २, ६, ८, १४, १९, २५ करीता एकाच पुरवठाधारकाचे दर आलेले आहेत. तर अ.नं. १६, २८, ३१ करीता कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही. उर्वरीत आयटमसाठी निम्नत्तम दरांची शिफारस करण्यात आलेली आहे. त्यानसार सदरचे खरेदीकामी एकुण रु. १,२१,८५२.९४ इतका खर्च येणार आहे. सदरचे सूचर्स खरेदी करणेस व याकामी येणारे एकूण रुपये १,२१,८५२.९४ खर्चास मान्यता देण्यात आली.(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**१६) <u>प्रयोगशाळेकरीता व्हॅक्युटेनर बाबत</u>**

श्रीसाईबाबा रुग्णालय दि. १५/०५/२००६ रोजी कार्यान्वित झालेले आहे. सदर रुग्णालयाच्या प्रयोगशाळा विभागाने ब्लड कलेक्शनसाठी काही व्हॅक्युटेनरची मागणी केलेली आहे.

सदरची मागणी तातडीची असल्याकारणाने - (०१) मे. मिडास डायग्नोस्टीक, मुंबई, (२) मे. ॲमेस हेल्थकेअर, मुंबई, (३) मे. निधी लाईफकेअर, ठाणे या पुरवठा धारकांकडून फॅक्सव्दारे कोटेशन मागविण्यात आले होते. सदर पुरवठाधारकांनी फॅक्सव्दारे कोटेशन पाठविले असून त्यांचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेत सादर करण्यात आला होता. या तुलनात्मक तक्त्यातील दरांचा विचार करता मे. निधी लाईफकेअर, ठाणे यांचे दर निम्नत्तम असून त्यांच्या दरांची शिफारस केलेली आहे. तरी मे. निधी लाईफकेअर, ठाणे यांचेकडून व्हॅक्युटेनरच्या खरेदीस व रु. २१,७३०/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**१७) <u>कन्झुमेबल स्पेअर पार्टचे कोटेशन उघडणेबाबत</u>**

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २४/०४/२००६ च्या सभेत निर्णय क्र. २६६ च्या मंजुरी अन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील मशिनरी / उपकरणे दुरुस्ती व देखभालीसाठी बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत काही कन्झुमेबल स्पेअर पार्ट खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.३,७७,१४६/- चे खर्चास व कोटेशन मागविण्यास मंजूरी मिळाली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. ६४०१ दि. १८/०५/२००६ अन्वये एकुण १५ अधिकृत विक्रेते यांचेकडून दि. २९/०५/२००६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते.त्यानुसार खालीलप्रमाणे ०७ कोटेशन प्राप्त झालेले आहेत.त्यापैकी अ.नं. २ ते ६ ही कोटेशन टपालात उघडण्यात आली .

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| १ | मे. अलमेड इक्विपमेंटस, नवी मुंबई |
| २ | मे. देवी सर्जिकल, अहमदनगर |
| ३ | मे. हॉस्पिकेअर, अहमदनगर |
| ४ | मे. ॲड्राईड मेडीकल, पुणे |
| ५ | मे. नॅट स्टील इक्विपमेंटस, मुंबई |
| ६ | मे. शीलर हेल्थकेअर, पुणे |
| ७ | मे. सिध्दार्थ इंजिनीअरींग, मुंबई |
| ८ | मे. साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंटस, लोणी |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली अ.नं. १, ७ व ८ हे कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले.या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**१८) <u>विद्युत, पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, स्टेशनरी साहित्य,स्वच्छता व बगीचा साहित्य खरेदीकामी आलेल्या निविदा उघडणे बाबत.</u>**

व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०४.२००६ चे सभेतील निर्णय क्र.२७१ अन्वये सन २००६-०७ सालामध्ये संस्थानचे विद्युत, पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, बांधकाम,बगीचा,स्वच्छता विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक साहित्य तसेच कार्यालयीन व संगणक स्टेशनरीचे वार्षिक खरेदीस व त्याकामी येणारे खर्चास तत्वतः मान्यता मिळालेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| ०१. | विद्युत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण विभाग | रु.३३,२४,६६२.७५ |
| ०२. | स्वच्छता व बगीचा विभाग | रु. ६,६९,२५०.०० |
| ०३. | बांधकाम विभाग | रु. ३,३७,१७५.०० |
| ०४. | कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी | रु.१३,९३,२४७.५० |
| | एकुण | रु.५७,२४,३३५.२५ |

त्यानुसार दिनांक १०-१२.०६.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दिनांक १२.०६.२००६ ते दिनांक २२.६.२००६ अखेर निविदा विक्री करण्यात आलेली असून दिनांक २३.०६.२००६ अशी निविदा स्विकारणेची मूदत ठेवण्यात आलेली होती. सदरील निविदा २ लिफाफा पध्दतीने मागविण्यात आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मूळ निविदा व क्र.०२५ चे लिफाफ्यात बयाण रकमेचा डी.डी. अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची मागणी केलेली आहे. त्यानुसार मुदतीअंती प्राप्त झालेल्या खालील निविदा आजचे सभेत उघडण्यात आल्या.

**अ) विद्युत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण विभाग**

| अ.नं | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | काशिको ट्रेडींग प्रा. लि., कोपरगाव |
| ०२ | स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक |
| ०३ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०४ | इंटरनॅशनल इलेक्ट्रिकल्स, अहमदनगर |
| ०५ | शहा ट्रेडींग कंपनी, श्रीरामपूर |
| ०६ | सुरेंद्रकुमार ॲण्ड कंपनी, संगमनेर |
| ०७ | अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी |
| ०८ | आदित्य एंटरप्राईजेस, मुंबई |
| ०९ | पुजा इलेक्ट्रिकल्स, लोणी |

**ब) स्वच्छता व बगीचा विभाग**

| अ.नं | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | यशोदा एंटरप्राईजेस, नाशिक |
| ०२ | अकबरखॉ. सांडेखॉ. पठाण, कोपरगाव |
| ०३ | कुलदीप केमिकल्स, कोपरगाव |
| ०४ | व्हिजी प्रॉडक्टस, औरंगाबाद |
| ०५ | गुरुकृपा सोप्स केमिकल्स, अहमदनगर |
| ०६ | आर. के. एन्टरनप्राईजेस, सिन्नर |
| ०७ | काशिको ट्रेडींग प्रा. लि., कोपरगाव |
| ०८ | सौरभ एंटरप्राईजेस, औरंगाबाद |
| ०९ | गुरुकेम एंटरप्राईजेस, भेर्डापूर |
| १० | व्ही. दुर्गा केमिकल उद्योग, नाशिक |
| ११ | स्पार्क केमिकल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद |
| १२ | विक्रांत एजन्सी, अहमदनगर |
| १३ | नरेंद्र एजन्सी, पुणे |
| १४ | साई राज, ठाणे |

**क) कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी**

| अ.नं | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | यशोदा एंटरप्राईजेस, नाशिक |
| ०२ | शिरोडे ॲण्ड सन्स, कोपरगाव |
| ०३ | ज्योती बुक सेलर्स ॲण्ड स्टेशनर, नाशिक |
| ०४ | श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर |
| ०५ | प्रविण एजन्सीज, नाशिक |
| ०६ | सखी इंडास्ट्रीएल इस्टेट, पुणे |
| ०७ | केयुर एन्टरप्राईजेस, मुंबई |
| ०८ | कॉम्प्युलिंक, मुंबई |
| ०९ | कॉम्प्युस्क्रोल (इंडिया) प्रा. लि., मुंबई |
| १० | माटेल सेल्स कार्पोरेशन, मुंबई |

उपरोक्त निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**१९) युपीएस खरेदीबाबत**

श्री साईबाबा रुग्णालयाकरीता विविध प्रकारच्या मशिनरी / उपकरणे आतापर्यंत खरेदी करण्यात आलेले आहेत. बहुतेक सर्व उपकरणांसोबत कंपनीने त्यांचे युपीएस दिलेले आहेत. परंतु खालील विभागातील उपकरणांकरीता युपीएस उपकरणांसोबत न आल्याने विदयुत पुरवठा खंडीत होऊन मशिन काम चालु असताना बंद पडतात शिवाय विदयुत प्रवाह कधी कधी कमी जास्त झाल्यामुळे मशिन बंद पडून मशिन जळण्याचा देखील धोका होऊ शकतो. मशिनरी महागडया असल्यामुळे युपीएस खरेदी करणे अत्यावश्यक आहे. तेंव्हा खालील प्रस्तावीत केलेल्या १.५ KVA चे ०६ युपीएस खरेदी करावयाचे आहे.

| अ.नं. | विभागाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| ०१. | लॅबोरॅटरी | १ |
| ०२. | २ डी इको | १ |
| ०३. | एन.आय.सी.यु. | ३ |
| ०४. | सि.टी. स्कॅन | १ |
| | एकुण - | ६ |

वरीलप्रमाणे एकुण ०६ युपीएस खरेदीकामी अंदाजे रु. ३,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी हि तातडीने असल्याने याकामी पुरवठाधारकांकडून दुरध्वनीवरुन बंद पाकीटात कोटेशन मागविण्यास व रु. ३,००,०००/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली. तसेच प्रस्तावित केलेल्या 1.5KVA युपीएस बरोबर 2KVA क्षमतेचे देखील कोटेशन्स मागविण्यात यावीत. व त्यातून एकूण ६ युपीएस आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली, ती मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**२०) इंजेक्शन युरोग्राफीन खरेदीबाबत...**

श्री साईबाबा रुग्णालयात नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये अॅन्जीओग्राफीच्या तपासणीसाठी वरील इंजेक्शन (Dye) हे इंजेक्शन लागतात. सदरची इंजेक्शन हे आपण आपणाकडे ठेवत नव्हतो कारण यापुर्वी आपले रुग्णालयात अॅन्जीओग्राफीच्या तपासण्या होत नव्हत्या. तसेच सदर इंजेक्शनची डॉ. धर्माधिकारी यांनी सुध्दा दि. १७/०६/२००६ च्या पत्रान्वये तातडीने मागणी केलेली आहे.सदर इंजेक्शनची वार्षिक औषधे खरेदीमध्ये समावेश करण्यात आलेली आहे. परंतु सदरची इंजेक्शन उपलब्ध होणेस अंदाजे २ महिन्याचा कालावधी लागेल. तोपर्यंत सदरच्या तपासण्यासाठी वरील इंजेक्शनची आवश्यकता आहे.

याकामी नाशिक, नगर व संगमनेर येथील जर्मन रेमीडीज कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून फॅक्सवरुन कोटेशन मागविले आहेत. अहमदनगर येथील विक्रेते जयमंगल एजन्सी यांना तगादा करुन देखील कोटेशन पाठविलेले नाही. त्यांचे दर खालीलप्रमाणे -

| S.N. | Name of Product | Qty | Meena Agency, Nashik | Phophale Med, Sangamner | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Urografin 76% 50 ml | 100 | **407.05** | 407.05 | 40705.00 |
| | | | | **Total =** | **40705.00** |

वरील तुलनात्मक दरांचा तक्त्यामध्ये मे. पोफळे मेडीकल, संगमनेर व मे. मीना एजन्सी, नाशिक यांचे दर सारखे असून १०० नगासाठी रु. ४०,७०५/- इतका खर्च येईल.

तरी मे. मीना एजन्सी, नाशिक हे नेहमीचे पुरवठा धारक आहेत. त्यांचेकडे मालाचा पुरेसा साठा उपलब्ध असतो व ते माल वेळेवर उपलब्ध करतात. तेंव्हा सदरचे इंजेक्शन मे. मीना एजन्सी, नाशिक यांचेकडून खरेदी करण्यास व रु. ४०,७०५/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पिटल)

**२१) चावडीचे पूर्व व व्दारकामाईचे दक्षिण बाजूकडील मोकळया जागेवर शिल्प उभारणेकामी आलेले कोटेशन्स उघडणे बाबत.**

दिनांक २४.२.२००६ रोजी मा.जिल्हाधिकारी, मा.अध्यक्ष, मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री.कैलास गोविंद कोते व आर्टीस्ट श्री.प्रमोद कांबळी यांचे उपस्थितीत चावडी व द्वारकामाई जवळ शिल्प उभारणेबाबत चर्चा झाली त्यावेळी श्री.कांबळी यांचेसह दोन आर्टीस्टकडून कोटेशन मागविण्यात यावेत. व्यवस्थापन समितीच दिनांक ४.३.२००६ चे सभेतील निर्णय क्र.१२० नुसार श्री.कांबळी यांचेसह अशा प्रकारे काम करणाऱ्या क्रिएटीव्ह आर्ट, पुणे, धनंजय आर्ट, बंगलोर यांचे कडून कोटेशन मागविणेस व त्यांनी सादर केलेले दर कला संचलनालय, मुंबई यांचेकडून तपासणी करुन घेण्यात यावे असे ठरले आहे.

त्यानुसार इकडील दिनांक७.४.२००६ चे पत्रानवये उपरोक्त दोन्ही कामांसाठी आर्टीस्ट यांना कोटेशन सादर करणेबाबत विनंती केली होती. त्यानुसार खालील आर्टीस्टनी आपले कोटेशन सादर केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१. | मे. क्रिएटीव्ह आर्ट, पुणे, |
| ०२. | मे. धनंजय आर्ट, बंगलोर |
| ०३. | मे.प्रमोद कांबळी, अहमदनगर |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. कोटेशनसादरकर्त्यांनी सादर केलेल्या दरांची तपासणी कला संचलनालय, मुंबई यांचेकडून करुन घेण्यात यावी, असें ठरले त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**२२) डॉ.अमर सिम्हा रेड्डी, जनरल सर्जन, कडाप्पा यांचे अर्जाबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयात सर्जनची तीन पदे मंजूर असून दोन पदे रिक्त आहे. सध्या डॉ.राम प्रसन्न नाईक हे एकमेव सर्जन आहेत. डॉ.नाईक यांची २५० पर्यन्त ओ.पी.डी.असते तसेच दररोज २० पर्यन्त ऑपरेशन्स असतात.

डॉ.अमर सिम्हा रेड्डी हे सन २००३ मध्ये एम.एस जनरल सर्जन उत्तीर्ण झाले असून त्यांनी मुंबई व तिरुपती येथे सिनिअर रेसीडेंट म्हणून काम केलेले आहे. डॉ.अमरसिम्हा रेड्डी यांनी त्यांचे दिनांक २४.०६.२००६ चे फॅक्स अर्जान्वये श्री साईनाथ रुग्णालयात सर्जन म्हणून नेमणूक करण्याची इच्छा दर्शविली आहे.

डॉ.अमर सिम्हा रेड्डी यांनी श्री साईनाथ रुग्णालयात कायम स्वरुपी नेमणूक दिल्यास डॉ.राम प्रसन्न नाईक यांचे ओ.पी.डी व ऑपरेशनचा लोड कमी होऊन रुग्णांची गैरसोय होणार नाही याकरीता डॉ.अमरसिम्हा रेड्डी यांना जनरल सर्जन या पदावर नेमणूक देण्यात यावी असे ठरले त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**२३) डॉ.श्री.के.एन.टिंगरे (न्युरो सर्जन) यांनी केलेल्या सर्जरी बाबत-**

डॉ.श्री.के.एन.टिंगरे (न्युरो सर्जन) यांची साईबाबा हॉस्पिटमध्ये वैद्यकीय संचालक या पदावर नियुक्ती होऊन दिनांक ०३.०६.२००६ पासून कार्यरत आहेत. न्युरो सर्जनची सेवा फक्त नाशिक, नगर व पुणे येथेच उपलब्ध आहे. मेंदूच्या रुग्णांसाठी व अपघातग्रस्त रुग्णांचे सोयीसाठी साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ.टिंगरे यांना न्युरोसर्जरी करण्यासाठी आवश्यक साहित्य हत्यारे कोटेशन्स मागवून खरेदी करण्यात यावी. तसेच त्यांच्या न्युरोसर्जरीच्या सेवा इतर सुपरस्पेशालिटी सेवेप्रमाणे मानून नियमाप्रमाणे शेअर आदा करण्यात यावे असे ठरले त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.०३. दिनांक २४.०४.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र.४१९.** दिनांक २४.०४.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेल्या व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०४. नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता मे, २००६.**

**(ब) माहे मे, २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे मे,२००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे मे,२००६ मध्ये श्री साईबाबांनी अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.४२०.** (A) )माहे मे, २००६ मधील जमा-खर्चाचे तक्ते, माहे मे, २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाचे तक्ते माहे २२ मे,२००६ अखेरीस गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे मे,२००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीचा तक्ता, माहे मे,२००६ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात आली.

**०२. माहे मे,२००६ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**(B).** माहे मे,२००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबतचा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०३. रुग्णालयातील रुग्णांना माहे मे- २००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.४२०. (C).** माहे मे,२००६ मध्ये रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०४. माहे मे,२००६ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.४२०. (D).**माहे मे, २००६मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०५. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.४२०. (E)** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता ज्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०५. पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र.४२०.(F).** माहे जून, २००६ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०५. श्रीमती ताराबाई देवराम कोळी यांची मौजे शिर्डी येथील स.नं.१७/१अ/१अ ,१७/१ब, १७/२/ २ ब व ४९/२ या जमिनी संस्थानने दान म्हणून घेणे बाबत.**

**निर्णय क्र.४२१.** श्रीमती ताराबाई देवराम कोळी व त्यांची जनरल मुखत्यार श्री अय्यपन वासुदेवन पिल्लाई यांनी दिनांक १८/०७/२००५ रोजी सर्व्हे नं.१७/१अ/१अ,१७/१ब,१७/२/२ व ४८/२ या मधील (त्यांचे) क्षेत्र ०५ हेक्टर ४३ आर दान म्हणून संस्थानने स्विकारावे असा अर्ज दिलेला आहे.

तसेच दिनांक २५/०५/२००६ रोजी सर्व्हे नं. ४८/१ चे क्षेत्र ०१ हे ०९ आर विकत घेणेबाबत व सर्व्हे नं.४८/२चे क्षेत्र ०५ हेक्टर ४३ आर दान म्हणून स्वीकारावे असा अर्ज दिलेला आहे. तसेच मा.अध्यक्ष साहेब,यांना यांच विषयाबाबत दिनांक २९/०५/२००६ रोजी अर्ज दिलेला आहे.

वर नमूद केलेल्या दिनांक १८/०७/२००५ चे अर्जा बाबत संस्थानचे वकील श्री जे.के.गोंदकर यांचा अभिप्राय घेण्यात आलेला आहे. त्यात खालील बाबी नमूद केलेल्या आहे.

०१. सर्व्हे नंबर १७/४ याचा पूर्वीचा सर्व्हे नंबर १७/२/२ क्षेत्र २३ आर चा ७/१२ चा उतारा पहातां, सदर उताऱ्यात मालकाचे नाव रमेश संपतराव गोंदकर असे आहे. तसेच सदर जमीन शिर्डी विविध कार्यकारी सोसायटी व साई नागरी पतसंस्था यांना तारण दिल्याचे दिसत आहे.

०२. सर्व्हे नंबर १७/२/१ब क्षेत्र ०१ हेक्टर २२ आर चा ७/१२ चा उतारा पहातां, मालकी व कब्जा रमेश संपतराव गोंदकर यांचा दिसतो तसेच सदर शिर्डी सोसायटीस तारण दिल्याचे दिसते.

०३ सर्व्हे नंबर १७/१ याचा पूर्वीचा सर्व्हे नंबर १७/१/१अ क्षेत्र ७६ आरचा ७/१२ चा उतारा पहातां, सदर जमीन ही रमेश संपतराव गोंदकर यांचे मालकीचीव कब्जाची दिसते तसेच इतर हक्कांत बाजीराव सोपान गोंदकर व निवृत्ती हनुमंता गोंदकर स.सा.कुळ अशी नोंदआहे. तसेच जमीन जुन्या शर्तीची असुन अधिक जमीन क्षेत्र ०४ हेक्टर ४१ आर अशा नोंदी असुन जमीन शिर्डीस सोसायटीस तारण आहे.

०४. तसेच सर्व्हे नंबर ४८/२ क्षेत्र ०३ हेक्टर २२ आर या जमिनीचे ७/१२ उताऱ्यात माधव त्र्यंबक शेळके यांचे नावाने क्षेत्र ८० आर अधिक ०२आर पोटखराबा असे एकूण ०० हे ८२ आर क्षेत्र आहे. तसेच न्याहाबाई माधव शेळके यांचे नांवाने ८० आर क्षेत्र आहे व सदाशिव माधव शेळके व मिराबाई माधव शेळके यांचे नावाने प्रत्येकी ८० आर क्षेत्र आहे व जमिनीचा कब्जा वरील चौघांचा दिसतो. सदर जमीन प्रवरा सहकारी बँक, शाखा शिर्डी यांना नजरगहाण दिलेली आहे.

वरीलप्रमाणे जमिनी ह्या ७/१२ रेकॉर्डला श्रीमती ताराबाई देवराम कोळी यांचे नाव मालकी हक्काचे नाही. तसेच सर्व्हे नंबर ४८/२ या जमिनीबाबत मा.उपविभागीय अधिकारी यांचे कोर्टात टेनन्सी अपील नंबर १६/२००५ हे चालु असून ते अपील न्यायप्रविष्ट आहे. तसेच सदर जमिनीबाबत ताराबाई देवराम कोळी यांनी ना.हायकोर्ट औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्रमांक ३३०३/१९९१ दाखल केलेले आहे व त्यात ना.हायकोर्ट यांनी स्टे दिलेला आहे व ते रिट पिटीशन ना.हायकोर्टात प्रलंबित आहे. त्यामुळे सदर जमीन ही जोपर्यन्त श्रीमती ताराबाई देवराम कोळी हिचे मालकीची होत नाही व न्यायप्रविष्ठ प्रकरणाचा निकाल होत नाही तोपर्यन्त सदर सर्व्हे नंबर ४८/२ क्षेत्र ०३ हेक्टर २२ आर जमीन दान म्हणून आपणांस घेता येणार नाही.

०५. तसेच सर्व्हे नंबर १७/४ क्षेत्र २३ आर व सर्व्हे नंबर १७/२/१ब क्षेत्र ०१ हेक्टर २२ आर व सर्व्हे नंबर १७/१ क्षेत्र ७६ आर या जमिनीचे मालक ७/१२ रेकॉर्डप्रमाणे अनुक्रमे (०१) रमेश संपतराव गोंदकर हे आहेत तसेच सदर जमिनी ह्या महाराष्ट्र रिस्टोरेशन ऑफ लॅन्ड टु शेडयुल ट्राईब्जच्या अधिन कायद्यातील आहेत व जमिनीचा प्रत्यक्ष कबजा मिळावा म्हणून ताराबाई देवराम कोळी हिने आदिवासी केस दाखल केलेली आहे.

अशा सर्व महत्वाच्या कायदेशीर बाबी शासन दरबारी न्यायप्रविष्ठ आहे. तसेच सर्व्हे नंबर १७/१ क्षेत्र ७६ आर या जमिनीत बाजीराव सोपान गोंदकर व निवृत्ती हनुमंता गोंदकर सर्व साधारण कुळ यांना हक्क दिसतो. तसेच ७/१२ उताऱ्यात अधिक जमीन म्हणूनही शेरा आहे. त्यामुळे या सर्व कायदेशीर बाबींचा विचार करता, आपणांस वरील विषयात नमुद केलेल्या जमिनी दान म्हणून घेता येणार नाही. जमीन दान देणाऱ्यास जमिनीची मालकी कायदेशीर असावी लागते. तसा कायदेशीर मालकी हक्क दान देणार श्रीमती ताराबाई देवराम कोळी हिचा सदरचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. त्यामुळे आपणांस जमिनी सद्य:परिस्थितीत दान घेता येणार नाही.

०६. तसेच ताराबाई देवराम कोळी यांचा दिनांक १८ जुलै, २००५ चा अर्ज पहातां, सदर श्रीमती ताराबाई देवराम कोळी हिने वरील संदर्भीय जमीन आपले ताब्यात देणेबाबतचा अर्ज केलेला आहे. त्यामध्येही सदर जमीन वादग्रस्त असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता जोपर्यन्त ताराबाई देवराम कोळी हिस कायदेशीर असा मालकी हक्क प्राप्त होत नाही व तशा नोंदी ७/१२ उताऱ्यात होत नाही, तोपर्यन्त सदरच्या जमिनी ताराबाई देवराम कोळी हिचेकडून आपणांस दान घेता येणार नाही व जमिनीचा कबजाही घेता येणार नाही. तसेच अर्जदार यांनी महाराष्ट शासननाची पूर्व परवानगी घेणे सुध्दा जरुरीचे आहे.

मा.अध्यक्ष,यांनी अर्जदार यांच्या दिनांक २९/०५/२००६ चे अर्जावर राज्य सरकारच्या विधी व न्याय विभागाकडून हि जमिन घेण्यासंबधी अभिप्राय मागवावेत. सदरची कार्यवाही त्वरीत करावी असा शेरा दिलेला आहे. प्रश्नाधिन जमीन दान घेणेबाबत खातेदार श्रीमती ताराबाई देवराम कोळी (बनकर) यांचे जनरल मुखत्यार श्री.अय्यपन वासुदेवन पिल्लाई व त्यांच्या प्रतिनिधींशी याबाबत समक्ष चर्चा करता येईल.

उपरोक्त परिच्छेदातील विवेचनानुसार, श्रीमती ताराबाई देवराम कोळी (बनकर) यांचे जनरल मुखत्यार श्री अय्यपन वासुदेवन पिल्लाई यांनी दान म्हणून देऊ केलेले सर्व्हे नंबर १७/२ (नविन सर्व्हे नंबर १७/४), १७/२/१/ब, १७/१/१अ (नवीन सर्व्हे नं १७/१), ४८/२ या मधील त्यांचे क्षेत्र ०५ हेक्टर ४३ आर दान म्हणून संस्थानने स्वीकारावे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

श्रीमती ताराबाई देवराम कोळी, व त्यांचे जनरल मुखत्यार श्री.अय्यपन वासुदेवन पिल्लाई यांनी दान देऊ केलेली मौजे शिर्डी येथील सर्व्हे १७/१अ/१अ, १७/१ब, १७/२/२ व ४९/२ (चुकून ४८/२ च्या ऐवजी ४९/२ झालेली दिसते) मधील जमीनीबाबत मा.दिवाणी न्यायाधिश, राहाता, यांचे कोर्टात रे.दिवाणी वाद १४४ दाखल झालेला आहे. त्यामध्ये "स्टेटस्को (Status-quo)" ठेवणेबाबत आदेश झालेला असल्याने सदरचा विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०६. श्रीमती ताराबाई देवराम कोळी यांची मौजे शिर्डी येथील स.नं.४८/१ मधील क्षेत्र १ हेक्टर ०९ आर जमीन संस्थानने विकत घेणे बाबत.**

**निर्णय क्र.४२२.** श्रीमती ताराबाई देवराम कोळी व त्यांची जनरल मुखत्यार श्री अय्यपन वासुदेवन पिल्लाई यांनी त्यांची मौजे शिर्डी येथील स.नं.४८/१ मधील क्षेत्र १ हेक्टर ०९ आर जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून विनंती दि. २९.०१.२००५ रोजी तसेच दि. २५.०५.२००६ व मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे दि.२९.०५.२००६ रोजीच्या पत्रान्वये केलेली आहे.

याबाबत अर्जदारांनी दाखल केलेले कागदपत्र व विविध कोर्टाच्या निकालाच्या नकला पाहता सदर जमीन आदिवासी व्यक्तिची आहे. त्यामुळे याबाबत संस्थानचे वकील ॲड. जे.के.गोंदकर यांचा अभिप्राय घेण्यात आलेला आहे.

**अ)** श्री.बाळासाहेब धोंडीराम बनकर व इतर यांनी श्रीमती ताराबाई देवराम कोळी व इतर यांचे विरुध्द स.नं.४८/१ क्षेत्र ३ हेक्टर २६ आर बाबत मनाई हुकुमाचा दावा मा. सिव्हील जज्ज, सिनिअर डीव्हीजन, कोपरगाव यांचे कोर्टात रे.मु.नं. २९/२०० दाखल केला होता. त्याचा निकाल दि. २८.०२.२००५ रोजी लागलेला आहे. सदर दाव्याचे निकाल पत्रात ताराबाई देवराम कोळी ही वरील जमिनीपैकी १/२ हिश्याची मालक धरली आहे. तसेच त्या १/२ क्षेत्रापैकी ताराबाई देवराम कोळी हिने प्रकाश शेळके व संध्या शेळके यांना प्रत्येकी २७ आर क्षेत्र दि. ०१.०३.२००० रोजीचे खरेदी खताने विकल्याचे धरलेले आहे.

**सदर निकालावर श्रीमती विमलबाई बनकर यांनी पहिले अपील ४१/२००५ चे नामदार हायकोर्ट, औरंगाबाद येथेदाखल केले असून ते प्रलंबित आहे.**

**ब)** उपरोक्त अमूद केलेल्या कोर्टाच्या निकालाच्या आधारे तलाठी शिर्डी यांनी फेरफार क्रमांक १६९३३ ने अर्जदार यांचे गावी रेकार्डला लावले बाबत नोंद केली होती. सदर नोंद तक्रारी होऊन मा. तहसिलदार राहाता यांनी केस क्रमांक आरटीएस तक्रार केस/ २९/ २००५, दि. २९.०७.२००५ च्या निकाल प्रमाणे नोंद मंजूर केलेली आहे. त्यावर मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडे अपील १००/५०० दाखल झालेले आहे. त्याचा निकाल होणेवर आहे.

**क)** अर्जदार यांनी त्यांचे अर्जात नमूद केले आहे की, स.नं. ४८/१ बाबत वाद न्यायप्रविष्ठ केलेला आहे. मात्र मयत देवरामची पत्नी असल्याने ताराबाईचा सदर सर्व्हे नं. ४८/१ मध्ये १/२ हिस्सा आहे. हिंदू कायद्याप्रमाणे अविभक्त हिस्सा विकण्याचा मालकाला अधिकार असतो. केवळ वाद न्यायप्रविष्ठ असल्याने व्यवहारात कायद्यानेकोणतीही अडचण अडथळा नाही. शिवाय दिवाणी कोर्टानेही तिचा हिस्सा मान्य कबुल केलेला आहे. त्याचप्रमाणे विक्री करण्याबाबत ताराबाई विरुध्द असलेल्या दाव्यात कोणताही मनाई हुकुम मागितला नव्हता व नाही. शिवाय कोर्टाने तसा कोणताही मनाई हुकुम दिला

नव्हता व नाही."ताराबाईचे हिस्यापैकी ५४ आर क्षेत्र विक्री केलेले आहे. त्यास कोणताही बाध निर्माण झालेला नव्हता त्यामुळे राहिलेले तिच्या हिश्याचे क्षेत्र विक्री करण्यास कोणताही बाध नाही. कलेक्टरचे परवानगी देखील गरज नाही. या परिस्थितीत कायदेशीर तरतुदीचा विचार करता अर्जदाराचे हिश्याचे क्षेत्र १ हेक्टर ९ आर खरेदीने संस्थानने विकत घेण्यात यावे, असे नमुद केलेले आहे.

**ड)** मा. अध्यक्ष साहेब यांना अर्जदार यांनी दिलेल्या अर्जावर ६ राज्य सरकारच्या विधी व न्याय विभागाकडून ही जमीन घेण्यासंबंधी अभिप्राय मागवावेत व त्याची कार्यवाही करावी असा शेरा अध्यक्ष साहेब यांनी दिलेला आहे.

अर्जदार यांनी स.नं.४८/२, १७/१अ/१अ, १७/१ब, १७/२/२ बाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे रिस्टोरेशन ऑफ लॅण्ड यु शेडयुल ट्राईव्ह ॲक्टच्या कलम ३, ४ व ५ प्रमाणे जमिनीचा प्रत्यक्ष कब्जा मिळावा म्हणून आदिवासी केस दाखल केलेली आहे. असे दिनांक १८.०७.२००५ रोजीच्या अर्जात नमूद केले आहे.

संस्थानचे वकील यांनी "सदरची जमीन विकत घेता येईल परंतू जादा काळजी म्हणून श्रीमती ताराबाई देवराम कोळी हिने सदर जमीन श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना विक्री करणेसाठी पूर्व परवानगी महाराष्ट्र शासनाकडून घ्यावी, म्हणजेच परवानगी आल्यानंतर जमिनीचे खरेदीखत करता येईल व तसे करणे आपल्या हिताचे होईल" असे नमूद केलेले आहे.

तरी संस्थानचे वकीलाचे अभिप्राय प्रमाणे श्रीमती ताराबाई देवराम कोळी व जनरल मुखत्यार अय्यपन वासुदेवन पिल्लाई यांनी स.नं.४८/१ क्षेत्र १ हेक्टर ०९ आर श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना विकणेबाबत महाराष्ट्र शासनाची परवानगी आणले नंतर जमीन खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०७.** **श्री आबासाहेब लहानू कांदळकर व श्री हरिभाऊ गंगाधर बनकर,रा.शिर्डी यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५/७ पैकी प्रत्येकी १ आर जमिन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.४२३.** (अ)श्री.नवनाथ बहिरु चौधरी, श्री.रामदास शंकर सोनवणे, श्री.आबासाहेब लहानू कांदळकर, श्री. हरिभाऊ गंगाधर बनकर व श्रीमती उषा सुभाष शिदोडकर यांनी दिनांक ०२ फेब्रुवारी, २००६ रोजी त्यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२५/७ मध्ये असलेली प्रत्येकी एक आर जमीन संस्थानने खरेदी करावी, म्हणून अर्ज दिलेला आहे. त्यात त्यांनी मुळ जमीनमालकापेक्षा जास्त मोबदला मिळावा अशी अपेक्षा केलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४ फेब्रुवारी, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ९९ नुसार खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे :

"...... उपरोक्त अर्जदारापैकी आबासाहेब लहानु कांदळकर व हरिभाऊ गंगाधर बनकर यांनी बांधकाम केलेले आहे, असे अर्जात नमूद केलेले आहे.

तरी श्रीमती उषा सुभाष शिदोडकर, नवनाथ बहिरु चौधरी, रामदास शंकर सोनवणे, आबासाहेब लहानू कांदळकर, हरिभाऊ गंगाधर बनकर यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२५/७ मधील प्रत्येकी एक आर असलेली जमीन रक्कम रुपये १,५०,०००/- प्रमाणे खरेदी करणेस व खरेदीखतास येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. "

तसेच, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४ मार्च, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १०८(०५) नुसार खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे :

"......या सर्व बाबींवर साधकबाधक चर्चा होऊन, श्री.लोढा यांचे समवेत वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे प्रती आर रुपये १,५०,०००/- या दराने खरेदीस मान्यता देण्यात आली. तसेच या क्षेत्रात असलेले श्री. नवनाथ बहिरु चौधरी व इतर ४ यांची प्रत्येकी ०१ आर जमीनही याच दराने खरेदी करण्यात यावी. सर्व जमीन खरेदीसाठी स्टॅम्प फी, नोंदणी फी इत्यादी सर्व खर्च संस्थानमार्फत करावा, असे ठरले. "

(ब) उपरोक्त निर्णयाप्रमाणे सर्व संबंधितांना त्यांची जमीन प्रती आर १,५०,०००/- या दराने खरेदी द्यावयास तयार असलेबाबत पत्र देणेस कळविणेत आले होते. तसेच खरेदी खतासाठी आवश्यक असलेल्या रेशनकार्डची प्रत, त्यांनी जमीन खरेदी केलेबाबत खरेदीखताची प्रत, त्यांचे कुंटूंबातील सदस्यांची संमतीपत्र इत्यादीबाबत माहिती मागविणेत आली होती. त्याप्रमाणे श्री.नवनाथ बहिरु चौधरी, श्री.रामदास शंकर सोनवणे व श्रीमती उषा सुभाष शिदोडकर यांची माहिती प्राप्त झालेली आहे. त्यानुसार खरेदीखताचा मसुदा तयार करणेबाबत संस्थान वकिलांना पत्र देण्यात आले असून, या तिघांचे खरेदीखत लवकरच करण्यांत येत आहे.

(क) उपरोक्तप्रमाणेच, श्री.आबासाहेब लहानू कांदळकर व श्री.हरिभाऊ गंगाधर बनकर यांनादेखील त्यांची जमीन रक्कम रुपये १,५०,०००/- मात्र प्रती आर या दराने देणेस तयार असलेबाबत व इतर माहिती पाठविण्याबाबत दिनांक ०२ मे,२००६ रोजी पत्र देणेत आलेले होते.

श्री.कांदळकर व श्री.बनकर यांनी दिनांक ०७ जून,२००६ रोजी त्यांचे जमिनीचे अपेक्षित किंमतीबाबत पत्र दिले आहे. त्यात खालील बाबींचा उल्लेख केलेला आहे :

०१. सर्व्हे नंबर १२५/७ यामध्ये प्रत्येकी ०१ आर जागा आहे. सदर जागेत ते दोघेही राहत आहेत. सदर जागा सोडून त्यांना शिर्डीत अन्य ठिकाणी नाही.

०२. खरेदीसाठी संस्थानने ठरविलेल्या रक्कमेपेक्षा सदर जागेचे मुल्यांकन जास्त आहे. संस्थानकडे याबाबत मागणी केली असता संस्थाने त्यास मिटींगचा संदर्भ देऊन टाळाटाळ केली आहे.

०३. त्यांच्या जागेची सरकारी किंमत प्रत्येकी रुपये ३,००,०००/- असून त्यात दोघांचेही प्रत्येकी रुपये १,५०,०००/- ते रुपये २,००,०००/- मात्रची पत्राशेड, घरे आहेत व त्यात ते राहत आहेत.

०४. त्यांना त्यांच्या घराची व जागेची प्रत्येकी एकुण रक्कम रुपये ५,००,०००/- देणेत यावी.

(ड) श्री.आबासाहेब लहानु कांदळकर व श्री. हरीभाऊ गंगाधर बनकर यांनी त्यांना देऊ केलेली प्रती आर रुपये १,५०,०००/- (रुपये दिड लाख मात्र) यापेक्षा सरकारी किंमती जास्त म्हणजे प्रती आर रुपये ३,००,०००/- (रुपये तीन लाख मात्र ) आहे, असे अर्जात नमूद केलेले आहे. त्यांचे हे म्हणणे खरे नाही. सन २००६ च्या रेडीरेकनरप्रमाणे सर्व्हे नंबर १२५ चा भाव प्रती आर रुपये १,१७,०००/- (रुपये एक लाख सतरा हजार मात्र) आहे.

मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपुर भाग, श्रीरामपुर यांनी तयार केलेल्या दिनांक ०५ ऑगष्ट, २००३ रोजीच्या निवाडयाप्रमाणे श्री.हरिभाऊ गंगाधर बनकर यांचे घर हे अनधिकृत आहे असे नमुद केले असून त्यात त्यांनी अकृषिक (बिनशेती) परवानगी घेतलेली नाही, तसेच अनधिकृत बांधकामाची नुकसान भरपाई ही अनुज्ञेय नाही, असेही नमूद केलेले आहे. याचा अर्थ त्यांना घराची नुकसानभरपाई मिळणार नाही.

(इ) वर नमुद केलेल्या कारणास्तव श्री.आबासाहेब लहानु कांदळकर व श्री.हरिभाऊ गंगाधर बनकर यांनी त्यांचे दिनांक ०७ जून,२००६ रोजीच्या अर्जात त्यांना घर व जागेची प्रत्येकी एकूण किंमत रुपये ५,००,०००/- (रुपये पांच लाख मात्र) मिळावी, हे म्हणणे योग्य नाही. त्यामुळे ते मान्य करणे योग्य होणार नाही.

उपरोक्त परिच्छेदांतील विवेचनानुसार, खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती आहे :

श्री.आबासाहेब लहानू कांदळकर व श्री.हरीभाऊ गंगाधर बनकर, शिर्डी यांनी दिनांक ०७ जून,२००६ रोजी त्यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२५/७ मध्ये असलेली प्रत्येकी एक आर जागा व त्यामध्ये असलेल्या घराची किंमत रक्कम रुपये ५,००,०००/- (रुपये पांच लाख मात्र) मिळावी म्हणून केलेली विनंती अमान्य करणे व त्यांच्या जागेबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत श्री हरिभाऊ गंगाधर बनकर हे समक्ष उपस्थित होते. त्यांना सभेने त्यांची एक आर जागा देणेबाबत विनंती केली असता त्यांनी त्या जागेऐवजी दुसरी जागा देणेबाबत विनंती केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू जागेबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०८. तिरुमलाई तिरुपती देवस्थान (आंध्र प्रदेश) येथे एक एकर जागा अतिथीगृह अथवा भक्तनिवास बांधकामासाठी मिळविणे बाबत.**

**निर्णय क्र.४२४. (अ)**मा.श्री. विजयसिंह मोहिते पाटील, ग्रामीण विकास व पर्यटन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी, जा.क्र. एम/आरडीडी ॲण्ड टुरिझम/नोट/४८१/०६, दिनांक २४ एप्रिल,२००६ रोजी श्री. सुब्बीरामी रेड्डी, अध्यक्ष, तिरुमलाई तिरुपती देवस्थान ट्रस्ट, तिरुपती यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची प्रत, मा.अध्यक्ष यांचे नांवाने इकडील कार्यालयास प्राप्त झालेली आहे. या पत्रातील मजकुराचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

"....आपणांशी झालेल्या समक्ष चर्चेनुसार, तिरुमलाई (आंध्रप्रदेश) येथे एक एकर जमीन / जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना उपलब्ध करुन, ती जागा हस्तांतरीत करणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी. जेणेकरुन श्री साईबाबा संस्थान मार्फत या जागेत भक्तनिवासस्थान सारखा निवासी प्रकल्प तिरुमलाई तिरुपती देवस्थानच्या अटी व शर्तीस अधिन राहुन विकसीत करता येऊ शकेल.

तसेच उपरोक्त जमीन संस्थानला उपलब्ध करुन दिल्यास, हस्तांतरीत केल्यास जागेचा विनियोग श्री वेंकटेश्वराचे दर्शनासाठी येणारे भक्तांसाठी भक्तनिवाससारखा निवासी प्रकल्प

उभारण्यासाठीच केला जाईल, याची ग्वाही देतो. नियोजित भक्तनिवास प्रकल्प हा दोन तीर्थक्षेत्रांना भेट देणाऱ्या भक्तांमध्ये सामाजिक बंधुभाव निर्माण करणारा ठरेल.

**(ब)** तसेच मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिवांनी, पत्र जा.क्र. मुमंस/फाईलकक्ष/१५/१४१ दिनांक ०५ जून,२००६ अन्वये मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अग्रेषित केलेल्या पत्रासोबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी मा.मुख्यमंत्री आंध्रप्रदेश व अध्यक्ष, तिरुपती तिरुमला देवस्थान ट्रस्ट यांना पाठविलेल्या पत्राची छायांकित प्रत जोडून पाठविलेली आहे. तसेच या पत्रात, तिरुपती तिरुमला देवस्थान परिसरात राज्य अतिथीगृह बांधण्यासंदर्भात श्री साईबाबा संस्थानने पारित केलेल्या ठरावाची प्रत पाठवावी, अशी विनंती केलेली आहे.

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी मा.मुख्यमंत्री, आंध्रप्रदेश यांना अग्रेषित केलेल्या पत्रातील गोषवारा थोडक्यात पुढीलप्रमाणे :

"... दर दिवशी महाराष्ट्रातून मोठया प्रमाणात भक्त तिरुपती तिरुमला देवस्थानला भेट देत असतात. त्याकरीता महाराष्ट्र शासनाने, आंध्रप्रदेश शासन व तिरुमला तिरुपती देवस्थान यांचेकडे २००० चौरस मीटर जागा महाराष्ट्र शासनास उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्ताव पाठविलेला आहे. या उपलब्ध होणारे जागेवर शासकीय अतिथीगृह बांधण्यात येईल कि ज्याचा उपयोग तिरुपती येथे भेट देणाऱ्या महत्वाच्या व्यक्तींना व भक्तांना होईल. सदरील प्रस्ताव सन १९८२ पासून प्रलंबित आहे. तरी या प्रलंबित प्रस्तावाबाबत आपण व्यक्तिशः लक्ष द्यावे. "

**(क)** उपरोक्त परिच्छेदातील विवेचनानुसार, तिरुमलाई तिरुपती देवस्थान ट्रस्ट, तिरुपती यांचेकडून एक एकर जागा विनामोबदला अथवा योग्य किंमत देऊन उपलब्ध करुन घेणेस व जागा उपलब्ध झालेनंतर तिरुपती देवस्थान ट्रस्टचे नियमांनुसार याठिकाणी अतिथीगृह अथवा भक्तनिवास बांधकाम करणेबाबत उचित कार्यवाही करणेस तत्वतः मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचे प्रस्तावास मान्यता देण्यात आली. परंतू अतिथीगृह अथवा भक्तनिवास बांधकाम केल्यानंतर त्याचे नियंत्रण संस्थानकडे असणे आवश्यक आहे.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०९.** **रेल्वे अधिकाऱ्यांना व त्यांचे कर्मचारी यांना आरामगृह व वाहनतळासाठी जागा देणे बाबत.**

**निर्णय क्र.४२५.** ॲडिशनल डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर, नांदेड डिव्हीजन, नांदेड यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक एन/एडीआरएमजी/२२/२००६ दिनांक ०३ जून,२००६ अन्वये रेल्वेच्या अधिकाऱ्यांसाठी व त्यांच्या कर्मचाऱ्यांना आरामगृह बांधणेसाठी व वाहनतळ यासाठी ३००० चौरस मीटर म्हणजे ३० आर जागा मागणी केलेली आहे. याबाबत त्यांनी त्यांची मागणी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये ठेवणेबाबत विनंती केलेली आहे.

संस्थानचे विविध नियोजित विकास प्रकल्पांचे काम सुरु असून, यासाठी संस्थानलाच जमिनीची / जागेची आवश्यकता आहे. त्यामुळे सध्या संस्थान विविध उपक्रमांसाठी शिर्डी परिसरात जागा विकत घेत आहे तसेच भूसंपादन कायद्यान्वये जमीन संपादन करत आहे. त्यामुळे दक्षिण मध्य रेल्वे विभागास ३० आर जागा देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, रेल्वेच्या अधिकाऱ्यांसाठी व त्यांच्या कर्मचाऱ्यांना आरामगृह बांधणेसाठी व वाहनतळ यासाठी ३००० चौरस मीटर म्हणजे ३० आर जागा देणेकामी महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात यावी

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१०.** **रथ पालखी रस्त्याचे कामाबाबत.**

**निर्णय क्र.४२६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.११.** **वार्षिक औषधे खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.४२७.** श्रीसाईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालयसाठी सन २००६-२००७ या वर्षाकरीता लागणाऱ्या वार्षिक औषधे खरेदीचा रु.५,९३,९१,९८४/- चा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २४/०४/२००६ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

सदर विषयावर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

वार्षिक औषधे खरेदीकामी मा. विश्वस्त डॉ. एकनाथ भा. गोंदकर, मा. विश्वस्त पांडुरंग अभंग, मा.विश्वस्त सुरेश वाबळे व संबंधित अधिकारी यांचे समितीने प्रवरा हॉस्पिटल, लोणी येथील कार्यप्रणालीचा अभ्यास करुन तेथील कार्यप्रणाली स्विकाहार्य असल्यास तेथील कार्यप्रणालीप्रमाणे खरेदी करण्यात यावी असे ठरले आहे.

त्यानुसार दि. ०२/०५/२००६ रोजी प्रशासकीय अधिकारी श्री. आर. एस. साबळे, वरीष्ठ प्रशासक डॉ. व्ही. जी. टाकळकर यांनी समक्ष जाऊन तेथील स्टोअर ऑफीसर श्री. चांदगुडे यांचेकडून प्राथमिक माहिती घेतली.

त्यानंतर दि. ०८/०६/२००६ रोजी मा. विश्वस्त श्री. सुरेश वाबळे पाटील, प्रशासकीय अधिकारी- श्री.आर.एस. साबळे, वैद्यकिय प्रशासक - डॉ. पटवर्धन हे लोणी येथे समक्ष जाऊन तेथील स्टोअर इनचार्ज श्री. चांदगुडे यांचेकडून सर्व कार्यपध्दतीची माहिती घेतली.

तेथे घेतलेल्या माहितीनुसार, संस्थानची कार्यपध्दती व प्रवरा हॉस्पिटल, लोणी यांची कार्यपध्दती हि जवळ जवळ सारखीच असून तेथील कार्यपध्दतीमधील काही नविन पध्दत आपणास अंवलंबिता येईल. ती खालीलप्रमाणे-

०१. वार्षिक औषधे खरेदीचा पुरवठा आदेश दिल्यानंतर तेथे दरमहा ऑर्डर पुरवठा धारकास विभागून दिला जातो. त्याचप्रमाणे आपणास सुध्दा वार्षिक ऑर्डर ४ महिन्याचे अंतराने (डिलेव्हरी शेडयुल) ठरवून देता येईल.

०२. तेथील हॉस्पिटलमध्ये वार्षिक मागणीतील संख्या प्रथम निम्नत्तम दर धारकास ७०% इतकी संख्या तर व्दितीय निम्नत्तम दर असणाऱ्यास ३०% संख्या अशा प्रमाणात विभागून देण्यात येते.

वरील दोन मुदयांचा आपल्या कार्यपध्दतीमध्ये समावेश केल्यास अजून आपली कार्यपध्दती व्यवस्थित होईल.

तरी दरवर्षाचे संस्थानचे प्रचलित कार्यपध्दतीनुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन तसेच थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने निविदा मागवुन खरेदी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,नामांकित औषध कंपन्यांकडून विहित पध्दतीने औषधे खरेदी करण्यात यावीत असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**विषय नं.१२. आयसोफ्लोरिन व्हेपोरायझर खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.४२८.** श्री साईबाबा रुग्णालयात शस्त्रक्रीया विभागामध्ये भुल देण्यासाठी बॉईल्स मशिनला व्हेपोराईझर हे उपकरण लागते. आपण नविन बॉईल्स मशिन खरेदी केले तेंव्हा त्यासोबत सदरील उपकरण खरेदी केले नव्हते. परंतू सदर उपकरण हे बॉईल्स मशिनकरीता आवश्यक आहे. सदर उपकरणामध्ये आयसोफ्लोरेन हे औषध वापरुन रुग्णास भुल दिले जाते.

सदर औषध तयार करणाऱ्या दोन कंपन्या मे.रमन ॲण्ड वेल प्रा.लि., मुंबई, बॅक्सटर, मुंबई यांनी जर त्यांचेकडून आपण तीन वर्षासाठी चे औषधे घेतले तर ते वरील उपकरण हे मोफत देतात अशी योजना आहे. मे. रमन ॲण्ड वेल प्रा.लि., मुंबई यांनी खालील प्रमाणे योजना दिलेली आहे.

१) तीन वर्षाकरीता त्यांचे आयसोफ्लोरेन खरेदी करावे लागणार आहे. जर आपण मध्येच वापर बंद केला तर व्हेपोराइझर हे उपकरण परत घेतील. (परंतू ती अट त्यांनी आपले रुग्णालयासाठी शिथील केलेली आहे. )

त्यांचे दर २५० मीलीचे बाटलीकरीता रु.१८५०/- तर १०० मीलीच्या बाटलीचे दर रु.८५०/- असे दिलेले आहे.

२) मे. बॅक्सटर, मुंबई यांनी सहा व्हेपोराइझर उपकरण घेणार असेल तर दरमहा १०० मीलीच्या ४८ बाटल्या घ्याव्या लागतील . एका बाटलीची किंमत रु.१२५०/- इतकी राहील.

किंवा

दरमहा कमीतकमी १०० मीलीच्या २४ बाटल्या खरेदी कराव्यात किंवा दरमहा त्यांचे कंपनीचे Viaflex हे इंजेक्शनचे ३०० इंजेक्शन खरेदी करावेत. त्यांची किंमत दरमहा रु.९००००/- इतकी राहील.

आपणास एका मशिनकरीता साधरणतः दरमहा २५० मीलीच्या १० बॉटल लागतील मे. रमण ॲण्ड वेल यांचे दराप्रमाणे एका महिन्यास १० x १८५०.०० = १८५००.०० लागतील . तर मे.बॅक्सटर यांचे दराप्रमाणे १०० मीलीच्या २० बॉटल लागतील त्यांची किंमत त्यांचे दराप्रमाणे २० x १२५०.०० = रु.२५०००.०० इतका दरमहा खर्च येईल.

वरील दोन्ही योजनांचा विचार करता मे.रमण ॲण्ड वेल यांची योजना योग्य वाटते. कारण त्यांची ३ वर्ष औषध खरेदीची अट नाही व ते उपकरण परत देखील घेणार नाही . आपण त्यांचेकडून दरमहा १० बॉटल खरेदी केल्यास त्यासाठी रु.१८५००/- याप्रमाणे ३ वर्षासाठी ३६ x १८५००/- = ६,६६,०००/- इतका खर्च येईल. तथापी आपणास पाहिजे तेंव्हा आपण खरेदी बंद देखील करु शकतो. व्हेपोराइझर या उपकरणाची बाजारात अंदाजे किमंत १ लाख रुपयापर्यंत आहे. आपणास ३ वर्षासाठी लागणारे औषधासाठी रु.६,६६,०००/- इतका खर्च येईल. म्हणजे रु.६,६०,०००/- चे खरेदीवर रु. २

लाखाचे व्हेपोराइझर मोफत मिळणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तकामी मे.रमन अ‍ॅण्ड वेल प्रा.लि., मुंबई, यांचा प्रस्ताव स्वीकारण्यात येऊन, त्यांचेकडून एकुण ५ व्हेपोरायझर स्वीकारण्यात यावेत.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,साईबाबा हॉस्पिटल)

**विषय नं.१३. लिक्वीड गॅस प्लॅन्टबाबत.**

**निर्णय क्र.४२९.** श्री साईबाबा रुग्णालयात ६ ऑपरेशन थिएटर विभाग, आय.सी.सी.यु., आय.सी.यु.,एन.आय.सी.यु., कार्डीयाक रिकव्हरी वॉर्ड, डिलक्स रुम, प्रायव्हेट व सेमी प्रायव्हेट रुममध्ये व इतर सर्व वॉर्डमध्ये मे. अलमेड इक्वीपमेंट, मुंबई यांचेकडून सेंट्रल ऑक्सीजन सिस्टीम बसविण्यात आलेली आहे. सदरचे सिस्टीममध्ये ऑक्सीजनचे १९१ पॉईट आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयाचे तीन ऑपरेशन थिएटर व आय.सी.सी.यु. मध्ये ऑक्सीजनचे १० पॉईट आहे.

श्री साईबाबा रुग्णालयातील ऑक्सीजन सिस्टीमचे मॅनी फोल्डला (Oxygen manifold) एका वेळेस २४ सिलेंडर्स कार्यान्वीत असतात. आणि ८ सिलेंडर स्टॅंडबाय मॅनी फोल्डला जोडलेले असतात. तर श्री साईनाथ रुग्णालयात ८ सिलेंडर्सचा मॅनीफोल्ड (Manifold) आहे. त्यासाठी एकुण ८ सिलेंडर्स कार्यान्वीत असतात. म्हणजे दोन्ही सिस्टीमला एकुण ३२ सिलेंडर्स एका वेळेस लागतात. सध्या मे. बालाजी गॅस, संगमनेर यांचेकडून सदरचे सिलेंडर्स भरुन आणतो. (सिलेंडर्स मे. बालाजी गॅस, संगमनेर यांचे मालकीचे आहेत) आणि आपण फक्त गॅसचे पैसे देतो.

श्री साईबाबा रुग्णालय नुकतेच चालु झालेले आहे. परंतु दोन्ही रुग्णालयाचे मिळून सध्याचा सिलेंडर्सचा खप महिन्याला सुमारे १०० सिलेंडर्स (जम्बो -७ क्युबीक मीटर्स क्षमता असलेले) आहे. एका सिलेंडर्स मध्ये ०७ क्युबीक गॅस असतो व एक क्युबीक गॅससाठी रु.२४.९६ (सर्व करांसह) खर्च असतो. एक सिलेंडर्स भरुन आणणेकामी रु.१७४.७२ इतका खर्च येतो म्हणजे एक महिन्यासाठी रु. १७,४७२/- इतक्या रुपयाचा गॅस लागतो. तर एक वर्षासाठी रु. २,०९,६६४/- इतका खर्च येईल. सदरचा खर्च हा सध्याचे वापरावर अधारीत आहे. परंतु श्री साईबाबा रुग्णालयात ऑक्सीजनचा वापर वाढणार आहे तेंव्हा यापेक्षा जास्त खर्च अपेक्षित आहे.

सध्या आपण गॅस खरेदी करतो यासाठी वेळोवेळी पुरवठा धारकांस दुरध्वनी करुन आवश्यकतेनुसार सिलेंडर्स मागवून घेतो परंतु सिलेंडर्स आपणास वेळेवर उपलब्ध होत नाही. यासाठी बराच कालावधी जातो. त्यामुळे कधीकधी शस्त्रक्रिया तहकुब ठेवाव्या लागतात, तर आवश्यक रुग्णास देखील गॅसचा तुटवडा भासतो.

मे. बी.ओ.सी. इंडीया लि., मुंबई यांचा आपण लिक्वीड ऑक्सीजनचा प्रकल्प त्यांचेकडून बसवून घेतला तर आपणास खालीलप्रमाणे फायदा होईल.

➢ **Advantages of Liquid Medical Oxygen** :

1) Holds Large Volume.

2) Security of Supply : Ensures security of supply by providing approximately 14 days stock as against 1 day from cylinder.

3) Minimizes cylinder handling : With very less cylinder to move, noise pollution becomes almost nil. Because BOC Gases manages the vessel and supply for you, manning and labor costs are reduced.

4) Simple to operate : No manning is required. The Liquefied Medical Oxygen installation is low ₹ pressure facility, which is safer than handling high ₹ pressure cylinders.

5) Provides flexibility : It can absorb fluctuating hospital demands.

6) Minimizes administrative cost by nearly 5 times.

7) Free up space presently occupied by large quantity of bulk cylinders.

8) Totally eliminates the hazards associated with storage and physical movement of bulk cylinders.

सदर प्रकल्पावर पुर्णतः नियंत्रण मे. बी.ओ.सी. इंडीया लि., मुंबई यांचे राहील व ते त्यांचे स्वखर्चाने वेळोवेळी येथे येऊन गॅस टॅंकमध्ये भरुन देणार आहेत. तसेच दुरुस्ती व देखभाल देखील ते त्यांचे खर्चाने करणार आहे.

यासाठी त्यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव दिलेला आहे.

➢ Price Schedule :

| | |
|---|---|
| Basic Gas Price, Rs/Cum | Rs. 12.50 |
| Excise Duty (As applicable) | Nil at Present |
| Sales Tax @ % | 4% |
| Facility Charge per month | Rs. 20,000/- |

| | |
|---|---|
| (2*990 Ltr. Or 1*5600 Ltr.) | |
| Delivery Charge. Rs./Cum | 3.75 |
| Octroi (As applicable) | Nil at Present |

**ONE TIME CHARGES** :
CCE Charges : Rs. 75,000/- (For the installation of 5600 liters vessel)
*Note* : Installation of 5600 Liters vessel is subject to special permission & approval from CCE, Nagpur & meeting of internal worldwide BOC Group norms.

त्यांचे वरील दराप्रमाणे एक क्युबीक गॅससाठी रु. २२.०५ इतका खर्च येईल. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

आपणास सध्याचे खपाप्रमाणे अंदाजे एक महिन्यासाठी ७०० क्युबीक गॅस लागतो.

Basic Price Per cubic - 12.50
Delivery Charges - 3.75
Total - 16.25
VAT 4 % - 0.65
Total - 16.90
Facility Charges per cubic - 4.58
VAT 12.5% on Facility Charges- 0.57
Total - 22.05 x 700 = Rs. 15435.00 (दरमहा खर्च)
- एक वर्षाचा खर्च रु. १५,४३५.०० x १२ = १,८५,२२०/-

जर आपण ५६०० लिटर क्षमतेचा टँक बसविला तर आपणास चिफ कंट्रोलर ऑफ एक्सप्लोजीव्ह (CCE) यांची एक वेळेची फि रु. ७५,०००/- वेगळी भरावी लागणार आहे. वरीलप्रमाणे रु. २२.०५ प्रती क्युबीक गॅसचा खर्च येईल. म्हणजे आपणास मे. बालाजी गॅस, संगमनेर यांचे पेक्षा रु. २.९१ प्रती क्युबीक गॅस स्वस्त मिळेल. (२४.९६ - २२.०५ = २.९१)

तेंव्हा आपण जर मे. बी.ओ.सी. इंडीया लि., मुंबई यांचेकडून वरीलप्रमाणे गॅसचा प्रकल्प बसवून घेतला तर आपणास रीफिलींग, दुरुस्ती व देखभाल, गॅस किती शिल्लक आहे हे वेळोवेळी देखील पहाण्याची आवश्यकता भासणार नाही व रुग्णांची तातडीची गरज दुर होईल. दोन्ही रुग्णालयास उपयुक्त ठरेल अशी मध्यवर्ती योग्य जागा संस्थानला उपलब्ध करुन दयावी लागेल.

वरील दरामध्ये चर्चा / वाटाघाटी नंतर अजुन सुट मिळू शकेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन लिक्वीड गॅस प्लॅन्ट बसविणेस तत्वत: मान्यता देण्यात आली. तथापि याच क्षेत्रातील इतर पुरवठादार कंपन्यांशी संपर्क साधून सविस्तर प्रस्ताव फेरसादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**विषय नं.१४.** **तेलगू साईचरित्र ऑडिओ सी.डी. तयार करणे बाबत.**

**निर्णय क्र.४३०.** संस्थान प्रकाशित साईचरित्र तेलगूवर आधारित ऑडिओ सी.डी. ची मास्टर कॉपीची निर्मिती करणे आहे. श्री एस.आर. कोटेश्वरराव, हैद्राबाद म्युझिक डायरेक्टर, हैद्राबाद यांनी दि.२१.०६.२००६ रोजीचे दाखल झालेले पत्रात तेलगू साईचरित्राची स्वत:चे जबाबदारीवर ऑडिओ सी.डी. ची मास्टर कॉपी तयार करणेबाबत प्रस्तुत केले आहे. सदर पत्राद्वारे श्री एस.आर. कोटेश्वरराव हैद्राबाद यांनी तेलगू साईचरित्राची ऑडिओ सी.डी. ची मास्टर कॉपी तयार करणेसंबंधीत सर्वस्वी कार्यवाही करण्याची जबाबदारी स्वीकारली असून, तत्संबंधीत संपूर्ण कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे अपेक्षित खर्च कळविला आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कथन | १,००,०००/- |
| ०२ | संगीत | १,००,०००/- |
| ०३ | कोरस | २५,०००/- |
| ०४ | इतर संबंधीत खर्च | ७५,०००/- |
| ०५. | मास्टरींग चार्जेस | ७५,०००/- |
| | एकूण रुपये - | ३,७५००००/- |

उपरोक्तप्रमाणे तेलगू साई चरित्राची ऑडिओ सी.डी. ची मास्टर कापीचे निर्मितीसाठी एकूण रुपये ३,७५,०००/- मात्र चे अपेक्षित खर्च कळवून, सदर कामाचे कार्यवाहीसाठी संस्थानची परवानगी मागितली आहे.

तरी श्री.एस.आर. कोटेश्वरराव,हैद्राबाद यांना तेलगू साईचरित्राची ऑडीओ सी.डी.ची मास्टर कापीचे निर्मिती करणेस परवानगी देणेस व तत्संबंधीत संपूर्ण कार्यवाही त्यांचे मार्गदर्शनाखाली करुन घेणेस तसेच त्याकामी येणारे एकूण रुपये ३,७५,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख, पंच्याहत्तर हजार) मात्र चे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री एस.आर. कोटेश्वरराव, हैद्राबाद यांना तेलगू साईचरित्राची ऑडीओ सी.डी.ची मास्टर कॉपीचे निर्मिती करणेस परवानगी देणेऐवजी याकामी कोटेशन्स मागविण्यात यावेत. याकामी येणारे अंदाजे एकूण रुपये ३,७५,०००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.१५.** **दोन रुग्णवाहिका देणगी स्वीकारणेबाबत.**

**निर्णय क्र.४३१.** श्री अशोक मिरपुरी, मुंबई यांनी दि.०५/०६/२००६ चे ई-मेल पत्राने श्री साईबाबा हॉस्पिटल करीता दोन कार्डीयाक रूग्णवाहिका किंवा इतर कोणत्याही रूग्णवाहीका देणगी देण्याची इच्छा प्रकट केली आहे. दि.०७/०६/२००६ रोजी श्री अशोक मिरपुरी, मुंबई यांचेशी दुरध्वनी वरून चर्चा केली असता कार्डीयाक रूग्णवाहिका किंवा इतर साध्या रुग्णवाहिका देण्यास तयार आहे. या बाबत श्री साईबाबा हॉस्पिटलचे वैद्यकिय संचालक यांचेशी चर्चा केली असता, कार्डीयाक रुग्णवाहिका करीता डॉक्टरांची टिम नसलेने व पुर्वीची एक कार्डीयाक आपल्याकडे असलेने आणखी कार्डीयाक रूग्णवाहिका न घेता साध्या दररोज वापरात येतील अशा दोन रूग्णवाहिका घ्याव्यात असे सांगितले आहे.

आपणाकडे हॉस्पिटल करीता सध्या खालील प्रमाणे रुग्णवाहिका वापरात आहेत.

| अ.नं. | वाहन प्रकार | वाहन क्रमांक | नग | खरेदी दिनांक | वापर कि.मी . |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टाटा सुमो | एमएच-१७/के-६२८१ | ०१ | २९/०३/२००२ | २,५९,१४० |
| ०२ | टेम्पो ट्रॅव्हलर | एमएच-१७/के-६६०१ | ०१ | ०२/०५/२००२ | १,७०,७१४ |
| ०३ | मारूती (पेट्रोल) | एमएच-१७/के-६६५१ | ०१ | २०/०५/२००२ | ५४,८४८ |
| ०४ | कर्डीयाक रूग्णवाहिका | एमएच-१७/के-९५०१ | ०१ | ११/११/२००४ | १६,९९२ |
| | | एकूण | ०४ | | |
| ०५ | टाटा४०७ | नवीन खरेदी | ०१ | - | - |
| ०६. | --- | श्री अशोक मिरपुरी, मुंबई यांचे कडून संभाव्य देणगी | ०२ | - | - |
| | | एकूण | ०७ | - | - |

वरील प्रमाणे पुर्वीच्या- ०४, प्रस्तावीत खरेदी- ०१, व देणगी येणाऱ्या- ०२ अशा एकूण ०७ रूग्णवाहिका होणार आहेत.

अ.नं.०१ व अ.नं.०२ टाटा सुमो व टेम्पो ट्रॅव्हलर यांचा वापर जास्त प्रमाणात झाल्यामुळे यापुढे रूग्णवाहिका म्हणून वापरणे बंद कराव्या लागतील.

तसेच साईबाबा हॉस्पिटल करीता एक कार्डीयाक व एक साधी आशा दोन रूग्णवाहिका उपलब्ध राहातील.

तरी वरील प्रमाणे श्री साईभक्ताचे ई-मेल पत्रानुसार एक टाटा४०७ व एक टाटा सुमो अशा दोन रुग्णवाहिका देणगी घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, एक टाटा ४०७ व एक टाटा सुमो ऐवजी दोन्हीही टाटा ४०७ रुग्णवाहिका देणेबाबत साईभक्तास विनंती करावी असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.१६.** **मोबाईल सर्व्हीसेस आणि क्यूआससाठी आलेल्या निविदा उघडणे बाबत.**

**निर्णय क्र.४३२.** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०१ एप्रिल, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २१६ व निर्णय क्रमांक २१७ नुसार श्री साईभक्तांना मोबाईल सर्व्हिसेस उपलब्ध करुन देणे व श्री साईभक्तांना मंदिर परिसरात संस्थान व श्री बाबांविषयी माहिती प्राप्त करुन देण्यासाठी दोन क्युऑस (टच स्क्रीन) खरेदी करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. या निर्णयानुसार विहित पध्दतीने सिलबंद प्रस्ताव व निविदा मागविणेसाठी दिनांक १९ मे, २००६ रोजी ०१. Indian Express (English), Mumbai & Pune Edition. ०२. महाराष्ट्र टाईम्स (मराठी) या नामांकित इंग्रजी व मराठी वर्तमान पत्रांमध्य जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा / प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत ०३ जून, २००६ अखेर देण्यात आली होती.

उपरोक्त जाहिरातीनुसार निविदाधारकांनी सिलबंद निविदा / प्रस्ताव दिनांक ०३ जून, २००६ अखेर संस्थानला सादर केल्या आहेत. त्यांचा तपशील पुढील प्रमाणे :

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| 01 | E-ql Business Solutions Pvt Ltd.<br>Shree Apartment, “Samruddhi”,Deepjyoti Colony, Survey no 1/24,Near Vitthal Mandir, Karvenagar Pune- 52 |
| 02 | Pendulum Solutions Pvt. Ltd.<br>2, Vora Palace,M. G. Road, Kandivli, (West),Mumbai-400 067 |
| 03 | ITV COMPUTERS PVT Ltd.<br>3 Om Krishna Kunj, M.G. X Road No 3,Kandivli (West), Mumbai- 400067 |
| 04 | Value First Message Pvt. Ltd.,<br>Corporate Office- C-071 B, DLF Supermart-1,DLF City IV, Gurgaon- 122 002 |
| 05 | Jawahar B Lalla, |

| | |
|---|---|
| | CMS Computers Ltd.Mumbai. |
| 06 | SINIC Electronics Pvt. Ltd.,<br>Regd. Office- 305, Arcadia Nariman Point,Mumbai-400 021. |
| 07 | Mauj. Com,<br>People Infocom Pvt. Ltd.2 B(2) (ii) Grd. Floor, Filmcentre Bldg. 68 Tardeo Road, Mumbai-400 034. |
| 08 | Blow U' r Mind Production,<br>6 Pride Monarch, Jayabai Colony,Near Mehsobha Temple, Nashik Road, Nashik-452010. |

उपरोक्तप्रमाणे, मोबाईल सर्व्हिसेस व क्युऑस (टच स्क्रिन) खरेदी करणेसाठी आलेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. त्यातील दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.१७. संगणक लॅबसाठी संगणक, सर्व्हर व इतर साहित्य खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.४३३.** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये महाराष्ट ज्ञान महामंडळ यांचेकडील MS-CIT व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचेकडील निरनिराळे पाच संगणक अभ्यासक्रम चालविल जातात. तसेच संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतील २० व्यवसाय तुकड्यांच्या प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या समाज अभ्यास विषयाच्या अभ्यासक्रमाअंतर्गत संगणक प्रशिक्षण देण्यात येते. याशिवाय या २०तुकड्यांपैकी इन्फॉर्मशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॅानिक्स सिस्टिम मेंटेनन्स व्यवसायाच्या दोन तुकड्यांमध्ये प्रशिक्षणार्थ्यांना सविस्तर संगणक प्रशिक्षण द्यावे लागते. यामध्ये MS-CIT कोर्स ५२८ य.च.मु.वि संगणक कोर्सेस-१०० व नियमित ३५० अशी मंजूर विद्यार्थी क्षमता आहे.

नियमित प्रशिक्षण सोडून संगणक कोर्सेसच्या वेगवेगळ्या उपक्रमांमधून संस्थानला आतापर्यन्त रुपये ११,००,८००.०० एवढे महसूली उत्पन्न प्राप्त झालेले असून ते वेळोवेळी संस्थान खाती जमा केलेले आहे.

| अ.न | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | MS-CITअभ्यासक्रम -जानेवारी २००५ ते एप्रिल २००६ | ७,६१,१००.०० |
| ०२. | य.च.म.मु.वि.संगणक अभ्यासक्रम -जानेवारी २००० ते फेब्रु.२००६ | ३,३९,७००.०० |
| | एकूण रुपये | ११,००,८००.०० |

संस्थेमध्ये मध्यवर्ती संगणक लॅब विकसित करण्याचे काम सध्या सुरु आहे.सदरचे संगणक लॅबसाठी खालीलप्रमाणे एकूण रुपये १३,८५,०००.०० खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| Sr. No. | Particulars | Quantity | Approx total amount |
|---|---|---|---|
| 01 | Computer, IBM Make | 30 Nos | 12,00,000.00 |
| 02 | Printer (4 in 1) HP Make (Latest Version) | 05 Nos | 30,000.00 |
| 03 | Printer DMP_ Epson Make LQ- 2180 Or Latest Version | 04 Nos | 40,000.00 |
| 04 | Printer- Laser_ Wipro Make (Latest Version) | 01 Nos | 5,000.00 |
| 05 | Hub For net working (24 Port) | 02 Nos | 5,000.00 |
| 06 | Central UPS For Computer Lab | 01 set | 1,00,000.00 |
| 07 | Speakers with box 400 W (Artis make) | 08 Nos | 5,000.00 |
| | | Total Rs. | 13,85,000.00 |

यावर सविस्तर चर्चा होऊन, जिल्हा सहकारी बँक अहमदनगर, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, प्रवरानगर, संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेज,कोपरगाव या ठिकाणी संगणक खरेदीबाबत माहिती घेऊन फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-प्राचार्य, आय.टी.आय./आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.१८. विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी योजना सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र.४३४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.१९. कनिष्ठ महाविद्यालयासाठी फर्निचर खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.४३५.** २००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिरडी येथे इ. ११वीं कला आणि वाणिज्य शाखांचे वर्ग सुरु करण्यात आले. या नव्याने सुरु करण्यात आलेल्य वर्गासाठी खालीलप्रमाणे फर्निचर कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रुपये ८३,०००.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ. नं. | तपशील | नग | दर | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | लेक्चर स्टँड | ८ | २,५००/- | २०,०००/- |
| २ | गोदरेज स्टोअरवेल | ६ | ८,०००/- | ४८,०००/- |
| ३ | पिजन होल लॉकर्स | ३ | ५,०००/- | १५,०००/- |
| | | | | ८३,०००/- |

(कार्यवाही-प्राचार्या, कन्या विद्या मंदिर/अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.२०. संगमनेर तालूका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, घुलेवाडी , संगमनेर यांना संस्थानचे प्रसादालय परिसराजवळ स्टॉल करीता जागा देणेबाबत.**

**निर्णय क्र.४३६.** संगमनेर तालुका सह दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित ,संगमनेर यांनी साई मंदिराचे जवळ राजहंस उत्पादन विक्रीसाठी जागेची १२/०२/२००६ रोजीचे पत्राने मागणी केलेली होती. दुग्धजन्य पदार्थ विक्री तसेच ड्रिकिंग वॉटर त्यांचे मार्फत तयार करण्यात येते. परंतु संस्थानचे मंदिर परिसरात आपणांस स्टॉलसाठी जागा देता येत नाही. व यापूर्वी देखील कोणासही दिलेल्या नाहीत. जर स्टॉलकरिता जागा ५०० रुम अथवा धर्मशाळा परिसरात आवश्यक असल्यास त्या ठिकाणी देणेबाबत संस्थान नियमानुसार विचार करता येईल अशी संमती असल्यास याबाबत इकडील कार्यालयास उलटटपाली कळवावे. असे त्यांना जा.नं.एसएसएस/वशी२/४३४१/२००६ दि ३०/०४/२००६ ने कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रकिया संघ मर्यादित यांचे जा.क्रं.संगमनेर दूध/५५/२००५-२००६ दिनांक ०९/०४/२००६ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून त्यात त्यानी संस्थानने पाठविलेले पत्र मिळाले जागा उपलब्ध करुन देण्यास संमती दर्शविल्याबद्यल आभारी आहोत.सद्या सहकारी दूध संघाने आपण जेथे जागा उपलब्ध करुन दिली त्यांचेजवळ आमचे संघास स्टॉल करिता जागा मिळावी ही विनंती पत्रात केलेली आहे.

संस्थानने श्री साई संस्थान नोकरांची पतपेढी, शिरडी, प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रकीया खरेदी विक्री शेतकरी संस्था मर्यादित, लोणी, श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती संघ, यांना स्टॉल करिता जागा प्रसादालय परिसरात ( चौकशी व निवासस्थाा कार्यालया जवळ ) दिलेली आहे. त्याबाबतची परवाना फी माहीती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) साई संस्थान नोकरांची पतपेढी, शिरडी | एसटीडी बुथ | मासिक भाडे रुपये ८०६/- |
| २) प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक संस्था,लोणी | बेदाणा विक्री | मासिक भाडे रुपये ८००/-<br>( डिपॉझीट रुपये १०,०००/-) |
| ३) श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती संघ, श्रीरामपूर | दुग्धजयपदार्थ विक्री | मासिक भाडे रुपये ८००/-<br>( डिपॉझीट रुपये १०,०००/-) |

दिनांक २४/०४/२००६ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रमांक २५९नुसार उपलब्ध असलेले सर्व गाळे वर्तमापत्रात जाहिरात देऊा लिलावाने ११ महिन्याचे कालावधीसाठी लायसेस तत्वावर चालवणिस देण्यात यावेत असे ठरलेले आहे. संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, घुलेवाडी , संगमनेर यांनी स्टॉल करिता जागेची मागणी केलेली आहे. त्यांनी गाळा मागितलेला नाही याबाबत विचार करता त्यांना स्टॉल करिता जागा चौकशी व निवासस्थान कार्यालय जवळ असलेल्या इतर स्टॉलच्या शेजारी डिपॉझीट रुपये १०,०००/- व मासिक परवाना फी रक्कम रुपये १०००/- मात्र व मिटर रिडींग प्रमाणे लाईटबिल वेगळे आकारुन लिव्ह ॲड लायसेन्सी तत्वावर ११ महिने कालवधीकरिता दुग्धजय पदार्थ तसेच ड्रिकिंग वॉटर विक्री कामी संस्थान नियमानुसार स्टॉल करिता जागा देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस प्रसादालय इमारतीजवळ असलेले सर्वच स्टॉल्स एकाच आकाराचे एकाच डिझाईनचे असावे त्यासाठी बांधकाम अभियंता यांनी कार्यवाही करावी असे ठरले.

(कार्यवाही-विधी अधिकारी/बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२१. सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळयासाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४३७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.२२. संजीवनी प्री कॅडेट ट्रेनिंग सेंटर, कोपरगाव, शिधा मदतीबाबत.**

**निर्णय क्र.४३८.** संजीवनी प्रि कॅडेट टेनिंग सेंटर फॉर डिफेन्स सर्व्हीसेस पोलीस अँड इंडियन सिव्हील सर्व्हीसेस अँड मोटर ड्रायव्हिंग स्कुल, कोपरगांव यांनी दि.१६/०५/२००६ रोजीचे पत्रानुसार संस्थानमार्फत शिधा स्वरुपात धान्य शैक्षणिक वर्ष २००६ - २००७ यासाठी मिळावे अशी विनंती केलेली आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | नग | अ.नं. | तपशील | नग |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | गहू | १२ पोते | १२ | हरभरा | २४ किलो |
| ०२ | तांदूळ | ३६० किलो | १३ | मठ | २४ किलो |
| ०३ | रवा | .१२० किलो | १४ | काबली चणा | २४ किलो |
| ०४ | तुप | ०४ डबे | १५ | खोबरे | २४ किलो |
| ०५ | शेंगदाणा तेल | २०० किलो | १६ | मिरची पावडर | १५ किलो |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०६ | साखर | १०० किलो | १७ | धना पावडर | १५ किलो |
| ०७ | तुरडाळ | १०० किलो | १८ | हळद | १० किलो |
| ०८ | मुगडाळ | १०० किलो | १९ | मिठ | ९० किलो |
| ०९ | मसुरडाळ | १०० किलो | २० | जिरे | ०२ किलो |
| १० | शेंगदाणे | ६० किलो | २१ | मोहरी | ०२ किलो |
| ११ | पोहे | १०० किलो | २२ | वटाणा | २४ किलो |

उपरोक्तप्रमाणेचा शिधा हा तीन महिन्यासाठीचा असून असे वर्षातून ४ बॅचेस होतात.

सदरची संस्था ही सप्टेंबर १९९२ पासून कार्यरत असून वर्षात तीन तीन महिन्याच्या अश्या एकूण ४ बॅचेस असून प्रत्येक बॅचमध्ये ४० प्रशिक्षणार्थी असतात. आतापर्यंत ४२ तुकडया प्रशिक्षण घेऊन बाहेर पडल्या आहेत. त्यांना अल्पदरात सैन्यात भरती होणेसाठीचे पूर्व शिक्षण या संस्थेतून दिले जाते. सदरच्या संस्थेत महाराष्ट्रातून गरीब व होतकरु विद्यार्थी भरती होत असतात. आजतागायत संस्थेतून १४८३ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले असून पैकी ८०१ प्रशिक्षणार्थी संरक्षण दलातील विविध क्षेत्रात भरती झाले असून, २२३ विद्यार्थी इतर खाजगी क्षेत्रात नोकरीत आहेत. असे एकूण १०२४ प्रशिक्षणार्थींना आजपर्यंत या संस्थेद्वारे रोजगार मिळालेला आहे. यावर्षीही सदर संस्थेने दर तीन महिने कालावधीकरीता सन २००६-२००७ या वर्षासाठी शिधा धान्य स्वरुपात मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

सन २००४, सन २००५ व सन २००६ मध्ये मा. व्यवस्थापन समितीने सदरचे संस्थेस वर्षभरासाठीचे ४ बॅचेससाठी अश्याप्रकारे शिधा धान्य स्वरुपात देण्याचे मंजूर केलेले आहे. त्यानुसार संस्थानने मदत केलेली आहे. यावर्षीही म्हणजे सन २००६-२००७ साठी त्यांनी उपरोक्तप्रमाणे दर तीन महिन्यासाठी शिधा मिळावा म्हणून अर्ज केलेला आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संजीवनी प्री कॅडेट ट्रेनिंग सेंटर, कोपरगांव यांना सन २००६-२००७ साठी उपरोक्तप्रमाणे शिधा शासनाचे मान्यतेचे अधिन राहून देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०५)

**विषय नं.२३. श्रीमती मंदा संपत आरणे व श्री विजय बबन बोडखे, वर्ग-४ चे कर्मचारी यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणे बाबत.**

**निर्णय क्र.४३९.** श्रीमती मंदा संपत आरणे यांची प्रसादालय विभागाकडे व श्री.विजय बबन बोडखे यांची चौकशी विभागाकडे मदतनीस (वर्ग-४ चे कर्मचारी) या पदावर दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी सर्व मिळून दरमहा **रु.२०००/-** (रु. दोन हजार मात्र) चे नियत वेतनावर नेमणूक करण्यात आलेली आहे.त्यानुसार श्रीमती आरणे हया दि.०१/०७/२००४ तसेच श्री विजय बोडखे हे दि.११/०७/२००४ रोजी कामावर हजर झाले आहेत.त्यांचा एक वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी सपंल्यानंतर त्यांना सध्या दरमहा रु.२५००/- नियत वेतन आदा करण्यात येत आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.नं | कर्मचा-याचे नांव व हुद्दा | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपण्याची तारीख | वैद्यकिय पात्रता | संस्थान सेवेत कायम करणेची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती मंदा संपत आरणे स्त्री-मदतनीस प्रसादालय विभाग | अशिक्षीत | ०१/०७/२००४ | ३०/०६/२००६ | २०/०८/२००४ चे प्रमाणपत्रानुसार पात्र | ०१/०७/२००६ |
| ०२ | श्री.विजय बबन बोडखे मदतनीस चौकशी व निवासस्थान विभाग | ११ वी पास | ११/०७/२००४ | १०/०७/२००६ | १०/०५/२००५ चे प्रमाणपत्रानुसार पात्र | ११/०७/२००६ |

उपरोक्त अ.नं. १ वरील वर्ग-४ कर्मचारी श्रीमती आरणे यांचे काम व वर्तणूक चांगली आहे त्या हुकमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचे बाबतीत कोणतेही प्रकरण चालू किंवा प्रस्तावित नाही. त्यांना वेतनश्रेणी देऊन सेवेत कायम करणेस हरकत नाही. असे अभिप्राय अधिक्षक प्रसादालय विभाग यांनी दिले आहेत.

तसेच अ.नं. २ वरील वर्ग-४ कर्मचारी श्री बोडखे यांचे काम समाधानकारक आहे.त्यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही.असे अभिप्राय अधिक्षक चौकशी व निवासस्थान विभाग यांनी दिलेले आहेत.

उपरोक्त अ.नं. १ व २ वरील वर्ग-४ कर्मचारी यांचे बाबत संबंधीत अधिक्षक यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखेपासून **रु.२५५०-५५-२६६०-६०-३२००** ही वेतनश्रेणी देऊन,संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.२४.** **श्री साईबाबा हॉस्पिटलकडे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स व इतर पॅरामेडिकल पदावर करण्यात आलेल्या नेमणूकांबाबत.**

**निर्णय क्र.४४०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.२५.** **अ) डॉ.मनिष एस.पेंडसे (आर.एम.ओ) यांचे नेमणूकीबाबत.**
**ब) डॉ.सतिष रेड्डी, असो.कन्सलटंन्ट (जनरल सर्जरी) यांचे नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र.४४१.** संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयाकडे वैद्यकीय अधिकारी या पदावर नोकरी मिळणेबाबत उपरोक्त संदर्भ क्र.०१ ते ०३ अर्जदार यांनी वैद्यकीय अधिक्षिका,श्री साईनाथ रुग्णालय यांचेकडे अर्ज केलेले असून,ते त्यानुसार त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | नांव व पत्ता | शैक्षणिक व व्यवसायीक पात्रता | वैद्यकीय अधिक्षिका,यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| 01. | डॉ.रितेश भिकुलालजी अग्रवाल<br>सेंट लुक्स हॉस्पीटल,श्रीरामपूर | एम.बी.बी.एस.,<br>डी.सी.एच. | The Candidate is interviewed found suitable & post in Sainath is Vaecant Since June-2005. |
| 02. | डॉ.राधा आर.अग्रवाल<br>सेंट लुक्स हॉस्पीटल,श्रीरामपूर | एम.बी.बी.एस.डी.अो.आर.एल.<br>(इ.एन.टी.) | The Candidate is interviewed for ENT Housepost.The basic qualification is M.B.B.S.The result of diploma is awaited No objection to appoint as RMO.with ENT Suregon Dr.Kulkarni in Sainath Hospital. (The candidate seems to be fit for resident post in ENT.Dept.I recommanded he for immidiate appoint as the work load in ENT in tremendous and it will help give letter to ENT patent. Forwarded with high recommanded.) |
| 03. | डॉ.मनिष एस.पेंडसे<br>द्वारा :- सौ.आशा एस.पेंडसे<br>श्री साईनाथ हॉस्पीटल शिर्डी | एम.बी.बी.एस. | The Candidate is interviewed found suitable for ICCU as already had experience in ICCU Working |

उपरोक्त प्रमाणे आलेले अर्जावर वैद्यकीय अधिक्षिका यांनी त्यांचे नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे अभिप्राय देवून ते मा.विश्वस्त डॉ.ई.बी.गोंदकर यांचेकडे पाठविले असून त्यावर," उपरोक्त आलेले अर्ज आपले शिफारसपत्र मिळावे व आपण यांच मुलाखत घेतलेली असून श्री साईनाथ रुग्णालयात त्यांच्या नेमणूका त्वरीत कराव्यात."अशी विनंती केलेली आहे.

वरिल अ.नं.०१ ते ०३ डॉक्टरांच्या नेमणूका त्वरीत कराव्यात साईनाथ रुग्णालयात वरिल जागेवर बऱ्याच दिवसांपासून डॉक्टर नाहीत.रुग्णालयाच्या अडचणींचा विचार करता त्वरीत नेमणूका कराव्यात." असे अभिप्राय मा.विश्वस्त डॉ.ई.बी.गोंदकर यांनी दिलेले आहेत.

उपरोक्त अ.नं.०१ ते ०३ बाबत,"Candiadates in the application may be called for the interview and then with negotiation of Salary/or may be accomodated in RMO's Salary**."**असे अभिप्राय वैद्यकीय संचालक यांनी दिलेले आहेत. याबाबत त्यांचेशी चर्चा केली असता त्यांनी," उपरोक्त तिनही उमेदवारांना मंगळवार दि.१३/०६/२००६ रोजी सायंकाळी ४ ते ५ चे दरम्यान मुलाखतीसाठी वैद्यकीय संचालक यांचे कार्यालयात हजर रहाणेकामी दूरध्वनीद्वारे कळवावे मुलाखतीनंतर त्यांचे नेमणूकीबाबत विचार करता येईल असे वैद्यकीय संचालक यांनी फोनवरुन कळविलेले आहे.

उपरोक्त अर्जदार यांचे अर्ज ,त्यांची शैक्षणिक व व्यावसायीक पात्रता,व त्यांच्या वैद्यकीय अधिक्षिका यांनी घेतलेल्या मुलाखतीबाबतचे अभिप्राय तसेच मा.विश्वस्त डॉ.गोंदकर यांचे अभिप्राय तसेच वैद्यकीय संचालक रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता उपरोक्त तीनही उमेदवारांच्या दि.१३/०६/२००६ रोजी मा.विश्वस्त डॉ.गोंदकर,वैद्यकीय संचालक,वैद्यकीय प्रशासक,श्री साईबाबा रुग्णालय व वैद्यकीय अधिक्षिका श्री साईनाथ रुग्णालय यांचेसमोर मुलाखती घेवून त्यांना संस्थान रुग्णालयामध्ये आर.एम.ओ.या पदांवर मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०५/११/२००५ रोजीच्या झालेल्य सभेतील निर्णय क्र.६६७ नुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/७५/२००५ दि.०७/०१/२००६ चे अधीन राहून अ.नं.०१ ते ०२ यांना दरमहा रु.१८,०००/- व अ.नं.०३ यांना रु.१७,०००/- या एकत्रीत

मानधनावर प्रथमतः प्रत्येकी सहा महिन्यांकरीता नेमणूका देता येतील.(तथापि,जाहीरातीनूसार दि.२३/०४/२००६ रोजी आर.एम.ओ.पदासाठी मुलाखती घेण्यात आल्या असून निवड यादी झालेली आहे.) त्यानुसार उपरोक्त प्रमाणे उमेदवारांच्या मुलाखती वैद्यकिय संचालक यांनी दि.१३/०६/२००६ रोजी घेतल्या त्यावेळी डॉ.रितेश आग्रवाल,एम. बी. बी. एस. डी. सी. एच.व डॉ राधा आग्रवाल,एम.बी.बी.एस.डी.जी.ओ.हे मुलाखतीसाठी हजर राहीले नाही. फक्त डॉ.एम.एस.पेंडसे एम.बी.बी.एस.हे हजर राहीले त्यांचे बाबत त्यांची मुलाखत घेवून," The knowledge of the candidate Dr.Pendse is enough for the post of Resident Medical Officer.He is recommended for appointment to the post of RMO Sainath Hospital,Shirdi." असे अभिप्राय दिले आहेत.

तरी वैद्यकीय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे उपरोक्त अभिप्रायानुसार डॉ.मनिष एस.पेंडसे यांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे आर.एम.ओ.या पदावर प्रतिमहा रु.१७,०००/- एकत्रीत मानधनावर प्रथम सहा महिन्यांसाठी नेमणूक जा.नं.एसएसएस/वशी-१/८०६४/२००६ दि. १९/०६/२००६ अन्वये नेमणूक देण्यात आलेली आहे.

ब) डॉ. सतिष रेडड्री एमबीबीएस एमएस (लॅप्रोस्कोपी तज्ञ) यांनी दि.०७/०६/२००६ रोजी संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल कडे नोकरी मिळणेबाबत अर्ज केला होता. त्यानुसार मा.डॉ तिवारी विश्वस्त तथा अध्यक्ष रुग्णालय निवड समिती यांनी त्यांची मुंबई येथे मुलाखत घेऊन त्यांचे अर्जावर To be appointed as Associate Surgeon for Six months and then Consultant Surgeon.असे अभिप्राय वजा आदेश दिले आहेत.

श्री साईबाबा हॉस्पीटलच्या नवीन कर्मचारी आकृतीबंधात सदर पदाची एकूण चार पदे प्रस्तावीत केलेली असून त्यापैकी डॉ. खडतरे यांची शिफारस यापूर्वी झालेली असून ते अद्यापपर्यंत हजर झालेले नाहीत. तेंव्हा डॉ. सतिष रेड्डी यांना सहाय्यक जनरल सर्जन या पदावर ०६ महिन्यांसाठी नियुक्ती देऊन त्यांचे काम पाहून त्यांनतर जनरल सर्जन या पदावर नियुक्त करता येईल तसेच डॉ. रेड्डी यांना एकत्रित मानधनावर प्रथमः ६ महिन्यांची नेमणूक देता येईल व ६ महिन्यानंतर पुन्हा निर्णय घ्यावा लागेल असे अभिप्राय वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल व प्रशासकिय अधिकारी श्री साईबाबा यांनी दिलेले आहेत.

उपरोक्त डॉ.पी.एल.तिवारी, विश्वस्त तथा अध्यक्ष रुग्णालय निवड समिती , वैद्यकिय संचालक व प्रशासकिय अधिकारी रुग्णालये यांचे अभिप्रायानुसार डॉ.सतिष रेडी जनरल सर्जन यांना जा.नं एसएसएस/वशी-१/७८१८/२००६ दि.१५/०६/२००६ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलकडे "Associate Consultant (General Surgery ) या पदावर प्रति महा रु. ३०,०००/-एकत्रित मानधनावर सहा महिन्यासाठी तात्पुरती नेमणूक देण्यात आलेली असून त्यांची निवासस्थानाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे अ)डॉ. मनिष पेंडसे वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ.) यांचे व ब) डॉ सतिष रेड्डी (जनरल सर्जन )यांचे नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.२६. श्री मिलींद सोनवणे ज्यू कॅथ लॅब टेक्निशियन यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.४४२.** श्री मिलींद लालचंद सोनवणे, यांची जा.नं.एसएसएस/वशी-१/२२८७/२००६ दि.१७/०२/२००६ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ज्यु.कॅथलॅब टेक्नीशियन यां पदावर प्रतिमहा रु.४०००/-(रु.चार हजार ) मात्र एकत्रित मानधनावर सहा महिन्याकरीता नेमणूक करण्यात आलेली असून त्यानुसार ते दि.०७/०१/२००६ रोजी कामावर हजर झालेले आहेत.त्यांचे नेमणूकीचा सहा महिन्यांचा कालावधी दि.०६/०७/२००६ रोजी संम्पुष्टात येत आहे.

श्री सोनवणे यांचे बाबत माहितीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | नांव हुद्दा | शैक्षणिक पात्रता | जन्मतारीख | नेमणूक तारीख | मुदत संम्पुष्टात येण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री मिलींद लालचंद सोनवणे, ज्यु.कॅथलॅब टेक्नीशियन श्री साईबाबा हॉस्पीटल शिर्डी | एस.एस.सी. (१९९३-९४) | ०१/०२/१९७९ | ०७/०१/२००६ | ०६/०७/२००६ |

वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी, "श्री. मिलींद लालचंद सोनवणे हे दि.०७/०१/२००६ रोजी कामावर हजर झालेले आहेत. श्री सोनवणे ज्यु कॅथलॅब टेक्निशियन यांचे काम सर्वसाधारणच असून वरीष्ठांशी त्यांचा व्यवहार नम्रतेचा नाही. यात सुधारणा होणेचे दृष्टीने त्यांना याबाबत समज देऊन आहे त्याच पदावर व तसेच एकत्रित मानधनावर ०६ महिने मुदतवाढ देणेस हरकत नाही." असे अभिप्राय दिलेले आहेत.

तरी उपरोक्त वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे अभिप्राय विचारात घेवून श्री सोनवणे,ज्यु.कॅथलॅब टेक्निशियन श्री साईबाबा हॉस्पीटल यांना सदरचे पदावर यापूर्वी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीचे अधीन राहून त्यांच्या कामात सुधारणा व वरिष्ठांशी त्यांचा व्यवहार नम्रतेचा व्हावा अशी समज देवून दि.०७/०७/२००६ पासून पुढे सहा महिन्यांसाठी वाढविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०१. दिनांक ०५.०७.२००६ रोजी शिरडी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताची नोंद घेणे**

**निर्णय क्र.४४३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय क्र. ०२. माहे जून,२००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.४४४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०३. माहे जून ,२००६ मध्ये श्री साईबाबांनी अर्पण झालेली वस्त्रे व इतर व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.४४५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०४. माहे जून, २००६ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र.४४६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५. माहे जून २००६ मध्ये श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रुग्णांना देण्यात आलेल्या सवलती बाबत.**

**निर्णय क्र.४४७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०६. श्रीसाईबाबा रुग्णालयातील प्लॅस्टिक सर्जरीसाठी मशिनरी,साहित्य हत्यारे इत्यादी खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.४४८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०७. फिजिओथेरपी विभागासाठी उपकरणे/साहित्य खरेदी बाबत**

**निर्णय क्र.४४९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०८. दंत विभाग साहित्य खरेदीबाबत चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.४५०.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३.०६.२००६ चे सभेतील मंजुरी अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील डेंटल विभागासाठी डेंटल मशिनरी इक्वीपमेंटचे खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.११,२१,०००/- चे खर्चास व कोटेशन मागविण्यास मंजूरी मिळाली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. ७८०८ दि.१४.०६.२००६ अन्वये एकुण १९ अधिकृत विक्रेते यांचेकडून दि.२४.०६.२००६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यापैकी १० कोटेशन प्राप्त झालेले आहेत. ते खालील प्रमाणे.

१) मे. वसंत डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक
२) मे. सुझ - डेंट प्रा.लि., अहमदाबाद
३) मे. न्यु स्माईल डिस्ट्रीब्युटर्स, लोणी
४) मे. दोशी मार्केटीग कार्पो., मुंबई
५) मे. क्रोमोडेंट डेंटल इक्वीपमेंट, मुंबई
६) मे. श्रीशा डिस्ट्रीब्युटर्स, पुणे
७) मे. श्रीरंग डिस्ट्रीब्युटर्स, लातूर
८) मे. सुझ - डेंट प्रा.लि., अहमदाबाद
९) मे. जे.सी.गोडीवाला, मुंबई
१०) मे. सर्फा ट्रेडर्स, मुंबई

वरीलपैकी अ.नं. ६,७,८,९ हे कोटेशन प्रशासन शाखेमार्फत टपालातून उघडुन मिळाले आहे व अ.नं. १० हे कोटेशन ई-मेल व्दारे प्राप्त झालेले आहे. अ.नं.९ जे.सी. गोडीवाला, मुंबई यांना आपण कोटेशनचे पत्र पाठवले नव्हते. तथापी त्यांनी स्वतःहून कोटेशन दिलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता खालील कोटेशन्ससादरकर्ते आजचे सभेस उपस्थित होते.

| अ.नं. | कंपनीचे नांव |
|---|---|
| १ | वसंत डिस्ट्रीब्युटर्स,नाशिक |
| २ | सुझ-डेंन्ट,अहमदाबाद |
| ३ | दोशी मार्केटींग , मुंबई |
| ४ | न्युसमाईल डिस्ट्रीब्युटर्स,लोणी |
| ५ | क्रोमोडेन्ट,मुंबई |
| ६ | सर्फा ट्रेडर्स,मुंबई |

उपरोक्त सर्व कोटेशन्ससादरकर्त्यांना सभेपूढे समक्ष बोलाविण्यात येऊन त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे याबाबत विचारणा केली व त्यांना सुधारित दर देणेबाबत सांगणेत आले. त्यांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकिय संचालक,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०९. प्लॉस्टिक सर्जरी विभागासाठी ग्लायकोलीक ॲसीड किट खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.४५१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १०. प्रयोगशाळा विभागासाठी किरकोळ साहित्य खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.४५२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ११. श्री साईनाथ रुग्णालयाकरीता क्ष-किरण मशिन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.४५३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १२. श्री साईबाबा मंदिर परिसरात कास्ट आयर्न गेटस व त्या संबंधित बांधकामाच्या निविदांबाबत.**

**निर्णय क्र.४५४.** समाधी मंदिर परिसरातील ४ महाव्दारांना, तसेच मंदीर परीसरातील कंपाउन्ड वॉलचे व समाधी मंदीर दक्षिण बाजूकडील २ गेट यांना कास्ट आर्यन गेट व त्यासंबधी बांधकाम करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३/०६/२००६ रोजीचे सभेत आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे, नवि दिल्ली यांनी सादर केलेल्या रु. १७,८४,८७८.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा विक्रीची दिनांक १७/०६/२००६ ते दि.२३/०६/२००६ अखेर ठेवण्यात आली . सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. २५/०६/२००६ पर्यंत ठेवण्यात आली होती. तरी खालील ठेकेदारांनी मुदतीत सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

०१. नितीन बी. औताडे, पोहेगांव
०२.. दुर्गा ट्रॅडींग कार्पोरेशन, औरंगाबाद
०३. व्दारका मार्ट प्रा.लि., इंदौर
०४. रंगादास कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलले आहेत.

| अ.न. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | नितीन बी. औताडे, पोहेगांव | २२,१९,५८१.२० | २२,००,०००.०० |
| ०२. | दुर्गा ट्रॅडींग कार्पोरेशन, औरंगाबाद | १९,७०,१८७.०० | १७,२३,०००.०० |
| ०३. | व्दारका मार्ट प्रा.लि., इंदौर | २२,८७,२१८.५० | अनुपस्थित |
| ०४. | रंगादास कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | अपात्र | --- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.दुर्गा ट्रेडींग कार्पोरेशन, औरंगाबाद यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १३. आरक्षण क्र.२३ बेघरांसाठी घरे जमीन विकत घेणे बाबत**

**निर्णय क्र.४५५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १४. मौजे पांढूर्ली, ता.सिन्नर येथील सौ.सिंधूबाई विजय दळवी यांची गट नं. १९ मधील क्षेत्र ०० हेक्टर ४९ आर दान म्हणून संस्थानने स्विकारणे बाबत.**

**निर्णय क्र.४५६.** सौ. सिंधुबाई विजय दळवी, राहणार विंचुरी दळवी, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक यांनी मौजे पांढुर्ली येथील गट नंबर १९ क्षेत्र ०० हेक्टर ४९ आर जमीन दान म्हणून स्वीकारावी म्हणून दिनांक २१ मार्च, २००६ रोजीच्या पत्राने प्रस्ताव दिलेला आहे. त्यामध्ये खालील अटी नमुद केलेल्या आहेत :

०१. सदरची जागा संस्थानने विकसित केल्यानंतर तिचा हक्क फक्त संस्थानकडेच ठेवावा, ती जागा पांढुर्ली ग्रामपंचायतीकडे मेटेनन्ससाठी देऊ नये.

०२. त्यांच्या कुंटुंबातील एक जण अगर नातेवाईक इसमास संस्थानतर्फे तेथे नेमणूक द्यावी.

त्यानंतर दिनांक २७ जुन,२००६ रोजी प्रशासकीय अधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी जागेची पहाणी केली. त्यावेळेस सौ.सिंधुबाई विजय दळवी यांचे पतीने त्यांच्यातर्फे सही करुन अर्ज दिला आहे. त्यात नमुद केले आहे की,

"…. दिनांक २१ मार्च, २००६ रोजी विनंती पत्रात "पालखी थांबा" विकसित केल्यानंतर तिचा हक्क फक्त संस्थानकडे ठेवावा, तो पांढुर्ली ग्रामपंचायतीकडे मेन्टेनन्ससाठी देऊ नये. संस्थानतर्फे माझ्या कुंटूंबातील अगर नातेवाईक एक इसमाची नेमणूक करावी या शर्तीवर मी माझी वरील जागा दान म्हणून संस्थानला तयार असल्याचे कळविले होते.

आता सदरची शर्त मी रद्द केली असून विना अट संस्थानला देणगी देण्याची इच्छा आहे तरी ती स्विकारावी. त्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता मी स्वतः करुन देईल."

पांढुर्ली येथील गट नंबर १९ मधील प्रश्नाधीन जमीन कुळकायदा १९४८ नियम ३२ ग अन्वये खरेदी केलेली आहे व त्यामुळे कुळ कायदा कलम ४३ अन्वये नियंत्रित सत्ता प्रकारची झालेली आहे.

याबाबत, मुळ जमीन मालक श्रीमती नंदाबाई काशिनाथ पवार व इतर ९ यांनी श्रीमती सिंधुबाई विजय दळवी यांना जमीन विकण्याबाबत मा.विभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड यांची परवानगी घेतलेली आहे.

मा.उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड यांचा आदेश क्रमांक टेनन्सी / एसआर /८ /२००५, दिनांक १६ मार्च, २००५ अन्वये जमीन विक्रीस मंजूरी दिली आहे. सदर आदेशाचे अवलोकन केले असता,

अट क्र.०२ मध्ये खरेदीदाराने सदर जमीन शेती कामासाठी वापरावयाची आहे.

अट क्र.०६ मध्ये वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास सदरची मंजूर रद्द होण्यास पात्र राहिल.

सदरची जमीन संस्थानने दान म्हणून स्विकारले नंतर, पालखी थांबा साठी इमारतीचे बांधकाम होणार आहे म्हणजे सदर जमिनीचा बिनशेतीच्या कामासाठी होणार आहे. त्यामुळे सदर जमिनीचा वापर बिनशेती कारणासाठी होणार आहे म्हणून कुळकायदा १९४८ प्रमाणे परवानगी मिळण्यासाठी सोबत मा.उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड यांचेकडे परवानगी मिळणेसाठी पत्र दिलेले आहे.

सौ. सिंधुताई विजय दळवी यांची जमीन मौजे पांढुर्ली गट नंबर १९ क्षेत्र ०० हेक्टर ४९ आर मार्गे पायी पालखी घेऊन येणाऱ्या साईभक्तांसाठी उपयुक्त आहे. त्या विना अट जमीन देण्यात तयार आहेत. त्यांची शेती जमीन देणगीदाखल घेणेस मान्यता मिळणेस व त्यासाठी आवश्यक कायदेशीर पुर्तता करुन घेणेस, बक्षिसपत्राचा मसुदा संस्थानचे वकील यांचेकडून तयार करुन घेणेस व याकामी येणारे मुद्रांक व नोंदणी शुल्क, मोजणी शुल्क व इतर आवश्यक त्या सर्व खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १५. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची मौजे निमगांव कोऱ्हाळे कनकुरी व शिर्डी येथील जमीन भूसंपादनाने घेणे बाबत**

**निर्णय क्र.४५७. (अ)** महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची मौजे निमगांव कोऱ्हाळे, कनकुरी व शिर्डी येथील जमीन भूसंपादनाच्या माध्यमातून घेणेबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०२ ऑक्टोबर, २००५ रोजी निर्णय क्रमांक ६४६ खालीलप्रमाणे झालेला आहे :

"…. खालील बाबींवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील हेक्टर ६३-०९ आर, शिर्डी येथील हेक्टर ११-८२ आर, कनुकरी येथील हेक्टर ०-६५ आर अशी एकूण हेक्टर ८१-५६आर शेती महामंडळाची असलेली जमीन भूसंपादनाने घेणे.

०२. उपरोक्त जमिनीबाबत भूसंपादनाने घेणेसाठी शासनाची परवानगी मिळणेसाठी कार्यकारी अधिकारी यांनी शासनांशी पत्रव्यवहार करणे.

०३. शासनाची प्रशासकीय मंजूरी आलेनंतर मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे भूसंपादनाचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी पाठविणे.

०४. मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर किंवा भूसंपादन अधिकारी यांनी नुकसान भरपाई पोटी अनामत म्हणून रक्कम मागणी केल्यास ती देण्याबाबत मंजूरी देणे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त पैकी मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील हेक्टर ६३-०९ आर, शिर्डी येथील हेक्टर ११-८२आर, कनकुरी येथील हेक्टर ०६-६५ आर अशी एकूण हेक्टर ८१-५६ आर शेती महामंडळाची असलेली जमीन भूसंपादनाने घेण्यात यावी, असे ठरले."

**(ब)** उपरोक्त निर्णयाप्रमाणे मा.प्रधान सचिव, महसुल व वन विभाग (एल ७ शाखा), मुंबई यांना पत्र क्रमांक एसएसएस/वशी०२/१२७४२/२००५, दिनांक ०५ नोव्हेंबर, २००५ अन्वये शासनाची प्रशासकीय मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

त्यानंतर दिनांक २७ डिसेंबर,२००५ / दिनांक ०२ फेब्रुवारी, २००५ / ०४ एप्रिल,२००६ / ३० मे, २००६ अन्वये देण्यात आलेल्या पत्राने वेळोवेळी विनंती करण्यात आली होती. परंतु याबाबत शासनाकडून मंजूर मिळालेली नाही अथवा पत्र देखील आलेले नाही.

**(क)** तसेच, याबाबत मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांना देखील पत्र क्रमांक एसएसएस/वशी ०२/१२७४३/२००५, दिनांक ०५ नोव्हेंबर, २००५अन्वये शेती महामंडळाची जमीन भूसंपादनाने घेणेबाबत सहमती शासनास कळविणेबाबत विनंती करणेत आलेली आहे.

त्यानंतर त्यांना दिनांक ०७ जानेवारी,२००६ / ०२ फेब्रुवारी, २००६ / १६ एप्रिल,२००६ / दिनांक ३० मे, २००६ अन्वये वेळोवेळी जमीन भूसंपादनाने घेणेबाबत सहमती शासनास कळविणेबाबत विनंती करणेत आलेली आहे.

**(ड)** उपरोक्त परिच्छेदांतील विवेचनानुसार, मुख्य कार्यकारी प्रशासन, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांनी त्यांचेकडील स्थावर/२२९०/लक्ष्मी/४१७/शि.सं./भाग-६/२९१२, दिनांक १५ जून, २००६ अन्वये कळविले आहे की,

"... शेती महामंडळाचे जमिनीवर सर्वोच्च न्यायालयाचे स्थगन आदेश असल्याने आपले पत्रात नमूद केलेल्या जमिनीचे भूसंपादनाबाबत सध्या विचार करता येत नाही. "

उपरोक्त पत्रानुसार, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनीबाबत सर्वोच्च न्यायालयाचा स्थगन आदेश आहे. स्थगन आदेशाबाबत जोपर्यन्त निकाल होत नाही, तो पर्यन्त महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही होऊ शकणार नाही असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी माहितीसाठी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १६. स.क्र.१६४ ले-आऊटमधील दक्षिणोत्तर रस्ता श्रीसाईबाबा संस्थानमार्फत विकसीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १७. फॉगिंग मशिन बाबत.**

**निर्णय क्र.४५९.** जिल्हा रुग्णालय अहमदनगर येथील जिल्हाशल्य चिकित्सक यांनी त्यांचे पत्राने जिल्ह्यामध्ये चिकुणगुणीया सदृष्य स्थितीमध्ये वाढ झालेली असल्याने व या आजाराबाबत शहरी व ग्रामिण भागामध्ये फॉगिंग करण्याची गरज असल्याने २५ नग फॉगिंग मशीनची संस्थानतर्फे पुरवठा करण्यात यावा याबाबत विनंती केलेली आहे.

फॉगिंग मशिनच्या दराबाबत दिपक सेल्स कार्पोरेशन, नांदगाव (नाशिक) यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी मे.विनीत इंजिनिअरिंग प्रा.लि.,पुणे या कंपनीचे ब्लॅक स्टोन फॉगिंग मशिन कॅपेसिटी०५ लि. ऑफ डायलुशन ॲण्ड कॅपेसिटी ०१ लि.ऑफ फ्यूअल या वर्णनाचे फॉगिंग मशिनचे दर कळविलेलें आहेत. दर प्रती नग रुपये ३५,१००/- (व्हॅट सहीत एक वर्षाच्या देखभालीसह)

तरी २५ नग फॉगिंग मशिन जिल्हा रुग्णालय अहमदनगर यांना देणेस व या मशीन खरेदी करणेस अंदाजे रुपये ८,७७,५००/- (रुपये आठ लाख सत्यात्तर हजार पाचशे) मात्र खर्च अपेक्षित आहे.

वर्तमानपत्रातील बातम्यानुसार अहमदनगर जिल्ह्यात चिकुणगुणीया सदृष्य आजाराने मोठ्या प्रमाणात रुग्ण ग्रस्त आहेत. या करिता जिल्हा रुग्णालय/जिल्हा आरोग्य अधिकारी,अहमदनगर यांना श्रीसाईबाबा संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७ (ण) मधील मानव जातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देता येईल. या तरतूदीनुसार त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत जिल्हा परिषद अहमदनगर त्यांचे पत्रान्वये अहमदनगर जिल्हयामध्ये ग्रामिण भागात अनेक गावामध्ये चिकुनगुनिया या विषाणुजन्य ताप रोगाचा फैलाव झालेला आहे. त्यामूळे मोठ्या प्रमाणावर ताप रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेले आहे.

चिकुणगुनिया या रोगावर सध्या कोणत्याही प्रकारची लस वा विशिष्ट औषध उपलब्ध नाही. त्यामूळे या सर्व रुग्णांना लक्षणावर आधारित असाच उपचार करावा लागतो.

दिनांक १४.०७.२००६ चे जिल्हा परिषदेच्या मा.स्थायी समितीचे सभेत संस्थानकडून ७५ फॅागिग मशिन मिळाणेबाबत विनंती केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, जिल्हा परिषद,अहमदनगर यांना ७५ नग जिल्हाशल्य चिकित्सक, अहमदनगर यांना २५ नग फॉगिग मशिन खरेदी करुन देणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन कोटेशन्स मागविण्यात यावेत असे ठरले.

(कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १८. श्री साईबाबा हॅास्पिटलच्या समोरील जागेत गार्डन करणे बाबत**

**निर्णय क्र.४६०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १९. नवीन व्ही.आय.पी जवळील जागेत लॅन्डस्केपींग करणे बाबत.**

**निर्णय क्र.४६१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २०. सन २००६-२००७ गाय दुध दरवाढीबाबत.**

**निर्णय क्र.४६२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २१. सन २००६-२००७ गावरान तूप खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.४६३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २२. सन २००६-२००७ खिसमिस खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.४६४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २३. सन २००६-२००७ पॉलिकप खरेदी बाबत**

**निर्णय क्र.४६५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २४. मान्यवरांचे सत्कार करणेकामी प्रिंटेड शॉल्स खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.४६६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २५. नवीन ट्रॅक्टर खरेदी करणे बाबत निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.४६७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २६. नगर -मनमाड रोडच्या डिव्हायडरला बगीचा संरक्षक ग्रील तयार करणे बाबत.**

**निर्णय क्र.४६८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २७. नगर-मनमाड रोडवर हाय मास्ट पोल उभे करण्याबाबत तसेच पोलवर मेटल हॅलाईड लॅम्प बसविणेकामी प्राप्त झालेले टेंडर उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.४६९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २८. नवीन प्रसादालयाचे चालू असलेल्या बांधकामासाठी मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि.पुणे यांना त्वरीत ६३ के.व्ही.ए.सप्लाय उपलब्ध करुन देणेसाठी स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर खरेदी करुन बसविणेसाठी व त्यासाठी स्वतंत्र ११ के.व्ही उच्च दाबाचे कनेक्शन घेणे बाबत.**

**निर्णय क्र.४७०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २९. श्री साईबाबा हॅास्पिटलचे वातानूकूलित यंत्रणेच्या मशिनरीकरीता शेड बनविणे बाबत.**

**निर्णय क्र.४७१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३०. मंदिर व परिसर संरक्षणासाठी चारही महाव्दारांमधून स्टेनलेस स्टिलचे रिव्हाल्व्हिंग गेट खरेदी करुन बसविणे बाबत.**

**निर्णय क्र.४७२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३१.** **श्री साईलीला व्दैमासिक अंक २००६-२००७ छपाईबाबत**

**निर्णय क्र.४७३.** कार्यकारी संपादक, श्री साईलीला संपादकीय कार्यालय, मुंबई यांचे दि.२३.०६.२००६ चे फॅक्स पत्रा अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईलीला द्वैमासिक मराठी व हिंदी-इंग्रजी अंक छपाई आदेशाची मुदत माहे ३० जून २००६ अखेर संपत आहे. सध्याचे अंक छपाईचे काम मे. परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रा.लि., मुंबई यांचेकडून छपाईकामाची कार्यवाही चालू आहे. त्याची मुदत संपत आल्याने सन २००६-२००७ साठी अंकांची छपाई करुन घेणे गरजेचे आहे.

माहे सप्टेंबर -ऑक्टोबर २००५ ते माहे मे-जून २००६ या कालावधीसाठी श्री साईलीला द्वैमासिक अंक छपाईचे काम खालील दर्शविल्या तपशिला नुसार करुन घेण्यात आले आहे. त्याच धर्तीवर माहे जुलै -ऑगस्ट २००६ ते मे-जुन २००७ या कालावधीसाठी छपाईचे काम करुन घेणे आहे.

अ) श्री साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी द्वैमासिक सर्वसाधारण अंक आतिल रंगीत ३२ पाने + मुख पृष्ठाचे ४ पाने ४ रंगीत लॅमिनेशन करुन अशी एकूण ३६ पानांचा अंक प्रकाशित करणे आहे.

ब) श्री साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी विशेषांकातील आतील रंगीत ६४ पाने + मुख पृष्ठाचे ४ पाने ४ रंगात रंगीत लॅमिनेशन केलेली अशी एकूण ६८ पाने पोटात तार मारुन बांधणी करावयाची आहे.

क) श्री साईलीला मराठी व हिन्दी -इंग्रजी व विशेषांक ८.००" X १०.५०" या साईजमध्ये उपलब्ध करुन देणे आहे.

ड) मुखपृष्ठ छपाईसाठी १७० जी.एस.एम लाईकेम आर्ट पेपर वापरणे आहे.

इ) साईलीला अंकाचे आतिल रंगीत पृष्ठे छपाईसाठी ७० जी.एस.एम. LWC, UPM, ULTRA Paper वापरावयाचा आहे.

उपरोक्त **"अ","ब","क","ड","इ"** यात दर्शविल्या तपशिलानुसार मागिल वर्षाप्रमाणे चालू वर्षीही सन २००६-२००७ या कालावधीसाठी अतिशय उत्कृष्टपणे अंकांची छपाई करुन अंक साईलीला सदस्य यांना उपलब्ध करुन देणे आहे.

सन २००६-२००७ (माहे जुलै -ऑगष्ट २००६ ते मे-जुन २००७) सालासाठी खालीलप्रमाणे अंदाजे अंकांची छपाई करुन घेणे आवश्यक आहे.

०१) श्री साईलीला द्वैमासिक अंक मराठी १५,००० प्रती

०२) श्री साईलीला द्वैमासिक अंक हिंदी-इंग्रजी २५,००० प्रती

०३) श्री साईलीला द्वैमासिक दसरा विशेषांक मराठी १५,००० प्रती

०४) श्री साईलीला द्वैमासिक दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी २५,००० प्रती

यासाठी उपरोक्त प्रमाणे सर्वसाधारण मराठी अंक प्रती माह १५,००० प्रती छपाईकामी अंदाजे छपाई दर रुपये १५/- एकूण रुपये २,२५,०००/- याप्रमाणे ५ अंकांचे ११,२५,०००/- तसेच सर्वसाधारण हिंदी- इंग्रजी अंक प्रती माह २५,००० प्रती छपाईकामी अंदाजे छपाई दर रुपये १५/- एकूण रुपये ३,७५,०००/- याप्रमाणे ५ अंकांचे १८,७५,०००/- त्याप्रमाणे श्री साईलीला द्वैमासिक दसरा विशेषांक मराठी १५,००० प्रती छपाईकामी अंदाजे दर रुपये २५/- प्रमाणे एकूण रुपये ३,७५,०००/- तसेच हिंदी-इंग्रजी अंक २५,००० प्रती छपाईकामी अंदाजे दर रुपये २५/- प्रमाणे एकूण रुपये ६,२५,०००/- असा एकूण रुपये ४०,००,०००/- (अक्षरी रुपये चाळीस लाख) मात्र इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

श्री साईलीला सदस्य संख्येत वाढ झाल्यास कार्यकारी संपादक सांगतील त्यानुसार वाढीव साईलीला अंक छपाईचे काम करुन घ्यावे लागेल. याप्रमाणे श्री साईलीला नियतकालीकाचे मराठीचे ५ अंक अधिक पुण्यतिथी विशेषांक मराठी असे एकूण ६ अंक व हिंदी -इंग्रजीचे ५ अंक अधिक पुण्यतिथी विशेषांक हिंदी-इंग्रजी असे ६ अंक याप्रमाणे एकूण १२ अंक छपाई करुन घेणे आहे.

श्री साईलीला संपादकीय कार्यालय, मुंबई यांनी त्यांचेकडील दि.०३.०७.२००६ चे फॅक्स पत्रान्वये नमुद केलेप्रमाणे साईलीला नियतकालीकेचे छपाईचे काम सप्टेंबर-ऑक्टोबर २००५ ते मे-जून २००६ या कालावधीतील अंकांच्या छपाईचे काम संबंधीत मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ. लि., मुंबई यांचेकडून करुन घेण्यात आले असून, त्यांनी दिलेल्या छपाई आदेशानुसार समाधानकारक काम करुन दिले असून, अंकाचे नवीन स्वरुप आवडल्याचे वाचकांनी कळविले आहे. संबंधीत मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ. लि., मुंबई यांचेकडून जा.नं.एसएसएस-वशी-प्रकाशने-१०२८७/२००५ दिनांक-१६.०९.२००५ नुसार खाली दर्शविलेल्यातपशिलाप्रमाणे साईलीलाअंक छपाईचे काम करुन घेण्यात आले आहे.

| अ.नं | तपशिल | आले छपाई संख्या | प्रति प्रत छपाई दर सर्व करांसहीत शिर्डी पोहोच रुपये पैसे | अंकात ४ पानाने घट किंवा वाढ झाल्यास प्रती प्रत छपाई दर रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१. | साईलीला अंक मराठी ३२ +४ पाने =३६ पाने | ११,५०० | ११.६८ | १.३७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२. | साईलीला अंक हिंदी/इंग्रजी ३२+४=३६ पाने | १७,००० | ११.६८ | १.३७ |
| ०३. | दसरा विशेषांक मराठी ६४+४=६८ पाने | ११,५०० | २०.०३ | १.३७ |
| ०४. | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी ६४+४ =६८ पाने | १७,००० | २०.०३ | १.३७ |

वरील नमुद केलेले छपाई दरानुसार मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ. लि., मुंबई यांनी त्यांचेकडील दि.१२.०५.२००६ चे पत्रान्वये उपरोक्त दोन्ही अकांचे छपाईचे काम हे मागिल छपाई दराने पुढील एका वर्षासाठी (जुलै-ऑगस्ट २००६ ते मे-जून २००७)करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. मागिल वर्षी मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ. लि., मुंबई यांनी श्रीसाईलीला अकांचे छपाईचे काम समाधानकारक व बिनतक्रार केली असल्याने त्यांनाच पुढील एकावर्षासाठी श्री साईलीला अंक छपाईचे काम देण्यात यावे असे वाटते.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईलीला अंकाचे छपाईचे काम हे मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ. लि., मुंबई यांचेकडून वरील मागिल वर्षाचे मान्य दराने छपाई करुन घेणेस अथवा मुंबई येथील निवडक प्रेसधारकांकडून कोटेशन्स मागवून करुन घेण्यास याकामी येणारे अंदाजे रुपये ४०,००,०००/- (अक्षरी रुपये चाळीस लाख) मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रॉ. लि., मुंबई यांचेकडून मागिल वर्षाचे मान्य दराने छपाई करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४०,००,०००.०० (अक्षरी रुपये चाळीस लाख) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ३२. श्री साईबाबा दैनंदिनी २००६ चे संस्थानव्दारे शैक्षणिक संकुलातील शालेय विद्यार्थ्यांना मोफत वाटप करणे बाबत.**
**निर्णय क्र.४७४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ३३. श्री साईलीला व्दैमासिक अंक छपाईबाबत**
**निर्णय क्र.४७५.** सदरहू विषय मागे घेण्यात आला.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ३४. संस्थान प्रकाशित श्री साईनाथ स्तवन मंजरी चा तेलगू भाषेत अनुवाद प्रकाशित करणे बाबत**
**निर्णय क्र.४७६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ३५. श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००७ छपाईबाबत.**
**निर्णय क्र.४७७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ३६. पुस्तके/फोटो छपाई करणे बाबत.**
**निर्णय क्र.४७८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ३७. श्रीसाईबाबा मंदीरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी.तयार करणेबाबत.**
**निर्णय क्र.४७९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ३८. ओंकार साधना मार्गदर्शिका इंग्रजी भाषेतील आवृत्ती संबंधी.**
**निर्णय क्र.४८०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ३९. अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेचा वार्षिक दुरुस्ती व देखभाल करार देणे बाबत.**
**निर्णय क्र.४८१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४०. गणकयंत्र खरेदी करणेसाठी मागविण्यात आलेल्या दरपत्रकांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**
**निर्णय क्र.४८२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४१. व्यायामशाळा साहित्य खरेदी करणेसाठी आलेल्या दरपत्रकांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**
**निर्णय क्र.४८३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४२. स्कॅनर मशिन साहित्य खरेदी करणेसाठी आलेल्या दरपत्रकांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**
**निर्णय क्र.४८४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४३. डिपसर्च व सर्च मिरर साहित्य खरेदी करणेसाठी आलेल्या दरपत्रकांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**
**निर्णय क्र.४८५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४४. चप्पल स्टँण्डवर सुविधा मोफत पुरविणे बाबत.**
**निर्णय क्र.४८६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४५. जेष्ठ नागरिक संघ व्दितीय वर्धापन दिनाबाबत**
**निर्णय क्र.४८७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४६. श्री साई सच्चरित पारायण सोहळया बाबत.**
**निर्णय क्र.४८८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४७. संत श्री आसाराम बापू यांचा सत्संग कार्यक्रमाबाबत.**
**निर्णय क्र.४८९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४८. शिधा सामुग्री मिळणेबाबत, श्री सिताराम भागवत ढूस,अध्यक्ष, श्री त्रिंबकराज स्वामी ग्रामविकास संस्था, देवळाली प्रवरा ता.राहूरी यांचे अर्जाबाबत.**
**निर्णय क्र.४९०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४९. शिधा सामुग्री मिळणेबाबत (ॲड.माणिकराव मोरे, अध्यक्ष, अहमदनगर शहर बार असो.) यांचा अर्ज**
**निर्णय क्र.४९१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५०. श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२००६**
**निर्णय क्र.४९२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५१. अ) श्रीमहालक्ष्मी देवस्थान, कोल्हापूर यांना विकास कामासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**
**ब) श्रीगणपती देवस्थान,सावनेर,नागपूर यांना विकासाकरिता आर्थिक मदत देणेबाबत.**
**निर्णय क्र.४९३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५२. श्री रामराव शेळके व इतर यांचे वेतनश्रेणीबाबत**
**निर्णय क्र.४९४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५३. अ) प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना वरिष्ठ वेतनश्रेणी व जीव रसायन शास्त्रज्ञ या पदनामाबाबत.**
**ब) श्री.आर.डी.चौधरी यांना जादा पाच वेतनवाढी मजूंर करणेबाबत.**
**निर्णय क्र.४९५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५४. निश्चित मासिक वेतन मिळणेबाबत सर्वश्री अजय शिवराम पांडे व इतर ४ कंत्राटी सेवत असलेल्या कनिष्ठ अभियंते यांचे अर्जाबाबत.**
**निर्णय क्र.४९६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५५. श्रीसाईलिला मासिक अथवा इतरत्र नेमणूकीबाबत श्री निवृत्ती उर्फ सुरेश माधवराव कांगुणे, श्रीरामपूर यांचे अर्जाबाबत.**
**निर्णय क्र.४९७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५६. श्री.लक्ष्मीकांन्त आंबादास चोळके, औद्योगिक प्रशिक्षण संस्थात निदेशक म्हणून नेमणूकीबाबत.**
**निर्णय क्र.४९८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५७. साईबाबा व साईनाथ हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय अधिकारी नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत**
**निर्णय क्र.४९९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५८. श्री साईबाबा हॉस्पिटीलमध्ये ए.सी. टेक्नीशियन नेमणूकीबाबत.**
**निर्णय क्र.५००.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५९. डॉ.संजय के.पटवर्धन, वैद्यकीय प्रशासक यांचा दिनांक २६.६.२००६ चे अर्जाबाबत**
**निर्णय क्र.५०१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ६०. डॉ.राम नाईक (जनरल सर्जन) यांना जादा वेतनवाढी देणे बाबत**

**निर्णय क्र.५०२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६१. डॉ.राहूल पी.वैद्य, स्पीच अॅण्ड ऑडिओलॉजिस्ट यांचे मानद सेवेच्या मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.५०३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६२. माल वाहतूक करीता दोन महिंद्रा मॅक्स पिकअप खरेदीचे कोटेशन्स बाबत**

**निर्णय क्र.५०४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६३. "सुवर्ण सिंहासन निधी" सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र.५०५.** श्री साईबाबांचे मंदिरातील सध्याचे सिंहासन चांदीचे आहे. श्री साईबाबांचे सिंहासन सोन्याचे असावे. त्याचप्रमाणे मंदिराचा कळस शिखर संपूर्ण सोन्याने मढविण्यात यावा अशी कल्पना दिनांक ५ जुलै २००६ रोजी स्थानिक पत्रकार यांनी मा. अध्यक्ष सो. यांचेसमोर मांडली. सोन्याचे सिंहासन व कळस शिखर सोन्याने मढविण्यासाठी लागणारा निधी श्री साईभक्तांना आवाहन करुन जमविण्यात यावा अशा सूचना मा. अध्यक्ष सो. यांनी दिल्या आहेत. त्याप्रमाणे "सुवर्ण सिंहासन निधी" या नावाने स्वतंत्र निधी उभारण्याचे ठरले आहे.

सुवर्ण सिंहासन व कळसास सोन्याचा मुलामा देण्यासाठी अंदाजे २५१ किलो सोने लागणार आहे. त्याची सध्याच्या बाजार भावाप्रमाणे अंदाजे किंमत २० ते २१ कोटी रुपये एवढी होत असून या "सुवर्ण सिंहासन निधी" मध्ये जमा झालेल्या रकमेतून वरीलप्रमाणे लागणारे सोने विकत घेण्याची साधारणपणे संकल्पना आहे. याबाबत विविध तज्ञ सुवर्णकारांकडून एस्टिमेंट व डिझाईन तयार करुन मागविण्यात यावे.

"सुवर्ण सिंहासन निधी" मध्ये जमा होणाऱ्या रकमेतून संस्थान सोने खरेदी करु शकते का? त्यात काही कायदेशीर अडचणी आहेत का? याविषयीचे मार्गदर्शन घेणेसाठी श्री. अय्यर, चार्टर्ड अकौटंट, (पूर्वीचे संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक), मुंबई श्री.अभय शास्त्री , चार्टर्ड अकौटंट, पुणे, संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षक श्री. गणपुले, संस्थानचे करविषयक सल्लागार, मुंबई यांचेशी दूरध्वनीवरुन चर्चा केली असता त्यांनी पैशाच्या स्वरुपातही देणगी घेण्यात अडचण नाही मात्र सुवर्ण नियंत्रण कायदा (Gold Control Act) विषयी काही अडचणी असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करावी लागेल असे सांगीतले आहे.

सध्याचे देणगीच्या संगणक प्रणालीमध्ये बदल करुन दिनांक ९ जुलै २००६ पासून श्री साईभक्तांकडून पैशाच्या स्वरुपात "सुवर्ण सिंहासन निधी" नावाचा स्वतंत्र निधी तयार करुन त्यामध्ये देणगी स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. या निधीमध्ये देणगी देण्यास भक्तांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. सुवर्ण सिंहासन बनविण्यासाठी विविध प्रकारचे मॉडेल्स पहावे लागणार आहेत. त्याचप्रमाणे सदर निधीस आणखी प्रसिध्दी देण्यासाठी संस्थानच्या संकेतस्थळावर हया निधीची योजना जाहीर करुन श्री साईभक्तांना त्याप्रमाणे आवाहन करता येईल. प्रत्यक्ष सुवर्ण सिंहासन व कळस बनवून घेण्याची व त्यासाठी सुवर्णकार नेमण्याची कार्यवाही यापूर्वीचे चांदीचे सिंहासन बनविण्यासाठी मंदीर विभागामार्फत केलेल्या कार्यवाहीनुसार करुन घ्यावी लागेल असे मत आहे.

उपरोक्त विवेचनानुसार "सुवर्ण सिंहासन निधी" मध्ये रोख स्वरुपात देणगी व वस्तु स्वरुपात सोने स्वीकारण्यासाठी लेखाशाखेमार्फत कार्यवाही करता येईल तसेच प्रत्यक्ष सुवर्ण काम करण्याची कार्यवाही मंदीर विभागामार्फत करण्यात येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. याकामी काऊंटरवर स्वतंत्र अकौंटमध्ये निधी जमा करण्याची व्यवस्था करावी. तसेच सुवर्ण सिंहासनाचे डिझाईन तयार करुन घेणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन आर्किटेक्टकडून निविदा मागविण्यात याव्यात असे असे ठरले.

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी/आय.टी. विभाग प्रमुख/अधिक्षक, मंदिर विभाग/मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६४. इंग्लिश स्पिकींग कोर्स आयोजन करणे बाबत**

**निर्णय क्र.५०६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६५. आय.टी.आय कडील संगणक लॅबचे इलेक्ट्रीकल वायरींग कामासाठी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून कोटेशनसधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.५०७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६६. अहमदनगर जिल्हयातील चिकुण गुण्यांचे रुग्णांसाठी संस्थानतर्फे औषधे खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५०८.** सध्या अहमदनगर जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी चिकुणगुणीयाची साथ चालु आहे. सदर आजाराचे बहूतेक रुग्ण हे सरकारी,निमसरकारी दवाखान्यात उपचार घेतात व बहूतेक रुग्ण आर्थिक दृष्ट्या कमकुवत असतात त्यामुळे त्यांना औषधोपचारावरील खर्च पेलवत नाही.

आजचे सभेत जिल्हा परिषद अहमदनगर त्यांचे पत्रान्वये अहमदनगर जिल्हयामध्ये ग्रामिण भागात अनेक गावामध्ये चिकुनगुनिया या विषाणुजन्य ताप रोगाचा फैलाव झालेला आहे. त्यामूळे मोठ्या प्रमाणावर ताप रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली असल्याने दि. १४.७.२००६ रोजी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीचे सभेत श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी यांचेकडून ५० लक्ष रकमेची औषधे वा अनुदानाची मागणी करावी असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार चिकूणगुनिया या विषाणूजन्य रोगासाठी खालीलप्रमाणे औषधे कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १३,५०,०००.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| Sr.No . | Name of Medicines | Qty | App.Rate | App.Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 01 | Tab.Amoxcillin 250 mg | 2000000 | 1.25 | 250000.00 |
| 02 | Tab.Paracetamol 500 mg | 2000000 | 0.50 | 100000.00 |
| 03 | Tab.Diclofenic 50 mg | 2000000 | 1.00 | 200000.00 |
| 04 | Tab.Dicyclomine 20 mg | 2000000 | 1.00 | 200000.00 |
| 05 | Tab.Ciproflomicine 500 mg | 2000000 | 2.00 | 400000.00 |
| 06 | Tab.Septran DS | 2000000 | 1.00 | 200000.00 |
| | | | Total Amt.Rs | 1350000.00 |

यावर सविस्तर चर्चा होऊन, चिकुणगुण्या आजार जिल्हयामध्ये मोठ्या प्रमाणावर पसरलेला असल्याने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांची मागणी व परिस्थीती विचारात घेता रुपये २५ लाखापर्यन्त औषधे त्यांना खरेदी करुन द्यावीत. तसेच मा.सिव्हील सर्जन,अहमदनगर यांचे दिनांक १५.०७.२००६ चे पत्राप्रमाणे मागणी केलेली औषधे अंदाजे रुपये ५ लाख पर्यन्त खरेदी करुन द्यावी व सदरचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावेत असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय/वैद्यकिय अधिक्षिका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६७. समाधी मंदिर परिसराच्या भोवताली असलेल्या कास्टीग आयर्न कंम्पाऊंडला आतून सुरक्षिततेसाठी लोखंडी बारीक जाळी बसविणे बाबत**

**निर्णय क्र.५०९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६८ श्री.कोते मिनीनाथ भाऊसाहेब यांचा प्रयोगशाळा सहाय्यक पदावर नेमणूक मिळणेबाबत**

**निर्णय क्र.५१०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६९ श्री.सुरेश तान्हाजी हुसळे यांची व्याजाची सवलत पुनःश्च सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.५११.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ७०. नव्याने सुरु झालेले श्रीसाईबाबा हॉस्पिटल व पूर्वीचे कार्यरत असलेले श्रीसाईनाथ रुग्णालय या दोन्ही विभागांची एकत्रित लेखाविषयक (Accounting) कार्यप्रणाली स्वतंत्र ठेवणेबाबत.**

**निर्णय क्र.५१२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ७१. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये देण्यात आलेल्या मोफत सेवांबाबत.**

**निर्णय क्र.५१३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ७२. नगर-मनमाड रोडचे डिव्हायडरचे सुशोभिकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.५१४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ७३. श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालयाबाबत नियमावली.**

**निर्णय क्र.५१५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ७४. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये आकारण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवांच्या दरांबाबत.**

**निर्णय क्र.५१६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ७५. मा.व्यवस्थापन समिती सदस्य डॉ.पी.एल.तिवारी, यांचे आदेशानुसार डोळयाच्या शस्त्रक्रिया मोफत करणेबाबत.**

**निर्णय क्र.५१७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ७६ डॉक्टरांच्या देय मोबदल्याबाबत.**

**निर्णय क्र.५१८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ७७ जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन व हाताळणीबाबत.**

**निर्णय क्र.५१९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ७८ सांडपाणी प्रक्रिया संयंत्र उभारणीबाबत.**

**निर्णय क्र.५२०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ७९ वैद्यकीय बीलात सवलत मिळणेबाबत,श्रीमती अनुसया रमणीक ठक्कर,नाशिक,श्री.इलियास चाँदभाई शेठ, अहमदनगर, श्री.काशिनाथ धुळाजी बनसोडे, पारेगाव बु|| ता.संगमनेर यांच्या अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.५२१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ८० संस्थानला लेबर व सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत कंत्राटी पद्धतीने पुरविण्यात येणाऱ्या अकुशल-कुशल व सुरक्षा कंत्राटी कामगारांबाबत.**

**निर्णय क्र.५२२.** साईभक्तांच्या दिवसेंदिवस वाढत्या संख्येमुळे संस्थानचा कायम कर्मचारी वर्ग अपुरा पडू लागल्याने येणा-या साईभक्तांना श्रींचे सुलभ दर्शन, निवास,प्रसाद व्यवस्था पुरविणेकामी तसेच स्वच्छता व साईभक्तांचे सुरक्षिततेकामी कंत्राटी कामगार घेण्याची आवश्यक्ता व गरज संस्थानला भासू लागली . त्यामुळे तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाने सन १९९१ पासून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे काम बाहेरच्या एजन्सीला दिले. त्यानंतर अशाचप्रकारे सन १९९४ पासून अकुशल कर्मचारी कंत्राटी पध्दतीने ठेकेदारांकडून घेणेस सुरुवात झाली . व सन १९९९ पासून कुशल कामगारही कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत घेण्यात येत आहे. यासाठी दरवर्षी वर्तमान पत्रात जाहीरात देऊन कंत्राटदारांकडून निविदा मागविणेत येऊन मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेमध्ये संबंधीतांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेण्यात येतात. विविध विभागांना गरजेनुसार व आवश्यक्तेनुसार कुशल व अकुशल कंत्राटी कर्मचारी दैनंदिन कामांस घेणेकामी मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सद्या संस्थानचे विविध विभागांना अकुशल ११६६ व कुशल १९३ असे एकूण १३५९ पर्यंत कंत्राटी कर्मचारी दैनंदिन कामांस घेणेत येत आहेत .

सन १९९१ पासून विविध विभागात कंत्राटी कर्मचारी नेमलेले आहेत, त्यांना देणेत येणारे वेतनदर हे किमान वेतन कायद्यानुसार शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ प्रमाणे दिले जातात. त्यामुळे जुन्या व नव्या कंत्राटी कामगारांना एकाच दराने वेतन मिळते. त्यांनी संस्थानकडे केलेल्या वर्षानुवर्षे सेवेचा काहीही विचार करता येत नाही. सदरचे कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेमध्ये नियमित घेणेबाबत वेळोवेळी संबंधीतांकडून मागणी करणेत आलेली आहे. कंत्राटी कर्मचा-यांनी गेल्यावर्षी देखील मा.व्यवस्थापन समितीकडे पुन्हा याबाबत मागणी केली होती. म्हणून मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४-०३-२००६ रोजीचे सभेत झालेल्या चर्चेप्रमाणे व त्याबाबत यापुर्वी वेळोवेळी झालेल्या चर्चेत ठरल्याप्रमाणे तसेच मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.सदस्य श्री.विखे पा., संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट व मा.कार्यकारी अधिकारी यांचे उपस्थितीत मुंबई येथे दि. १६-०३-२००६ रोजी झालेल्या सभेतील चर्चेस अनुसरुन कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमीत घेणेकामी नियमावली प्रस्तावीत करणेत आली. त्या नियमावलीमध्ये संस्थानमध्ये सन-१९९१ ते डिसेंबर २००० या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्स मार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या ते काम करत असलेल्या एकूण-१७८ कुशल कंत्राटी कामगारांना पदनिहाय लागू असलेल्या वेतनश्रेणीप्रमाणे अनुज्ञेय असणारी वेतनश्रेणी व मुळवेतन तसेच इतर अनुज्ञेय भत्ते यासह होणा-या एकूण वेतनाचे रक्कमेएवढे एकत्रित दरमहा मानधन देवून त्यांची संस्थान सेवेत नियमीत नेमणूक करणेत येईल. तसेच संस्थानमध्ये सन-१९९१ ते डिसेंबर-२००० या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्स मार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या ते काम करत असलेल्या एकूण-१०३७ अकुशल कंत्राटी कामगारांना त्यांचे सेवाजेष्ठतेस अनुसरुन -

अनुक्रमे -

| | | | |
|---|---|---|---|
| १९९१ | रु.४०००/- | १९९६ | रु.३५००/- |
| १९९२ | रु.३९००/- | १९९७ | रु.३४००/- |
| १९९३ | रु.३८००/- | १९९८ | रु.३३००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १९९४ | रु.३७००/- | १९९९ | रु.३२००/- |
| १९९५ | रु.३६००/- | २००० | रु.३१००/- |

याप्रमाणे प्रतिमहिना एकत्रित मानधन देवून संस्थान सेवेत नियमीत नेमणूक देणेत येईल असे निश्चित करणेत आले.सदर कुशल १७८ व अकुशल १०३७ अशा एकूण-१२१५ कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमीत नेमणूका देवून त्यांना प्रस्तावीत केल्याप्रमाणे दरमहा एकत्रित मानधनावर नेमल्यास संस्थानला सुमारे दरमहा एकूण रुपये ९,१४,७०४/- प्रमाणे प्रतिवर्षी एकूण रुपये-०१,०९,७६,४४८/- एवढा जादा खर्च (जादा आर्थिक भार) येईल.

सदर नियमावलीस अनुसरुन संस्थानमध्ये सन १९९१ ते डिसेंबर २००० अखेर या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्स मार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या ते काम करत असलेल्या अकुशल-१०३७ व कुशल-१७८ अशा एकूण-१२१५ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमीत नेमणूका संस्थान कामगार कायदे सल्लागार यांचे मार्गदर्शनानुसार व सल्ल्यानुसार मासिक मानधन तत्त्वावर देता येतील. तथापी,सदर नियमावलीनुसार पुर्तता न करणा-या किंवा अपात्र आढळून आल्यास अशा कंत्राटी कर्मचा-यास नियमीत नेमणूक देणेत येणार नाही. तसा हक्क त्याला सांगता येणार नाही. याबाबतीत कामगार कायदे सल्लागार यांचेशी प्राथमिक चर्चा झालेली आहे. सुधारीत सेवक आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळालेनंतर मासिक मानधनावर नेमणूका दिलेल्या संबंधीत कर्मचा-यांना पदनिहाय नेमणूकीचे वेतनश्रेणीत नियमीत नेमणूका देता येईल. व त्यांचे नेमणूकीचे पदास अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीनुसार त्यांना नियमीत मासिक वेतन व अनुज्ञेय भत्ते देता येईल करीता मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील,ॲडव्होकेट, अहमदनगर यांचे सल्ल्याने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणेत येईल. असा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१-०४-२००६ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता.सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सन १९९१ ते डिसेंबर २००० या कालावधीत जे कंत्राटी कर्मचारी संस्थानची कंत्राटी सेवा सोडून गेले तसेच ज्या कंत्राटी कर्मचा-यांच्या कोर्टकेसेस वा अन्य चौकशी चालू आहे अशा कंत्राटी कर्मचा-यांना वगळून उर्वरीत सन १९९१ ते डिसेंबर २००० पर्यंत जे कंत्राटी कर्मचारी नियमित कामावर आहेत व त्यापैकी आजमितीस कामावर सलग हजर असणा-या अशा सर्व कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेकामी संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट, अहमदनगर यांचे सल्ल्याने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेत यावा. तसेच सन २००० नंतर घेतलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत कामावर घेणेबाबत यथावकाश निर्णय घेणेत येईल असा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१-०४-२००६ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.२२५ अन्वये संमत झालेला आहे.

सदरचे निर्णयास अनुसरुन सन १९९१ ते डिसेंबर, २००० या कालावधीत जे कंत्राटी कर्मचारी संस्थानची कंत्राटी सेवा सोडून गेले तसेच ज्या कंत्राटी कर्मचा-यांच्या कोर्टकेसेस वा अन्य चौकशी चालू आहे अशा सर्व कंत्राटी कर्मचा-यांना वगळून उर्वरीत सन १९९१ ते डिसेंबर, २००० पर्यंत जे कंत्राटी कर्मचारी नियमित कामावर आहेत व त्यापैकी आजमितीस कामावर सलग हजर असणा-या अशा सर्व कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेकामी प्रस्ताव संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट, अहमदनगर यांचे सल्ल्याने तयार करुन शासनाच्या मान्यतेसाठी इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५३७४/२००६ दि.२५-०४-२००६ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेला आहेत. तथापी, सदर प्रस्तावास अद्याप पर्यंत शासनाची मान्यता मिळालेली नसल्यामुळे संबंधीत कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेत आलेल्या नाहीत.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिरडी) अधिनियम, २००४ (सन २००४चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४) चे कलम क्र.१३ (४) मध्ये " समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तीची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-या व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल. परंतू त्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-यांची नेमणूक समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केले जाणार नाही." अशी तरतुद आहे.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिरडी) अधिनियम, २००४ (सन २००४चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४) चे कलम क्र.१३ (४) नुसार दरमहा २०००/- रुपयांहून अधिक वेतन देवून कर्मचा-याची अथवा अधिका-याची नेमणूककरावयाची असल्यास त्यास शासनाची मान्यता घेणे बंधनकारक असल्यामुळे व शासनास पाठविलेल्या प्रस्तावास अद्यापपर्यंत शासनाची मान्यता मिळालेली नाही. "

त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१-०४-२००६ रोजीचे सभेतील संमत झालेल्या निर्णयाप्रमाणे संबंधीत कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस अडचणी निर्माण झालेल्या आहेत. परंतू संबंधीत कंत्राटी कामगारांकडून संस्थान सेवेत नियमित नेमणूका मिळणेसंदर्भात सातत्याने मागणी करणेत येत आहे. तसेच काही कंत्राटी कामगारांनी दि. ०३-०६-२००६ रोजीचे अर्जान्वये लेखी मागणी देखील केलेली आहे.

कंत्राटी कामगारांचे सदर मागणीचा विचार करावयाचा झाल्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिरडी) अधिनियम २००४ चे कलम क्र.१३ (४)मधील तरतुदी प्रमाणे शासनाची मान्यता मिळेपर्यंत संबंधीत कंत्राटी कामगारांना प्रस्तावीत करणेत आलेले दरमहा मानधन हे सदर तरतुदीत नमुद करणेत आलेल्या दरमहा रु. २००० या मर्यादेपेक्षा अधिक असल्यामुळे सदर कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणे अडचणीचे आहे.

तथापी, उपरोक्त नियमावलीस अनुसरुन संस्थानमध्ये सन १९९१ ते डिसेंबर २००० पर्यंत जे कंत्राटी कर्मचारी नियमित कामावर आहेत व त्यापैकी आज मितीस कामावर सलग हजर असणा-या अशा सर्व कंत्राटी कामगारांना शासनाची मान्यता मिळेपर्यंत नियमावलीत प्रस्तावीत केलेप्रमाणे मानधन हे रुपये २०००/- मर्यादेपेक्षा जास्त असल्यामुळे त्याप्रमाणे मानधन न देता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिरडी) अधिनियम २००४ चे कलम क्र.१३ (४) मधील तरतुदीस अधीन राहून संबंधीत कंत्राटी कामगारांना एकत्रीत दरमहा रु.२०००/- (अक्षरी रुपये दोन हजार) मात्र याप्रमाणे मानधन देऊन त्यांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेबाबत कार्यवाही करणेत यावी अशी चर्चा झालेली आहे.

सदर चर्चेस अनुसरुन संबंधीत कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमीत नेमणूका द्यावयाचे झाल्यास मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.०८-०९/१२/२००१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५४५ (डी) नुसार संस्थानमध्ये कामांस घेतलेल्या सर्व विभागातील कंत्राटी कामगारांना दरमहीन्यास जास्तीत जास्त २० दिवस काम देणेबाबत कार्यवाही दि.०१-०४-२००२ पासून सुरु करण्यात आलेली आहे. त्यापुर्वी संस्थानमध्ये कामांस घेतलेल्या कंत्राटी कामगारांना २० दिवस कामाचे पुर्ण झालेनंतर ब्रेक न देता वर्षातून १-१ महीना याप्रमाणे दोन वेळेस किंवा सलग दोन महीने याप्रमाणे ब्रेक देणेची पध्दत होती. त्यामुळे संस्थानमध्ये सन १९९१ ते डिसेंबर २००० या कालावधीत नियममित कामावर असलेल्या व आज मितीस कामावर सलग हजर असणा-या कंत्राटी कामगारांची संबंधीत कंत्राटी सेवा कालावधीतील संबधीत वर्षातील सलग दोन महीने किंवा १-१ महीना याप्रमाणे दोन महीने दिलेल्या ब्रेकचा (खंडीतसेवेचा) कालावधी शिथील करुन,वगळणेत येऊन संबंधीत वर्षातील इतर कालावधी सलग हजर कालावधी म्हणून विचारात घ्यावा लागेल.या सर्व बाबी विचारात घेता

**(अ)** संस्थानने संबंधीत वर्षात सलग दोन महीने दिलेला किंवा १-१ महीना असे दोन महीने दिलेला ब्रेकचा कालावधी शिथील करुन,वगळून (हिशोबात न घेता) इतर कालावधी सलग धरुन सन १९९१ ते डिसेंबर २००० पर्यंत जे कंत्राटी कर्मचारी नियमित कामावर आहेत व त्यापैकी आज मितीस कामावर सलग हजर असणारे अशा सर्व कंत्राटी कामगारांना पात्र ठरवून संस्थान सेवेत नियमित नेमणूक दरमहा रु.२,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार) मात्र याप्रमाणे एकत्रीत मानधनावर देता येईल.

**(ब)** तसेच संस्थानने संबधीत वर्षात सलग दोन महीने किंवा एक एक महीना असे दोन महीने दिलेला ब्रेकचा कालावधीस जोडून आणखी एक महीना गैरहजर राहीलेला कालावधी असा सलग एकूण तीन महीने सेवा खंडीत कालावधी असलेले सन १९९१ ते डिसेंबर २००० पर्यंत या कालावधीतील कंत्राटी कामगार प्रस्तावीत करणेत आलेल्या नियमावलीस अनुसरुन संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस पात्र होत नाहीत. तथापी, मानवतेच्या दृष्टीकोनातून, सहानुभुतीपुर्वक विचार करता संस्थानने संबंधीत वर्षात सलग दोन महीने दिलेला ब्रेक किंवा १-१ महीना असे दोन महीने दिलेला ब्रेकच्या कालावधीस जोडून आणखी एक महीना अपरिहार्य कारणांमुळे गैरहजर राहीलेला कालावधी धरुन असा एकूण सलग तीन महीने सेवा खंडीत कालावधी शिथील करुन,सदरचा कालावधी वगळून (हिशोबात न घेता ) इतर कालावधी सलग धरुन त्यांना पात्र ठरवून सन १९९१ ते डिसेंबर २००० पर्यंत जे कंत्राटी कर्मचारी नियमित कामावर आहेत व त्यापैकी आज मितीस कामावर सलग हजर असणा-या अशा सर्व कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूक दरमहा रु.२,०००/- ( अक्षरी रुपये दोन हजार ) मात्र याप्रमाणे एकत्रीत मानधनावर देता येईल.

**(क)** म्हणजेच वरीलप्रमाणे कार्यवाही करावयाची झाल्यास कुशल-१७८ व अकुशल-१०३७ अशा एकूण-१२१५ कंत्राटी कर्मचा-यांना दरमहा रुपये २०००/- मात्र या प्रमाणे एकत्रित मानधनावर संस्थान सेवेत नियमीत नेमणूका दिल्यास संस्थानला सुमारे दरमहा एकूण रुपये-१३,८०,८३२/- प्रमाणे प्रतिवर्षी एकूण रुपये ०१,६५,६९,९८४/- एवढा कमी खर्च (कमी आर्थिक भार) येईल.

सबब, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१-०४-२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२५ नुसार मान्यता देणेत आलेल्या नियमावलीस अनुसरुन संस्थानमध्ये सन १९९१ ते डिसेंबर २००० अखेर या

कालावधीत जे कंत्राटी कर्मचारी नियमीत कामावर आहेत व त्यापैकी आज मितीस कामावर सलग हजर असणा-या अशा सर्व कंत्राटी कामगारांना शासनाची मान्यता मिळेपर्यंत नियमावलीत प्रस्तावीत केलेप्रमाणे मानधन हे श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिरडी) अधिनियम २००४ चे कलम क्र.१३ (४) मधील तरतुदीनुसार रु.२०००/- पर्यंत मर्यादेपेक्षा जास्त असल्यामुळे त्याप्रमाणे मानधन न देता, सदरचे तरतुदीस व नियमावलीस अधीन राहुन उपरोक्त प्रमाणे **"अ" व "ब"** मध्ये प्रस्तावीत केलेल्या संबंधीत सर्व कंत्राटी कामगारांना दरमहा रु.२,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार ) मात्र याप्रमाणे एकत्रीत मानधन देऊन त्यांना संस्थान सेवेत नियमीत नेमणुका देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास दिनांक ०१.०४.२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.२२५ अन्वये मान्य केलेल्या खालील नियमावलीस अधिन राहून तत्वतः मान्यता देण्यात आली.

(०१) दिनांक ३१/१२/२००० अखेर कामावर घेण्यात आलेल्या व त्यापैकी आजमितीस कामावर हजर असणा-या सर्व कुशल कंत्राटी कर्मचा-यांना सेवाजेष्ठतेप्रमाणे संस्थान सेवेत नियमीत घेणे कामी नेमणूक देण्यात येईल.

(०२) नेमणूक दयावयाचे संबंधीत कुशल कंत्राटी कर्मचा-यांकडे सदर पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.शैक्षणिक पात्रते संदर्भातील कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती संस्थान कार्यालयाकडे सादर करणे संबंधीत कंत्राटी कामगारांवर बंधनकारक राहील.

(०३) दि.३१/१२/२००० अखेर व त्यापैकी आज रोजी हजर असणा-या अकुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठतेप्रमाणे संस्थान सेवेत नियमीत घेण्यात येईल.त्यांचे शैक्षणिक पात्रता व शारिरीक क्षमतेनुसार संस्थानच्या विविध विभागांमध्ये त्यांना नेमणुक देण्यात येईल.

(०४) दि.३१/१२/२००० अखेर कंत्राटदारामार्फत कंत्राटी सुरक्षा सेवेत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांनाही संस्थान सेवेत नियमीत घेणे कामी नेमणूक देण्यात येईल.परंतु सुरक्षा सेवा कंत्राटी पध्दतीनेच चालु ठेवावयाची असल्याने सदर कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यांना त्यांचे शैक्षणिक पात्रता व शारिरीक क्षमतेनुसार आवश्यक्तेप्रमाणे इतर विभागामध्ये नियमीत सेवेत घेण्यात येईल.

(०५) संबंधीत कंत्राटी कर्मचारी आजमितीस सलग कामावर असणे आवश्यक आहे. सेवा सोडुन गेलेल्या व काही वर्षानंतर पुन्हा कामावर आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांचा संस्थान सेवेत नियमीत घेणे कामी विचार केला जाणार नाही.

(०६) सेवक आकृतीबंधातील पदांना शासनाची मान्यता मिळालेनंतर कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमीत घेणेकामी त्यांचे सेवाजेष्ठतेनुसार नेमणूका देणेत येतील.पदे शिल्लक नसल्यास त्याबाबत आवश्यकतेनुसार सेवाजेष्ठतेप्रमाणे नंतर विचार करणेत येईल.

(०७) कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमीत नेमणूक देणेपुर्वी संबंधीत कंत्राटी कर्मचा-यांनी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असलेबाबत अधिक्षीका,श्री साईनाथ रुग्णालय,शिरडी यांचेकडील मेडीकल फिटनेस सर्टिफिकेट संस्थान कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे.

(०८) कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमीत घेतल्यास त्यांची सदरची नेमणूक नव्याने राहील. कंत्राटदाराकडील मागील सेवेचे कोणतेही आर्थिक अथवा इतर फायदे मिळणेस ते पात्र राहणार नाही.

(०९) संस्थानच्या इतर कायम कर्मचा-यांप्रमाणे लागु असणा-या सेवाशर्ती व इतर नियम सदर कंत्राटी कामगारांना लागु होतील.यामध्ये फक्त वेतनाचा अपवाद राहील.कारण हया सर्व कंत्राटी कामगारांचे नियमीत नेमणूकीस शासनाची मान्यता प्राप्त होईपर्यंत हया नियमावलीत दर्शविल्या प्रमाणे त्यांना वेतनाऐवजी मानधन स्वरुपात मोबदला देण्यात येईल.

(१०) कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमीत घेतांना त्यांना द्यावयाचे नेमणूक पत्रामध्ये त्यांचेवरील जबाबदारी व कामाचे स्वरुप तसेच ते कोणत्याही विभागात अथवा इतर ठिकाणी संस्थानचे सोईनुसार बदलीस पात्र राहतील,या बाबींचा समावेश करणेत येईल.

यातील कायदेशिर बाबी ॲडव्होकेट श्री अशोकराव पाटील, अहमदनगर यांचेकडून तपासून घेऊन त्यांचा सल्ला घेण्यात यावा व याकामी मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष, मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष व मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील या त्रिसदस्य समितीने अंतिम निर्णय घ्यावा असें ठरलें. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ८१ संस्थान परिसरातील नारळांच्या झाडांना पत्रा लावणेबाबत.**
**निर्णय क्र.५२३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ८२ डॉ.शेळके संदीप ज्ञानेश्वर यांची आर.एम.ओ.पदावर नेमणूक करणेबाबत.**
**निर्णय क्र.५२४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ८३ श्री.सुरेंद्रकुमार पांडे, अकौटंट श्रीसाईबाबा हॉस्पिटल यांचे मुदतवाढी बाबत.**

**निर्णय क्र.५२५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ८४ श्री.अनिल जनार्दन गायकवाड यांचे कॅथलॅब ओ.टी.मध्ये इ.सी.जी.ऑपरेटर किंवा वॉर्डबॉय म्हणून कामावर रुजु करुन घेणेबाबत. तसेच कु.मृणालिनी मिलींद गायकवाड यांची पॅथोलॉजी टेक्निशियन म्हणून नेमणूक करणेबाबत**

**निर्णय क्र.५२६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ८५ मा.अध्यक्ष महोदय यांनी सादर केलेल्या प्रस्तावांबाबत.**

**निर्णय क्र.५२७.** मा.अध्यक्ष महोदय यांनी खालीलप्रमाणे दोन योजनांबाबत सविस्तर माहिती सभेस दिली.

०१. श्री साई कुटीर प्रकल्प

०२. गोल्डन कार्ड योजना

उपरोक्तप्रमाणे योजना संस्थानने राबविल्यास संस्थानचे उत्पन्नात वाढ होईल व साईभक्तांची सोय होईल . यासाठी ही योजना कार्यान्वीत करणेबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ८६. मुंबई खंडपीठ औरगांबाद रिट अर्ज नंबर ३९५१/ २००५ उत्तमराव रंभाजी शेळके अर्जदार - विरुध्द - दि स्टेट ऑफ महाराष्ट्र ९ ते २० विश्वस्त**

**निर्णय क्र.५२८** उपरोक्त रिटपिटीशनचे कामकाज उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरगांबाद येथे चालू आहे. जि.प.प्राथमिक शाळा संस्थानचे साईउद्यान इमारतीमध्ये स्थानांतरास करणेस यापूर्वी मनाई हुकूम देणेत आला होता सदर मनाई उठविण्यात आला आहे.मूळ रिट पिटीशन अद्याप हायकोर्टात चालू आहे मूळ रिट पिटीशन मध्ये मा. कार्यकारी अधिकारी यांना संस्थान संस्थानसाठी पक्षकार केलेले आहे आता खालील विश्वस्तांना प्रतिवादी केले असून दुरुस्त अर्ज अर्जदाराने दाखल केलेला आहे. नव्याने काही मुद्यांचा समावेश केला आहे. तसेच प्रतिवादी ९ ते २० सन्माननीय विश्वस्तांना पक्षकार केले आहे.

(१) सन्मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे - अध्यक्ष

(२) सन्मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे- विश्वस्त

(३) सन्मा. श्री. प्रकाश रामचंद्र काळे- विश्वस्त

(४) सन्मा. श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव - विश्वस्त

(५) सन्मा. श्री. पांडुरग अंभग - विश्वस्त

(६) सन्मा. श्री. शैलेश श्रीहरी कुटे - विश्वस्त

(७) सन्मा. श्री. सामी खातीब - विश्वस्त

(८) सन्मा. श्रीमती रिम्पल लोहिया - विश्वस्त

(९) सन्मा. श्री. शंकररावजी कोल्हे - उपाध्यक्ष

(१०) सन्मा. श्री. राधाकृष्ण एकाथ विखे पा. - विश्वस्त

(११) सन्मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर- विश्वस्त

(१२) सन्मा.श्री. रमाकांत गणेश कर्णिक - विश्वस्त

वरील प्रकारणी औरगांबाद येथे संस्थान ॲडव्होकेट श्री. आर एन.धोर्डे यांची भेट घेऊन वरील रिट पिटीशन प्रत त्यांचेकडे सुपूर्त केले आहे. तसेच मा. कार्यकारी अधिकारी यांचे सहीचे संस्थानसाठीचे वकीलपत्र देणेत आले आहे. संस्थानचे संबंधित खालील मुद्दे प्रामुख्याने अर्जदारांतर्फे रिटपिटीशनमध्ये नमूद करणेत आलेले आहे.

(१) श्री साईबाबा संस्थानचे आद्य कर्तव्य साईभक्तांसाठी मुलभूत सोई सवलती, पिण्यासाठी पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, सार्वजनिक स्वच्छता इ. व्यवस्था करण्याऐवजी संस्थान त्यांचे आर्थिक निधीतून शाळेची इमारत व दुकानदारांचे पुर्नवसन करण्यावर खर्च करीत आहे.

(२) मंदिराजवळ सध्या असलेल्या जि. पं प्राथमिक शाळेत १२०० विद्यार्थी असून २१ वर्ग व २० तुकडया आहेत. तेथून शाळा शिर्डी येथील आरक्षित क्रं. ८ मध्ये शाळा हलविण्यात येणार असून शाळेच्या जागेवर व्यापारी संकूल उभारून दुकानदारांचे पुर्नवसन करण्यात येणार आहे.

१६ x २० आणि ८ x २० चौ. फुटांच्या ४० खोल्या बांधण्यास शासकीय मंजूरी देण्यात आली आहे. श्रीसाईबाबा संस्थान शाळेसाठी बांधकाम करीत आहे. त्याचप्रमाणे दुकान संकुलाचे काम करीत आहे.

(३) शिर्डी येथील सध्याचे जिल्हा परिषद शाळेचे स्थलांतर आरक्षण क्रमांक ८ मध्ये करून प्रस्तुत जागेवर दुकानकेंद्र करणेचे नियोजन आहे.

(४)शासन निर्णयाप्रमाणे शाळेसाठी ४० खोल्यांचे बांधकामास परवाागी दिलेली आहे त्याप्रमाणे पूर्तता करणेसाठी कार्यवाही चालू झाली असून भक्तांचे योजनेस मात्र फाटा दिलेला आहे. टपरीधारकाचे व्यवस्था करणेसाठी मा. व्यवस्थापन कमिटीने निर्णय घेतलेला आहे. अतिशय जलदगतीने व संबंधितांची परवानगी न घेता ही कार्यवाही चालू आहे.

(५) दि ०१/०९/२००४ चे सभेत याबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. त्याप्रमाणे जिल्हा परिषद शाळेचे स्थलांतर साईउद्यान इमारतीमध्ये करणेबाबतचा मा. श्री. विखे पाटील यांचेकडून निर्णय झ ाालेला आहे. रिटपिटीशनर अर्जदारास याबाबत कायदेशीर नोटीस पाठविणे भाग पडले आहे.

(६) त्यानंतर संस्थानने मा. कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषदेने शाळेचे स्थलांतर करणेसाठी व दुकान बांधकाम करणेसाठी करारनामा केला आहे.

दिनांक १४/०८/२००२ चे व दिनांक १२/०४/२००५ चे शासन निर्णय प्रस्तुतचे रिट पिटीशनमध्ये दाखल करणेत आले असून सदर निर्णयास आवाहन दिले आहे.

संस्थानचे कायद्याप्रमाणे सेक्शन १७ (२) (१) चा विचार करता संस्थानचे योग्य ते कारभाराचे व्यवस्थापनाकडे लक्ष देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. तसेच कलम १७ (१) प्रमाणे संस्थानची मालमत्ता शासनाचे परवानगी शिवाय १ वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी भाडेपटयाने, विक्रीने अगर इतर प्रकारे संक्रमित करता येणार नाही अशी तरतुद आहे परंतु दिाांक १२/०४/२००५ चा ठराव करतानाही याबाबत प्रकिया पाळणेत आलेली नाही अशा प्रकारचे रिट पिटीशनमध्ये मुद्दे मूद केलेली आहेत.

संस्थानतर्फे आरक्षण क्र.८ मध्ये शाळेचे बांधकाम हाती घेतले असून ८० % बांधकाम पूर्ण झाले आहे. जिल्हा परिषद अहमदनगर मार्फत दि १२/०७/२००६ रोजी बांधकामाची पहाणी देखील करणेत आलेली आहे. सदर इमारत जिल्हा परिषदेस हस्तांतर करणेसाठी शासनाकडे परवानगी मागणेत आलेली आहे. अद्याप प्रस्तुत परवानगी प्राप्त होणेवर आहे. नगरपंचायत, संस्थान व जिल्हा परिषद यांचे दरम्यान प्रस्तुत प्रकरणी मिळकतीचे संदर्भात करारनामा व इतर पूर्तता मा. व्यवस्थापन मंडळाचे ि- नर्णयाप्रमाणे होईल. अशी माहिती संस्थााचे ॲडव्होकेट मार्फत मा. कोर्टासमोर दाखल करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, तसेच रिट पिटीशन मध्ये अर्जदाराने जे दुरुस्ती परिच्छेद इत्यादी नमूद केला आहे त्यावर मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष, मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष व मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील यांचे समितीने अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ८७.** **एम.आर.आय.मशिन खरेदी बाबत**
**निर्णय क्र.५२९** श्री साईबाबा रुग्णालयात रुग्णांवर अद्यावत उपचार होणेसाठी बायपास शस्त्रक्रिया, ॲन्जीओग्राफी, ॲन्जीओप्लास्टी, आय.सी.सी.यू, सी.टी.स्कॅन, डायलेसीस, २डी इको इत्यादी विभाग सध्या कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. त्यासाठी लागणारी अत्याधुनिक मशिनरी घेण्यात आलेल्या आहेत.त्यामूळे शिर्डी परिसरातील व जवळपासच्या रुग्णांना अत्याल्प दरात या सुविधेचा फायदा होत आहे.

संस्थानचे रुग्णालय हे अहमदनगर-मनमाड या रस्त्यावर असल्याने अपघाताच्या रुग्णांची संख्या देखील जास्त प्रमाणात असते. तसेच इतर आजारांचे देखील रुग्ण सी.टी.स्कॅन मध्ये निदान न झाल्यास अशा प्रकारच्या रुग्णांना एम.आर.आयचे तपासणीसाठी सध्या नाशिक,पुणे मंबई इत्यादी ठिकाणी पाठवावे लागते यासाठी संस्थानमध्ये ही सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता एम.आर.आय मशिन खरेदीकामी निविदा मागविण्यात याव्यात असा प्रस्ताव मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी मांडला.

यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थानचे रुग्णालयासाठी एम.आर.आय.मशीन खरेदीकामी निविदा मागविण्यात याव्यात याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३ कोटीचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.८८** **श्री साईमंदिर व परिसराचे सुरक्षेकामी माजी सैनिकांमधून सुरक्षा गार्ड व गनमॅन यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेबाबत ....**
**निर्णय क्र.५३०.** **(अ)** संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४-०८-२००५ रोजीचे सभेत उपस्थित निविदा सादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटी होऊन सदर दिवशी चर्चा/वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि.,विलेपार्ले (प)मुंबई व मे. शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी (गुजरात) प्रा.लि., कुर्ला (वेस्ट)मुंबई यांच्या निविदा मंजूर

करण्यात आल्या. सदर सभेतील निर्णय क्र.४७० ला अनुसरुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांना मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. व मे.शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी (गुजरात) प्रा.लि.यांचे मार्फत कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी दि.०१-०३-२००६ पासून पुरविणेत येत आहे. सदर एजन्सीमार्फत पुरविणेत येणा-या सुरक्षा कंत्राटी कामगारांस किमान वेतन कायद्यानुसार शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ ला अनुज्ञेय असणारे किमान वेतन दर अधिक प्रॉव्हीडंड फंड प्रशासकीय चार्जेससह (मालकाचा हिस्सा ) १३.६१ टक्के अधिक सुरक्षा कामगारांच्या एकूण वेतनाच्या रक्कमेवर ०.०५ टक्के इतका सर्व्हीस चार्ज अधिक १०.२० टक्के इतका सर्व्हीस टॅक्स याशिवाय कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्श्युरन्स प्रिमीयम (अंशदान) याप्रमाणे रक्कम संस्थानकडून संबंधीत एजन्सीला देणेत येते. तथापी, सदर किमान वेतन दरामध्ये सुरक्षेकामी माजी सैनिक उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे संबंधीत एजन्सीज कडून मंदिर सुरक्षेकामी माजी सैनिक पुरविणेत येत नाही.

अक्षरधाम, वाराणासी येथील अतिरेकी घटना तसेच दि.११-०७-२००६ रोजी मुंबई येथे उपनगरी रेल्वेमध्ये झालेल्या बॉम्बस्फोट मालिकांचा विचार करता सावधगिरीची उपाययोजना म्हणून श्री साई मंदिराची सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करणेत यावी व त्याकामी माजी सैनिकांमधून ५० सुरक्षा गार्ड व १५ बंधूकधारी (गनमॅन) असे एकूण ६५ सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने तात्काळ घेणेत यावे अशी चर्चा मा.व्यवस्थापन समितीचे आजचे सभेमध्ये झाली. चर्चेअंती श्री साईमंदिर व मंदिर परीसराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सावधगिरीची उपाय योजना म्हणून चार महाव्दारांपैकी दोन महाव्दार हे मंदिर परीसरात आंत येणेसाठी व दोन महाव्दार हे मंदिर परीसरातून बाहेर जाणेकरीता वापरणेत यावेत. सदर गेटवर सुरक्षिततेकरीता सेवानिवृत्त सैनिक (माजी सैनिक ) सुरक्षा एजन्सीकडून कंत्राटी पध्दतीने घेणेतयेऊन त्यांचेकडे चारही महाव्दारांवरील सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी देणेत यावी .

तसेच संस्थानला कंत्राटी पध्दतीने उपरोक्तप्रमाणे सुरक्षा व्यवस्थेकामी माजी (सेवानिवृत्त)सैनिकांमधून ५० सुरक्षा गार्ड,०३ सुरक्षा सुपरवायझर व १५ बंधूकधारी (गनमॅन) असे एकूण ६८ सुरक्षा कर्मचारी हे किमान वेतन कायद्यानुसार शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ ला अनुज्ञेय असणारे किमान वेतन दरामध्ये उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे सद्याचे सुरक्षा एजन्सीकडून पुरविणेत येत नाही. सदर सुरक्षा कर्मचारी माजी (सेवानिवृत्त) सैनिकांमधून कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी दुसरी एजन्सी नियुक्त करणेत यावी असे ठरले.

श्री साईमंदिर व मंदिर परीसराचा सुरक्षिततेच्या दृष्टीने चारही महाव्दारांवरील सुरक्षा व्यवस्थेकामी माजी (सेवानिवृत्त) सैनिकांमधून संस्थानचे आवश्यक्तेनुसार व गरजेनुसार सुरक्षा सुपरवायझर, गनमॅन,सुरक्षा गार्ड कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी मे.ईगल आय एंटरप्राइज, १ला मजला, नचिकेत प्लाझा, मोरारजी सर्कल, जी.आय.डी.सी.,वापी-३९६१९५ या एजन्सीने दि.१२-०७-२००६ रोजीचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावावर एजन्सीचे प्रतिनिधी यांचेशी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन संस्थानला कंत्राटी पध्दतीने माजी (सेवानिवृत्त) सैनिकांमधून सुरक्षा पर्यवेक्षक, सशस्त्र सुरक्षा रक्षक (गनमॅन) सुरक्षा रक्षक पुरविणेकामी सदर कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरविण्याची क्षमता विचारात घेऊन सदर एजन्सीकडून रु. १,००,०००/-(अक्षरी रुपये एक लाख ) मात्र अनामत रक्कम घेऊन त्यांचे खालीलप्रमाणे दर मान्य करण्यात येऊन त्यांना सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत आदेश देण्यात यावा असे ठरले.

अ) सुरक्षा पर्यवेक्षक- रु.२२३.२५ प्रति दिनी.
ब) सशस्त्र सुरक्षा रक्षक - रु.१८४.५५ प्रती दिनी.
क) सुरक्षा रक्षक- रु.१६६.७५ प्रती दिनी.

मे.ईगल आय एंटरप्राइज,वापी-३९६१९५ यांना माजी ( सेवानिवृत्त )सैनिकांमधून सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी उपरोक्त वेतन दराचे रक्कमेवर प्रॉव्हीडंड फंड, प्रशासकीय चार्जेसह (मालकाचा हिस्सा ) १३.६१ टक्के, अधिक सर्व्हिस चार्जेस १.५०%,अधिक एकुण रकमेवर १२.२४ टक्के सर्व्हीस टॅक्स, याप्रमाणे रक्कम देण्यात यावी. तसेच माजी सैनिकांमधून घेण्यात येणाऱ्या सुरक्षा कंत्राटी कामगारांना आठवडा सुट्टी व्यतिरिक्त संपुर्ण महिना ड्युटी देण्यात यावी असे ठरले.

**(ब)** त्याचप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व परिसराची सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करणेकामी तेथील सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी दुसरे स्वतंत्र एजन्सीकडे देण्यात यावी असे उपसमितीचे दि.०३-०५-२००६ रोजीचे सभेतील चर्चेत व मा.व्यवस्थापन समितीचे दि. १५-०५-२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३०८ नुसार दोन्ही रुग्णालयासाठी स्वच्छता व संरक्षण सेवेसाठी स्वतंत्र टेंडर्स काढावीत असे ठरले. त्यास अनुसरुन संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय व परीसरातील सुरक्षेकामी आवश्यकतेनूसार व गरजेनूसार सुरक्षा सुपरवायझर, गनमॅन

(सेवानिवृत्त/माजी सैनिक) , सुरक्षा गार्ड कंत्राटी पध्दतीने पुरविणेकरीता मे स्पार्क-ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.,एम.जी रोड, पुणे या एजन्सीने दि.१२/०७/२००६ रोजीचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावावर एजन्सीजचे प्रतिनिधी यांचेशी चर्चा होवून उपरोक्तप्रमाणे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालय व परिसराचे सुरक्षेकामी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा परिवेक्षक-०३, सशस्त्र सुरक्षारक्षक-२१ (सेवानिवृत्त/माजी सैनिक), सुरक्षा गार्ड-५४ असे एकूण ७८ सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी सदर कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरविणेची क्षमता विचारात घेवून त्याचेकडून रुपये १,००,०००/- (रुपये एक लाख ) मात्र अनामत रक्कम घेऊन त्यांचे खालीलप्रमाणे दर मान्य करण्यात येऊन त्यांना सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत आदेश देण्यात यावा असे ठरले.

**अ) सुरक्षा पर्यवेक्षक-** किमान वेतन कायद्यास अनुसरुन शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंटचे झोन नं.३ प्रमाणे किमान वेतन दर.

**ब) सशस्त्र सुरक्षा रक्षक -** रु. १८४-५५ प्रति दिनी ( सेवानिवृत्त/माजी सैनिक)

**क) सुरक्षा रक्षक-** किमान वेतन कायद्यास अनुसरुन शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंटचे झोन नं.३ प्रमाणे किमान वेतन दर.

स्पार्क-ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.,एम.जी रोड,पुणे यांना सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी उपरोक्त वेतन दराचे रक्कमेवर प्रॉव्हीडंड फंड, प्रशासकीय चार्जेसह (मालकाचा हिस्सा ) १३.६१ टक्के, अधिक सर्व्हिस चार्जेस १.५०%,अधिक एकुण रकमेवर १२.२४ टक्के सर्व्हीस टॅक्स, याप्रमाणे रक्कम देण्यात यावी असे ठरले.

वरीलप्रमाणे निर्णय क्र.४१६ ते ५३० सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (भाऊसाहेब रा.वाकचौरे) | (जयंत मुरलीधर ससाणे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) | श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) |